महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

अनुक्रमणिका

श्री

विविधज्ञानविस्तार.

अनुक्रमणिका.

विषय	पृष्ठ
साहित्यपरिषद. (रा. रा. वासुदेव गोविंद आपटे, बी. ए.)	२८९
पुस्तकपरीक्षा—"गृहिणी-भूषण." (लेखक—'वाग्भट.')	२९७
"हरि केशवजी यांचें चरित्र." (रा. रा. बाळकृष्ण नारायण देव.)	३०७
काव्यमंजूषा	३१२, ३२१, ३३५
महादेवाचें मूळ स्वरूप. (रा. रा. कृष्णशास्त्री घुले)	३१३
डेलॉसचा संघ व मराठ्यांचें साम्राज्य. (प्रो० हरि गोविंद लिमये)	३२२

जुलै.

१९१२

१०-८-१२.

क ४३.

अंक ७.

प्रकाशक—नाडकर्णी आणि मंडळी, फणसवाडी, मुंबई.

..त संपूर्ण विवेकानंदांची पुरवणी वांटली जात आहे तिक...

..वं.

पोंच.

..बार १९११. या चिरस्मरणीय दर-...पले **महाराजे पांचवे जॉर्ज** आणि ... **मेरी** यांनीं लंडन सोडल्यापासून परत ...पोंचेपर्यंत त्यांच्या एकंदर प्रवासाची हकीगत ...स्तकांत दिली आहे. या राजदंपत्याचें स्वागत ...ण्यासाठीं मुंबई, दिल्ली, कलकत्ता इत्यादि स्थळीं जे अपूर्व प्रकार आणि सभारंभ करण्यांत आले, त्यांना निरनिराळ्या ठिकाणीं जीं मानपत्रें देण्यांत आलीं; तसेंच त्यांनीं निरनिराळ्या स्थळीं आणि प्रसंगीं जीं स्वप्रजेस आल्हादित करणारीं भाषणें केलीं, तीं बहुतेक सर्व या पुस्तकांत पाहावयास मिळतील. पहिल्या प्रकरणांत आणि अ परिशिष्टांत बादशाहाच्या सत्तेखालीं असणाऱ्या निरनिराळ्या प्रदेशांचें जें वर्णन, विस्तार आणि उत्पन्न दिलीं आहेत त्यांवरून ब्रिटिश साम्राज्याच्या वैभवाची चांगलीच कल्पना येते. केवळ मराठीच जाणणारांस हें पुस्तक दिल्लीदरबारची स्मृति कायम राहण्यास चांगलेंच उपयोगीं पडेल. पुस्तक यापेक्षांही सुबक निघणें अवश्य आणि शक्य होतें; आणि पुस्तकाच्या ज्यास्त प्रसारार्थ किंमतही एक रुपयापेक्षां कमी ठेविली पाहिजे होती. या पुस्तकाची एक प्रत पाठविल्याबद्दल ग्रंथकार रा० रा० केशवराव तानाजी माणगांवकर यांचे आम्ही आभारी आहों.

२. **आईबापांचा मित्र.** हें पुस्तक रा० रा० मोरो गणेश लोंढे, हेडमास्तर रेवदंडा, यांनीं लिहिलें. प्रस्तावना आणि उपसंहार यांशिवाय याचे ... भाग आहेत. पहिल्या भागांत संतति चांगली निपजण्यासाठीं आईबापांनीं काय केलें पाहिजे हें सांगितलें आहे; दुसऱ्या भागांत आईबापांचें मुलांशीं वर्तन कसें असावें याची चर्चा आहे; तिसऱ्या भागांत मुलांच्या शिक्षणाच्या बाबतींत आईबापांची केवढी जबाबदारी आहे याचें विवरण आहे; आणि चवथ्या भागांत मुलांच्या विवाहासंबंधानें आईबापांचें कर्तव्य काय हें वर्णिलें आहे. आजच्या आणि पुढें होणाऱ्या आईबापांनीं विचार करण्यासारख्या पुष्कळ गोष्टी यांत आहेत, आणि त्यांच्यापुढें त्या विचारासाठीं मांडल्याबद्दल रा० लोंढे हे स्तुतीस पात्र आहेत. पृ० सं० १००, किं० ६॥ आणे.

३. **पारमार्थिक बोल**-अथवा **सांख्य दर्शनाचा चतुर्थाध्याय.** हा चतुर्थाध्याय रा. रा. मोरो विनायक शिंगणे यांच्या मतें आध्यात्मिक ज्ञानाची गुरुकिल्ली आहे; आणि ह्मणूनच त्यांनीं हें पुस्तक आपल्या मातेचें योग्य स्मारक ह्मणून, लोकांपुढें मांडलें आहे. पृ. ५६, किं० चार आणे. श्रीमत्कपि... ...चे उपदेश वाचकांच्या मनावर ठसविण्यासाठीं ज्या आख्याइका सांगितल्या आहेत त्या बऱ्याच अंशीं इष्ट हेतुसाधक आहेत. मुमुक्षूंनीं हें पुस्तक अवश्य एकवेळ वाचून पाहावें.

४. **त्रिवेणी.**-ही छोटेखानी कादंबरी रा. रा. वासुदेव गोविंद आपटे बी. ए. यांनीं लिहून रा. रा. शंकर हरि मुळे, बुकसेलर, बुधवार पेठ पुणें, यांनीं प्रसिद्ध केली. रॉयल ३२ पेजी सांचाचीं १०० पृष्ठें असतां किंमत फक्त २ आणे ठेविली आहे, ही अगदीं माफक आहे. याच धर्तीवर सामाजिक आणि ऐतिहासिक कादंबऱ्या अगदीं स्वस्त दरानें दर तीन महिन्यांनीं काढण्याचा सदर बुकसेलर यांचा संकल्प आहे. प्रस्तुत कादंबरी सामाजिक आहे, आणि हींत हिंदु स्त्रीत्वाचा आदर्श, सुशिक्षितांचें कर्तव्य, समाजसुधारणेचा खरा पाया कोणता, इत्यादि विषयांचें थोडक्यांत विवेचन केलें आहे. पृष्ठसंख्या मर्यादित असल्यामुळें कथेचा शेवट कसातरी करावा लागला आहे असा भास होतो. नायक आणि नायिका यांच्या सद्गुणांस जें बक्षिस खास मिळणार ह्मणून पुस्तक वाचीत असतां वाचकाची अपेक्षा होते, ती कोणत्याही कारणानें असो, पुरी न झाल्यामुळें त्याची निराशा होते. हें बरें झालें नाहीं असें वाटतें.

५. **बा प्रणया !**-'गंगाराम'कृत. अलीकडे इंग्लिश प्रेमविषयक आणि अद्भुत गोष्टींचीं मराठींत जीं बरींचशीं रूपांतरें होऊं लागलीं आहेत त्यांतलेंच हें एक आहे. नांवें मराठी आणि परिस्थिति इंग्लिश यांचें मेथकुट रुचकर कसें होणार ? या कारणामुळें 'गंगाराम' कृत ही छोटेखानी कादंबरी वाचतांना मनाचा विरस होतो; परंतु तो त्यांतील सरस भाषेनें बराचसा भरून येतो असें कबूल केलें पाहिजे. 'उद्यान' मासि-

अनुक्रमणिका

श्री

विविधज्ञानविस्तार.

पुस्तक ४३. अंक ७.

साहित्यपरिषद.

(पुण्याच्या यंदांच्या **वसंत व्याख्यानमालें**त सदर विषयावर ‘ महाराष्ट्र–साहित्यपरिषदे’चे एक सेक्रेटरी रा. वासुदेव गोविंद आपटे बी. ए. यांचें व्याख्यान झालें होतें. त्यांत पाश्चात्य देशांतील व आपल्या देशांतील साहित्यपरिषदांच्या संबंधाची बरीच माहिती एकत्र संगृहित केली असल्यामुळें, व विशेषतः महाराष्ट्र साहित्यपरिषदेची अंतःस्थिति, तिच्या अडचणी व त्या दूर करण्यासाठीं लागणारें साह्य यांचेंही दिग्दर्शन केलें असल्यामुळें, सदर व्याख्यान उपयुक्त होईल असें जाणून, त्याचा सारांश ‘विस्तारा’च्या वाचकांसाठीं येथें देत आहों.—संपादक वि० ज्ञा० वि०)

रा० आपटे यांनीं प्रथम इंग्रजींतल्या ‘लिटरेचर’ शब्दाला समानार्थक ह्मणून ‘सारस्वत’ ‘वाङ्मय’ व ‘साहित्य’ असे जे तीन शब्द मराठींत आले आहेत त्यांच्या व्याप्तीची मीमांसा करून, नंतर ‘साहित्य’ शब्दाच्या संकुचित व व्यापक अशा दोन्ही अर्थांची फोड केली व कोणतीही भाषा बोलणाऱ्या किंवा वाचणाऱ्या सर्व लोकांच्या मनाचें व विचारांचें एकीभूत जें प्रतिबिंब तें त्या लोकांचें साहित्य, अशा नव्या अर्थानें ‘ साहित्यपरिषद ’ या सामासिक शब्दांत ‘ साहित्य ’ शब्द योजिला आहे, असें सांगितल्यावर ते ह्मणालेः—

साहित्यपरिषद हें कांहीं नवें बंड अलीकडे निघालें आहे असें कित्येकांस वाटतें. पण तसा प्रकार नाहीं. या संस्थेला प्राचीन इतिहास आहे. पूर्वीं नैमिषारण्यासारख्या अरण्यांत यज्ञसमारंभार्थ जमलेले ऋषि, सूतासारख्या एकाद्या पंडिताला अध्यक्ष करून, त्याच्या तोंडून पुराणें श्रवण करीत व इतर विषयांवरही प्रश्न विचारून त्याच्या तोंडून माहिती ऐकत. त्यावर मग शंका प्रतिशंका निघत, आणि एकंदरींत या परिषदेमार्फत ज्ञानाचा प्रसार होत असे. त्याकाळीं लिखित वाङ्मय नव्हतें, तेव्हां अशा रीतीनेंच अलिखित वाङ्मय भरपूर तयार होत असे. पुढें विक्रमादित्याच्या काळीं राजाश्रित अशा पंडितांच्या सभा असत; व या सभांतून गहन विषयांवर वादविवाद होऊन ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें या पंडितांची संभावना होत असे. या वेळींसुद्धां खऱ्या ‘ साहित्या’ ची कल्पना आलेली नव्हती. तथापि राजाश्रयानें काव्यात्मक व तत्त्वज्ञानविषयक वाङ्मय बरेंच तयार झालें होतें. ऋषीकाळची लोकांची साधी राहणी बदलल्यापासून राजाश्रयावांचून वाङ्मयविषयक

अनुक्रमणिका

प्रगतीचें पाऊल पुढें पडेनासें झालें व ही स्थिति अद्याप बरेंच अंशानें कायम आहे. पाश्चात्य देशांत सुद्धां प्राचीनकाळापासून हीच स्थिति चालत आली आहे. आतां मात्र राजाश्रयाची जागा तिकडे लोकाश्रयानें पटकाविली आहे. आपल्या इकडे तसा काळ येण्यास बराच अवकाश आहे.

साहित्यपरिषदांच्या टीकाकारांचे तीन वर्ग करतां येतील. पहिला वाङ्मयाच्या उन्नतीला अशा परिषदांची जरूरीच नाहीं ह्मणणारांचा. ते असें ह्मणतात कीं, 'प्रतिभावान् कवि किंवा ग्रंथकार परिषदांच्या परिश्रमानें निर्माण व्हावयाचे आहेत काय ? चारजणांनीं डोकीं खर्चून शेक्सपियरसारखीं सर्वोत्कृष्ट नाटकें निर्माण केल्याचें एक तरी उदाहरण घडलें आहे काय ? संयुक्त श्रमानें प्रतिभावान् वाङ्मय होत नसतें. मग तुमची साहित्यपरिषद कशाला हवी ?' या टीकाकारांना साहित्यपरिषदांचा उद्देशच चांगला कळलेला नाहीं असें ह्मणणें भाग आहे. एकेकट्या माणसानेंच करण्यासारख्या गोष्टींसाठीं या परिषदा नाहींतच. होतकरू ग्रंथकारांना उत्तेजन देऊन पुढें आणणें, कोश, व्याकरण वगैरे सारखीं मोठालीं कामें—जीं संयुक्त श्रमानेंच तयार व्हावयाचीं तीं करणें, देशकालमानाप्रमाणें कशा प्रकारचें साहित्य देशाला विशेष जरूरीनें पाहिजे आहे त्याविषयींचा निर्णय करून बहुमतानें तसलें साहित्य निर्माण करण्याची दिशा ठरविणें, इत्यादि गोष्टी एकट्यादुकट्याच्या नाहींत. त्या राष्ट्राविषयीं कळकळ बाळगणाऱ्या सर्व थोर लोकांच्या विचाराच्या आहेत, आणि अशीं कामें अंगावर घेण्यासाठींच हल्लींच्या कालमानाप्रमाणें अशा परिषदांची आवश्यकता आहे. टीकाकारांचा दुसरा वर्ग ह्मणजे 'अशा परिषदा हव्या, पण त्या कांहीं निवडक विद्वानांच्या असाव्यात, त्यासाठीं बहुजनसमाजाचीं संमेलनें नकोत' असें ह्मणणारांचा. पाश्चात्य देशांत ज्या परिषदा आहेत त्या अशाच अगदीं निवडक विद्वानांच्या असतात. या टीकाकाराचें ह्मणणें अगदीं रास्त आहे, यांत शंका नाहीं. यावर मी इतकेंच ह्मणतों कीं, आह्मीं सुद्धां हेंच करीत आहों. जाहीर संमेलनें भरविण्याची जी टूम आह्मीं उचलली आहे ती केवळ लोकांमध्यें वाङ्मयासंबंधानें जी शिथिलता दृष्टीस पडते ती घालवून त्यांच्यांत थोडीशी जागृति व्हावी एवढ्यापुरतीच आहे. भाषेची उन्नति होण्यासाठीं कशा प्रकारचें वाङ्मय हवें आहे, किंवा अमक्या शब्दांची व्युत्पत्ति ही खरी कीं ती खरी, अथवा कोशासारखीं कामें करतांना अमक्या शब्दाचा मूळ अर्थ कोणता, इ० नाजुक प्रश्नांचा निकाल संमेलनांत जमलेल्या सामान्य लोकांच्या बहुमतानें कधींच करण्यांत येत नाहीं. या कामासाठीं निवडक विद्वानांचीच कमिटी नेमिली जाते व अशा कमिट्यांचे सभासद मिळून 'साहित्यपरिषद' होते. संमेलन व साहित्यपरिषद हीं दोन वर्तुळें कल्पिलीं तर संमेलन हें बाह्य वर्तुळ व परिषद हें अंतर्वर्तुळ असें ह्मणतां येईल. तेव्हां या दुसऱ्या वर्गांतल्या टीकाकारांच्या टीकेला वस्तुतः जागाच राहत नाहीं. टीकाकारांच्या तिसऱ्या वर्गाचें ह्मणणें माझ्या दृष्टीनें अत्यंत अनुदारपणाचें आहे. इतकें कीं, त्यामुळेंच कदाचित् या वर्गांतले टीकाकार आपलें अंतर्याम जाहिर रीतीनें प्रकट करण्यास संकोच करीत असतील

अनुक्रमणिका

असें मला वाटतें. तथापि ज्या अर्थीं या टीकाकारांनीं खाजगी पत्रद्वारें व कित्येकवेळां माझ्या समक्ष उद्गार काढून आपले विचार प्रदर्शित केले आहेत, त्या अर्थीं ते लपवून न ठेवतां त्यांचें जाहीररीतीनें समाधान करणें हेंच मला इष्ट वाटतें. हे टीकाकार ह्मणतात कीं, 'ही ब्राह्मणांची संस्था आहे. इतर जातींचे लोक यांना नको आहेत, व इतरांना आह्मी संमेलनाला बोलावीत सुद्धां नाहीं.' ही गोष्ट साफ खोटी आहे, हें आमच्या साहित्यसंमेलनाला प्रभु, मराठे, ख्रिस्ती, वगैरे अन्य जातींचे विद्वानही आह्मी बोलावितों, व तेही कृपा करून येतात, यावरून सहज कोणालाही कळणार आहे. कै. राजारामशास्त्री भागवत यांनीं प्रथम 'सुधारक' पत्राच्या द्वारें आमच्यावर हा आरोप केला होता, व त्याचें खंडन संमेलनाला हजर असलेल्या एका ख्रिस्ती विद्वानानेंच परभारें केलें होतें. भाषेची उन्नति हा एका जातीचा प्रश्न नाहीं, त्याला सर्व जातींचें साह्य: पाहिजे आहे; व तें मिळविण्याचे कामीं आमच्या हातून कसूर झाल्याचें मला तरी स्मरत नाहीं. दुसऱ्या कित्येकांचें असें ह्मणणें आहे कीं, 'ही संस्था एक दोघां व्यक्तींनीं स्वतःचें महात्म्य वाढविण्यासाठीं काढली आहे. हिचे सेक्रेटरी 'स्वयंभू' आहेत. अशा क्षुद्र आक्षेपांना उत्तर देण्याचा प्रसंग यावा ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. अशा टीकाकारांना मी एवढेंच सांगतों कीं, 'बाबानों, तसा कांहीं प्रकार नाहीं. हल्लींच्या तिघां सेक्रेटरींपैकीं एकही जण साहित्यपरिषदेचा मूळ उत्पादक नाहीं व 'स्वयंभू' ही नाहीं. पुण्यास श्री. मळेकरांच्या वाड्यांत भरलेल्या दुसऱ्या जाहीर संमेलनानेंच मुद्दाम ठराव करून आमची नेमणूक केली, ह्मणून आह्मीं हें काम हातीं घेतलें. विद्वत्समाजाची तशी इच्छा असेल तर आह्मी याक्षणीं आपल्या जागेचा राजीनामा देण्यास तयार आहों. इतरांनीं पुढें येऊन हें कार्य करावें ह्मणजे झालें.' कित्येकांचें असें ह्मणणें आहे कीं, सध्यां आपल्यांत नेमस्त व जहाल असे दोन पक्ष झाले आहेत व या परिषदेच्या सेक्रेटरींत दोन्ही पक्षांचे लोक आहेत: असें असण्यापेक्षां ही संस्था एकपक्षीय होईल तर त्या त्या पक्षाच्या लोकांना अधिक मोकळेपणा वाटून अधिक कार्य होईल. या आक्षेपाला माझें एकट्याचें उत्तर मी असें देतों कीं, हे पक्ष राजकीय मतभेदावरून झालेले आहेत, वाङ्मयासारख्या विषयाशीं त्याचा विशेषसा संबंध येत नाहीं; व कदाचित् आलाच तर तेवढ्यापुरता मतभेद बाजूला ठेवून व भाषोन्नतीच्या उच्चतम ध्येयाकडे लक्ष देऊन वागण्यास शिकण्याची वेळ आतां आलेली आहे. हें घडणें अशक्य नाहीं, हें 'वंगीय साहित्यसभे'चें उदाहरण मी प्रत्यक्ष पाहिलें आहे त्यावरून सांगूं शकतों. तथापि इतक्याउपरही साहित्यपरिषद एकपक्षीयच असावी व तशी ती झाल्यास आह्मी सुयंत्रित काम करून दाखवूं असें ह्मणणारी कोणी मंडळी पुढें येत असेल, तर नेमस्त पक्षाचा मी व जहालपक्षाचे रा. खाडीलकर यांपैकीं कोणीही इष्ट ध्येयाकडे नजर देऊन आपलें काम सोडण्यास केव्हांही तयार होऊं. कोणीकडून तरी साहित्यपरिषदेचे उद्देश पार पडूं द्या ह्मणजे झालें. महाराष्ट्र साहित्यपरिषदेवरचे आक्षेप सामान्यतः अशा प्रकारचे आहेत व त्यांचें समाधान मी आतांपर्यंत यथामति

अनुक्रमणिका

केलें आहे. आतां एकच आक्षेप राहिला आहे. त्याचें उत्तर पुढें ओघाओघानें मी देणार आहें इतकें सांगून पाश्चात्य देशांतील व आपल्या इकडील साहित्यपरिषदांविषयीं मीं जी माहिती मिळविली आहे तिचें थोडेंसें दिग्दर्शन करतों.

मघाशीं मी सांगितलेंच आहे कीं, आपल्या देशांतल्या प्राचीन साहित्यपरिषदा नैमिषारण्यासारख्या ठिकाणीं यज्ञासारख्या प्रसंगीं बहुधा भरत असत. युरोपखंडांतल्या प्राचीनकाळच्या साहित्यपरिषदाही अशाच ठिकाणीं भरविण्यांत येत. हें साम्य गमतीचें आहे. ग्रीक लोकांत Academies असें या परिषदांना नांव होतें. अक्याडेमी हा शब्द, मूळ पहिली परिषद प्लेटोच्या वेळीं त्या तत्त्वज्ञान्याच्या एकांत निवासाच्या जागीं अक्याडेम येथें झाडांच्या एका राईंत भरली, त्यावरून पडलें. ही परिषद मुख्यतः साहित्य, शास्त्र व कला यांचा अभ्यास वाढवावा अशा हेतूनें भरली होती, व तिला तत्कालीन विद्वानांचें चांगलें साह्य मिळालें. पुढें तिचें उदाहण पाहून अलेक्झांड्रिया, जर्मनी, इंग्लंड, फ्रान्स, इटली वगैरे निरनिराळ्या देशांत टॉलेमी, शार्लेमेन, आलफ्रेड धिग्रेट वगैरे राजांच्या आश्रयाखालीं निरनिराळ्या परिषदा स्थापन झाल्या. या सर्वांना प्रथम राजाश्रय होता, व अजूनही आहे. यांच्याही उद्देशपत्रकांत प्रथम साहित्याबरोबर शास्त्र व कला यांचाही समावेश करण्यांत आला होता. पण मागाहून असें आढळून आलें कीं, एकेक विषयच अपरंपार असल्यामुळें सर्वांचा समावेश एका संस्थेच्या कार्यक्रमांत करण्यापेक्षां निरनिराळ्या विषयासाठीं निरनिराळ्या परिषदा स्थापणें अधिक सोयीचें होईल. ह्मणून अर्वाचीन विद्वानांनीं साहित्य, ज्योतिष, शिल्प, गणीत, रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, वैद्यक अशा प्रत्येक शाखेची निरनिराळी परिषद स्थापण्याचा उपक्रम केला. या प्रत्येक परिषदेचा स्वतंत्र इतिहास अत्यंत मनोवेधक व बोधप्रद आहे. जिज्ञासूंनीं तो 'एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका'सारख्या ग्रंथांतून पाहावा. त्यांतल्या दोन तीन ठळक संस्थांच्या इतिहासांतल्या पांच चार ठळक गोष्टी सांगण्यापलीकडे मला अल्पावकाशांत अधिक करतां येणें शक्य नाहीं. फ्रान्स देशांतली सुप्रसिद्ध परिषद ह्मणजे Academies Francaise ही स्थापन झाल्यास सुमारें साडेतीनशें वर्षें झालीं. पहिलीं पांच चार वर्षें ती एका गृहस्थाच्या घरीं भरत असे, व तेथें चार विद्वान् मंडळी जमून वाङ्मयविषयक चर्चा वगैरे करीत असे. कोणी एखाद्यानें निबंध लिहून आणावा व त्यावर बाकीच्यांनीं चर्चा करावी. हा प्रकार जसा आपल्या देशांत हल्लीं शेंकडो क्लबांतून चालतो तसाच या परिषदेंतही होता. पण पुढें तिला राजाश्रय मिळाल्यावर तिनें फ्रेंच भाषेच्या शुद्धीकरणाचें दांडगें काम हातीं घेतलें. फ्रेंच भाषेचें नियमन करून त्या भाषेंत शास्त्र व कला यांच्या संबंधाचे पारिभाषिक शब्द आणावयाचे, व ती भाषा कोणत्याही विचाराचें वहन करण्यास समर्थ होईल असें स्वरूप तिला द्यावयाचें, हें काम त्या परिषदेनें आपल्याकडे घेतलें; व त्याच्याच अनुषंगानें फ्रेंच भाषेचा नवा व्यापक कोश करण्यासाठीं सर्वमान्य अशा फ्रेंच ग्रंथकारांच्या ग्रंथांचें मार्मिक परीक्षण करून त्या ग्रंथांतली शब्दसंपत्ति व संप्र-

दायसंपत्ति यांची योग्य निवड व वर्गीकरण करून एक उत्तम कोश निर्माण केला. या त्यांच्या परिश्रमाचें चीज त्याकाळीं झालें नाहीं. उलट अठराव्या शतकाचे अखेरीस राज्यक्रांतीचे वेळीं सदर परिषदेच्या सभासदांचा छळ होऊन कित्येकांना सुळीं जावें लागलें. पण पुनः शांततेचा काळ आला तसें या फ्रेंच साहित्यपरिषदेच्या दैवांतही परिवर्तन घडलें, आणि जी कांहीं कालापूर्वीं तेथील सरकारास भयावह किंवा राजद्रोही वाटत होती तीच अल्पावकाशांत राजाश्रयास पात्र होऊन तिच्या सभासदांना सरकारांतून वर्षासनें मिळूं लागलीं ! या सभेच्या त्या काळच्या नियमांत एक चमत्कारिक गोष्ट अशी होती कीं, जे नटाचा धंदा करणारे असतील त्यांना या परिषदेचे सभासद होतां येत नसे. आपल्या इकडे थोड्या वर्षांपूर्वीं नाटकवाल्यांचा धंदा जसा अगदीं हलका समजला जात असे व नाटकवाल्यांची संगत प्रतिष्ठितपणाला हानिकारक होत असे, तसाच कांहींसा प्रकार त्यावेळीं तिकडे होता असें वाटतें. या नियमामुळें मोलिएर सारख्या नामांकित प्रहसनकाराला या परिषदेंत जागा मिळाली नाहीं. जगप्रसिद्ध असे दुसरेही कांहीं विद्वान् या परिषदेनें अशा रीतीनें आपल्या कक्षेच्या बाहेर ठेविले होते. तथापि ती स्थिति हळू हळू पालटली व हल्लीं साऱ्या जगांत साहित्याची उत्तम सेवा बजावणाऱ्या अशा ज्या कित्येक सर्वमान्य संस्था आहेत त्यांत ती अग्रगण्य होऊन बसली आहे. तथापि तिनें केलेल्या कामासंबंधानें विद्वानांचें एकमत आहे असें मात्र नाहीं. फ्रेंच भाषेला तिच्या परिश्रमामुळें माधुर्य, कोमलता, सर्वार्थवाहकत्व इ० गुण प्राप्त झाले असें जसें कित्येकांना वाटतें, तसें या परिषदेनें फ्रेंच भाषेला बायकी करून सोडली व तिच्यांतला मर्दानीपणा घालवून टाकला, असेंही ह्मणणारे कित्येक आहेत. इंग्लंडचे सुप्रसिद्ध मार्मिक साहित्यसेवक माथ्यू आर्नोल्ड हे जसे या परिषदेच्या कामाला अत्यंत मोहित झाले, तसे ही परिषद सरकारच्या कच्छपीं लागून स्वार्थ साधणाऱ्या मतलबी लोकांची आहे, तिच्या चालकांत अरेरावीपणा भरला आहे, ती भाषेची उन्नति न करतां अवनति मात्र करीत आहे, तिचे सभासद 'अहोरूपमहोध्वनिः' करणारे आहेत, असें ह्मणणारे टीकाकारही झाले आहेत. सारांश, फ्रेंच भाषेसंबंधानें एवढी कामगिरी करणारी, आणि सुळीं जाण्यापर्यंत छळवाद सोसण्यास तयार इतके निःस्वार्थ जिचे सभासद होते अशी, फ्रेंच परिषद सुद्धां टीकाकारांच्या व निंदकांच्या तडाक्यांतून अद्याप सुटली नाहीं, मग बिचाऱ्या अल्पवयस्क व दुर्बल अशा आमच्या महाराष्ट्र साहित्यपरिदेची काय कथा ! लवकरच जर्मनीमध्येंही या नमुन्यावर साहित्यपरिषद स्थापन झाली व या परिषदेचे सभासद होण्यांत तेथील राजपुत्र व सरदार यांना भूषण वाटूं लागलें. याही परिषदेचा जर्मन भाषेचे शुद्धीकरणांत मोठा उपयोग झाला. इटलीमध्यें स्थापन झालेल्या परिषदेनें प्राचीन हस्तलेख वगैरे शोधण्याचे कामाकडे अधिक लक्ष दिलें. इंग्लंडमध्यें युरोप व अमेरिका यांतील सर्व साहित्यपरिषदांच्या प्रतिनिधींचें एक संयुक्त कॉन्फरन्स थोड्या वर्षांपूर्वीं भरलें होतें. तिनें अशा परिषदांचा

अनुक्रमणिका

भाषोन्नतीला खरोखर कांहीं उपयोग होतो काय, या प्रश्नाची पुष्कळ वाटाघाट करून, शेवटीं तो होतो अशी अशी खात्री झाल्यावर ग्रेटब्रिटनमध्यें १९०२ सालीं ब्रिटिश अकॅडेमी स्थापन झाली. आपले माजी प्रांताधिपति लॉर्ड रे हे तिचे पहिले अध्यक्ष होते. हिच्या कामाला:दृश्य स्वरूप अद्याप कांहींच आलेलें नाहीं; तथापि इंग्रज लोक आमच्यासारखे उतावळे नाहींत हेंही लक्षांत ठेवण्याजोगें आहे. असो. पाश्चात्य देशांतल्या साहित्यपरिषदांसंबंधानें हवी तेवढी माहिती उपलब्ध आहे, पण मला अल्पावकाशांत आपल्या देशांतल्या कित्येक साहित्य परिषदांसंबंधानेंही सांगावयाचें असल्यामुळें या विषयावर विस्तार करण्याचे मोहांत न पडतां मी आपल्या देशाकडे वळतों.

आपल्या देशांतल्या सध्याच्या सगळ्या साहित्यपरिषदा तीस वर्षांच्या आंतल्या आहेत. माझ्या समजुतीप्रमाणें बंगाली साहित्यपरिषद ही सर्वांत जुनी; ती १८९० च्या सुमारास स्थापन झालेली आहे. त्यानंतर काशीची 'नागरी प्रचारणी सभा' निर्माण झाली. 'महाराष्ट्र साहित्यपरिषद' व 'गुर्जरसाहित्यपरिषद' या जवळ जवळ बरोबरच स्थापन झाल्या. सगळ्यांच्या मागून 'आंध्रपरिषद' अस्तित्वांत आली. आपल्या देशांत आणखी कोठें साहित्यपरिषदा असल्या तर त्यांची मला माहिती नाहीं. वंगीय साहित्यपरिषदेचें अनुकरण हल्लीं बंगाल्यांत ठिकठिकाणीं होत आहे व तिकडे बहुतेक प्रत्येक जिल्ह्यांत अशा परिषदा स्थापन होऊं लागल्या आहेत. बंगाली लोक जात्याच भावप्रधान (Sentimental) प्रकृतीचे असल्यामुळें, व विशेषतः भाषा ही आपली माता आहे व यथाशक्ति तिची सेवा करणें व तिच्या उन्नतीसाठीं झटणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे ही भावना त्या लोकांत विशेष जागृत असल्यामुळें, (शिवाय शिक्षणाचा प्रसार व धनिक लोकांचें पाठबळ हीं दोन कारणें आहेतच.) बंगाली भाषा व वाङ्मय यांच्या उन्नत्यर्थ झटणारांची संख्या तिकडे पुष्कळ अधिक आहे यांत नवल नाहीं. आमच्याइकडे विलायतेहून जाऊन आलेल्या लोकांस मराठी भाषेची ओळखसुद्धां फारशी राहत नाहीं! मग त्या भाषेंतले ग्रंथ वाचण्याची किंवा तींत लेख लिहिण्याची अभिरुचि तर दूरच! बंगाल्यांत पहावें तर आय. सी. एस, आय. एम. एस. झालेले, किंवा ब्यारिस्टर आणि हायकोर्ट जज्ज सुद्धां बंगाली भाषेंत पुस्तकें व लेख लिहिण्यांत भूषण मानितात. तिकडे कायम-धाऱ्याच्या पद्धतीमुळें पुष्कळ धनिक जमीनदार व राजे महाराजे आहेत. आमच्या इकडे जमीनदार जरी नसले तरी थोडे फार धनिक व संस्थानिक आहेत. पण तिकडे वाङ्मयाप्रीत्यर्थ आपल्या संपत्तीचा अंश खर्चीं घालणाऱ्यांचें प्रमाण जसें मोठें आहे तसें आमच्या इकडे नाहीं. वंगीय साहित्य परिषदेनें प्रसिद्ध केलेल्या चाळीस पन्नास ग्रंथांपैकीं कांहीं मोठाले ग्रंथ छापण्याचा सगळा खर्च एकेकट्या जमीनदारानें दिलेला आहे! तिकडे साहित्यसंमेलनें भरतात, त्यांपैकीं कित्येकांचा सगळा खर्च अशा धनिकांकडून मिळालेला असतो. आमच्या इकडे श्री० सयाजीराव गायकवाडांसारखे कित्येक उदारधी व महाराष्ट्र भाषेचा अभिमान बाळगून तिच्या प्रीत्यर्थ सढळ हातानें खर्च करणारे संस्थानिक हाताच्या बोटांवर मोजण्याइतके सुद्धां नाहींत, हें कांहीं अंशीं आम्ही मागें पडण्याचें कारण आहे. पण उत्साहसंपत्ति तरी आमचे

अनुक्रमणिका

ठायीं कोठें आहे ? 'वंगीय साहित्य परिषदे'च्या मंदिरांत मी मुद्दाम दोन चार वेळां गेलों होतों व त्यांच्या सभांनाही हजर होतों. तेव्हां त्यांची एकी व उत्साह पाहून मला फार आल्हाद वाटला. त्या परिषदेला प्रांतिक सरकारचीही पूर्ण सहानुभूति आहे. कित्येक युरोपियन अधिकारी तिचे पेट्रन (पुरस्कर्ते) आहेत. बाबू बिपिनचन्द्रपाल, महामहोपाध्याय डॉ० सतीशचंद्र, डॉ० रासबिहारी घोष, रायबहादुर चुनीलाल बोस, मॉडर्न रिव्ह्यूचे संपादक बाबू रामानंद, हितवादीचे संपादक सखाराम बाबू देऊसकर वगैरे सर्व भिन्न भिन्न राजकीय व सामाजिक मताची मंडळी जेव्हां त्या सरस्वतीमंदिरांत अगदीं मोकळ्या दिलानें व प्रेमभावानें बंगाली वाङ्मयांतल्या गोष्टींसंबंधानें चर्चा करतांना मीं पाहिली तेव्हां मला त्यांचा हेवा वाटला, व असा योग आमच्या प्रांतांत कां येऊं नये ?—हा प्रश्न माझे मनांत सहजच उद्भवला. अजूनही मला या प्रश्नाचें गूढ पडलें आहे, तें कोणी उलगडील अशी मी आशा करतों. दुसरी गोष्ट सरकाराशीं सहकारित्वाची. साहित्यपरिषदा राजाश्रयावांचून प्राचीनकाळीं आपल्या देशांत व पाश्चात्य देशांतही चालल्या नाहींत; आणि अजूनही तीच स्थिति आहे. अव्वल इंग्रजींत मराठी भाषेचा कोश व दुसरे अनेक ग्रंथ जे एरव्हीं कधीं एखाद्याच्या हातून प्रकाशित झाले नसते ते आपल्या सरकारच्या आश्रयामुळेंच प्रसिद्ध झाले. युनिव्हर्सिटींत मराठी भाषेचा प्रवेश सररहा कधीं काळीं व्हावयाचा असेल तर तो सरकारी अधिकाऱ्यांच्या अनुकूलतेवांचून कधीं व्हावयाचा नाहीं, असें सध्याच्या स्थितीवरून ह्मणतां येईल. शाळांतून शिकविली जाणारी मराठी शुद्ध ठेवणें, तिच्या शुद्धलेखनांत निष्कारण ढवळाढवळ न करणें, ही गोष्टसुद्धां सरकारी अधिकाऱ्यांच्या मर्जीवर आहे. इतक्या सगळ्या गोष्टी दिसत असतां ती अनुकूलता संपादण्याचा यत्न आपलेकडे कोणी करीत नाहीं. बरें कोणी केलाच तर पूर्वीं येथें एका संमेलनाचेवेळीं झालेल्या अत्यंत शोचनीय प्रकारासारखे प्रयत्न करणारे निघतात, हें चमत्कारिक आहे. मुंबई युनिव्हर्सिटीनें एम.ए.—च्या परीक्षेच्या अभ्यासक्रमांत मराठीभाषेचा प्रवेश होऊं दिला, यासाठीं तिचे औपचारिक आभार मानण्याचा ठरावसुद्धां आमच्यांतल्या कित्येक शहाण्या व विद्वान् मंडळीचा स्वाभिमानाला हानिकर वाटला ! अशी स्थिति जेथें आहे तेथें साहित्यपरिषदेनें पुढें पाऊल टाकलें नाहीं अशी कुरकुर करण्यास कितीशी जागा आहे तें मला कळत नाहीं. बरें स्वावलंबनाचे तत्त्वावर कार्य करण्यास या अभिमानी मंडळीनें पुढें यावयास पाहिजे होतें. पण तेही कोणी आले नाहींत ! बंगालचे लोक एकंदरींत आमच्यापेक्षां शहाणे खरे. त्यांनीं पूर्वींपासूनच सरकारशीं सहकारिता ठेविली, त्यामुळें बंगाली भाषेचा फायदा झाला. तिकडच्या कित्येक नामांकित ग्रंथकारांना तहाहयात वर्षासनें मिळालीं; बंगाली पुस्तकें युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमांत शिरलीं; व अन्य प्रकारेंही वंगीय साहित्यपरिषदेला सरकारी अधिकाऱ्यांकडून वारंवार मदत होत असते. नुकतेच हिंदुस्थानांतल्या निरनिराळ्या प्रांतांत चारण, भाट, वगैरे जीं कवित्तें गातात त्यांचा संग्रह करण्यासाठीं सरकारानें या परिषदेमार्फत महामहोपाध्याय श्रीहरिप्रसादशास्त्री यांना पाठविलें होतें. त्यांनीं रजपुताना, गुजराथ वगैरे प्रांतांत हिंडून पुष्कळ कवित्तांचा संग्रह केला आहे, असें शास्त्रीबुवा स्वतः मला सांगत होते. काशीच्या नागरीप्रचारणी सभेनेंही या बाबतींत बंगालचा मार्ग शहाणपणानें स्वीकारल्या-

मुळें हिंदी भाषेचा सार्वजात्रिक प्रसार करण्याचा हेतु पुष्कळ तडीस गेला आहे. वंगीय साहित्यपरिषद व नागरी प्रचारणी सभा या दोघांही परिषदांनीं पुराणग्रंथशोधन, ग्रंथप्रकाशन, पुराणवस्तुसंग्रह वगैरे महत्त्वाचीं कामें करून शिवाय फंड उभारून स्वतःचीं मंदिरें उठविलीं आहेत. आह्मीं स्वाभिमानाच्या ताठ्यांत गुरफटून वाचालतेपलीकडे कांहीं केलेलें नाहीं. उलट साहित्यपरिषदेनें बडोद्यास दुसऱ्याच्या पैशानें मेजवान्या झोडल्या अशी कुत्सितपणाची टीका करण्यास आमचे लोक तयारच! आमच्या परिषदेवर आळसाचा, कर्तृत्वशून्यतेचा व दुसरे कित्येक आरोप करणारे टीकाकार शेंकडो निघाले, पण आमच्या अडचणी काय आहेत हें समजून घेण्याची खटपट एकानें तरीं कधीं केली काय? परिषदेचें काम ह्मणजे वासुदेवराव आपट्याच्या किंवा दुसऱ्या सेक्रेटरीच्या घरचें नव्हतें. मराठीभाषा आपणां सर्वांची माता आहे, तिचें तें काम आहे. त्या कामाचा बोजा एकट्या सेक्रेटरीवरच कां टाकावा? इतरांनीं कंबरा बांधून सेक्रेटरी नालायक असले तर त्यांना दूर होण्यास सांगून तें काम कां केलें नाहीं? आह्मी कांहीं विद्वानांच्या परिश्रमानें कांहीं कांहीं शास्त्रांतल्या पारिभाषिक शब्दांचा कोश लिहून तयार केला, व त्याच्या नकला करून त्या त्या विषयांतल्या पारंगत लोकांकडे पाठविल्या. पण पंचवीस पानांचा हस्तलेख तपासून पाठविण्यास परीक्षकांना दोन दोन वर्षांत सवड झाली नाहीं! याचा दोष कोणाकडे? सध्याच्या आमच्या स्थितींत परिषदेच्या हातून होण्यासारखी कांहीं भाषासेवा असल्यास सुचवा, अशीं विनंतिपत्रें मीं आपल्या हातानें लिहून कित्येकांना पाठविलीं. पण एकानेंही बरीवाईट सूचना केली नाहीं! इतका तर आमच्या लोकांत उत्साह व खरी कळकळ आहे. अशी सर्व तऱ्हेनें प्रतिकूल स्थिति असतांही आह्मी शास्त्रीय परिभाषा व अप्रकाशित मराठी काव्यांची यादी, बडोदें संमेलनाचा रिपोर्ट (१९ अगदीं नव्या निबंधांसुद्धां) व राजवाडे यांच्या ऐतिहासिक साधनांचा १० वा खंड हीं प्रसिद्ध केलीं. आणि अजूनही सरकारशीं सहकारित्वानें वागणारी व उत्साहानें व खऱ्या कळकळीनें मदत करणारी मंडळी पुढें आल्यास मी माझ्या अल्प शक्तीप्रमाणें थोडी तरी कामगिरी करून दाखवीन अशी मी उमेद बाळगतों.

आतां शेवटीं आंध्रपरिषदेनें केलेल्या एका चांगल्या उपक्रमासंबंधानें दोन शब्द सांगून मी आपलें चऱ्हाट पुरें करतों. आंध्रदेशांत जुने संस्कृतज्ञ असे कांहीं पंडित आहेत. त्यांच्या पांडित्याचा आंध्र भाषेला उपयोग करून घेण्यासाठीं व जुन्या पंडितांना नवें पाश्चात्य तऱ्हेचें थोडेंसें वळण लावणें इष्ट आहे ह्मणून, त्या परिषदेनें त्यांना संमेलनाला निमंत्रण करून त्यांची सहानुभूति व साह्य मिळविण्याचा उपक्रम केला आहे, तो माझ्या मतें फार चांगला आहे. आपल्या इकडेही तसा कांहीं प्रयत्न केल्यास जुन्या शास्त्री वगैरे लोकांच्या न्याय, व्याकरण, अलंकार, धर्मशास्त्र, मीमांसा इ० शास्त्रांतल्या पारंगततेचा मराठी भाषेला प्रौढत्व आणण्यास व तिच्यांत शब्दसंपत्तीची भर टाकण्यांत बराच उपयोग होईल असें वाटतें. अव्वल इंग्रजी अमदानींतले पुष्कळसे मराठी ग्रंथकार संस्कृतांत चांगले व्युत्पन्न होते; आणि म्हणूनच त्यांच्या हातचे पुष्कळसे ग्रंथ चांगले उतरले आहेत. हल्लीं संस्कृताचें ज्ञान उथळ झाल्यामुळें पुष्कळ संस्कृत शब्द मराठींत विकृत आणि अशुद्ध रूपानें लोक योजीत असतात. ही भाषेची विटंबना या प्रयत्नानें अंशतः तरी कमी होईल. इतकें सांगून आणि कांहीं प्रसंगीं मी निष्ठुरपणानें बोललों असल्यास त्याबद्दल क्षमा मागून मी आपली रजा घेतों.

पुस्तकपरीक्षा.

गृहिणी-भूषण.

(मागील अंकावरून समाप्त.)

पांचव्या लेखांत, मुलीला शिक्षण देण्यापूर्वीं आईबापांनीं कोणचा विचार केला पाहिजे, याबद्दल विवेचन केलें आहे. या लेखावरून ग्रंथकर्त्रींच्या विचारांची अपरिपक्क दशा मात्र स्पष्टपणें दिसून येत आहे. "मला वाटतें" ग्रंथकर्त्री लेखाच्या आरंभींच लिहितात, "स्त्रीशिक्षण, स्त्रीशिक्षण ह्मणून ओरडणाऱ्या बंधुभगिनीवर्गानें विशेषसा विचार करून ही ओरड केलेली नाहीं. पूर्वीं मुली शिकलेल्या असत, व हल्लीं पाश्चात्य राष्ट्रांतही आहेत, ह्मणून आपणही कराव्या, एवढाच या बोलण्याचा हेतू असावा; कारण स्त्रीशिक्षण ह्मणून ओरडणाऱ्यांना, किंवा या ओरडीच्या भरांत मुलींना शिक्षण देण्यास आरंभ करणाऱ्यांना, हल्लींच्या काळीं शिक्षण मिळालेल्या प्रौढ मुलींस योग्य वर मिळण्यास तिच्या पालकांस किती त्रास भोगावा लागतो याची कल्पना नसते असें मला वाटतें."

सुमारें चाळीस वर्षांपूर्वीं जेव्हां महाराष्ट्रांत सामाजिक सुधारणेची व त्याबरोबरच स्त्रीशिक्षणाचीही चळवळ उत्पन्न झाली, त्यावेळेस ग्रंथकर्त्रींनीं वर लिहिलेली स्थिति शक्य असेल. ह्मणजे, त्यावेळेस शिकलेल्या मुलींना योग्य वर मिळण्यासाठीं आईबापांस त्रास पडला असेल. पण हल्लीं स्त्रीशिक्षणाचा प्रसार जसजसा अधिकाधिक होत चालला आहे, तसतशी सर्वत्र शिकलेल्या मुलींबद्दलच अधिकाधिक मागणी होत चालली आहे. पुराणमतवादी (orthodox) लोकांचा वर्ग सोडून द्या; पण सुशिक्षित लोकांचा—ज्यांना विश्वविद्यालयाचें शिक्षण मिळालें आहे—वर्ग पाहिला असतां त्यांजकडून शिक्षण मिळालेली वधूच प्रथम पसंत केली जाते;—इतकेंच नव्हे तर मुलगी पहावयास गेलें असतां, तिच्याकडून वाचून घेणें, ही एक अवश्यच गोष्ट होऊन बसली आहे. आणि जों जों मुलीचें शिक्षण अधिक, तों तों तिला अधिक उत्तम स्थळ मिळण्याचा संभव असतो. ही स्थिति लक्षांत आणिली असतां सौ. गिरिजाबाईंचें वरील विधान प्रस्तुत काळास लागू पडत नाहीं हें आपणांस स्पष्ट दिसून येईल.

स्त्रीशिक्षणवाद्यांवर ग्रंथकर्त्रींनीं जो अविचारीपणाचा आरोप केला आहे, तो कोणच्या आधारावर केला आहे तें समजत नाहीं. न्या. मू. रानडे, रा. आगरकर वगैरे विद्वान् लोक स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते होते, आणि हल्लीं सुद्धां ना. गोखले, न्या. मू. चंदावरकर यांसारखे सन्माननीय पुढारी स्त्रीशिक्षणाचे पाठीराखे आहेत. रानडे, आगरकरादि विभूतींनीं जी स्त्रीशिक्षणाबद्दल ओरड केली, तिचेंच फळ हल्लींचा स्त्रीशिक्षणाचा प्रसार होय. या सर्व लोकांस अविचारी ठरवावयाचें कीं काय ? आणि तें तरी कां ?—शिकलेल्या मुलींना वर मिळावयास प्रथम त्रास पडला ह्मणून ? मग याचप्रमाणें प्राटेस्टंट लोकांचा सर्वत्र अतोनात छळ झाला

ह्मणून, किंवा ख्रिस्तीलोकांचा पालेस्ताईनमध्यें अतोनात छळ झाला ह्मणून, अनुक्रमें मार्टिन लूथर व जीसस् क्राईस्ट यांनाही अविचारी कां ठरवूं नये ? कोणचीही चांगली गोष्ट समाजांत सुरू करावयाची ह्मणजे लोकांकडून त्रास हा व्हावयाचाच. त्या त्रासाला जर आपण भ्यालों, तर ती चांगली गोष्ट सुरू कशी होणार? ज्यास मनोधैर्य ह्मणतात तें हेंच होय. शिकलेल्या स्त्रियांना प्रथम प्रथम जुन्यामताच्या बायकांकडूही फार त्रास होत असतो. पण अंतिम हिताकडे लक्ष देऊन आपण तो सोसला पाहिजे. जर आपलें मत खरें असेल, तर कांहीं कालानंतर तरी लोक त्याचा "सत्यमेवजयते" या न्यायानें स्वीकार करतीलच; व मग आपणाला त्यांजकडून प्रथम जो त्रास भोगावा लागला त्याचें परिमार्जन होईल. याची सत्यता स्त्रीशिक्षणाचे बाबतींत स्पष्टपणें दिसून आली आहे. आधीं स्त्रीशिक्षणाभिमान्यांस किती त्रास भोगावा लागला, स्त्रीशिक्षणाविरुद्ध बहुजनसमाजाचे किती मूर्खपणाचे आरोप होते, शिकणाऱ्या स्त्रियांस लोकांनीं कसें छळलें, याची जर कोणाला यथार्थ कल्पना हवी असेल, तर त्यांना सौ. काशीबाई कानिटकर–कृत "डा. सौ. आनंदीबाई जोशी इचें चरित्र" व श्री. रमाबाई रानडे–कृत "आमच्या आयुष्यांतील आठवणी" हीं दोन पुस्तकें वाचण्याची आह्मी शिफारस करितों. पण आतां अत्यंत पुराणमतवादी लोकसुद्धां स्त्रियांना थोडेंसें लिहिण्यावाचण्यास कांहीं हरकत नाहीं असें ह्मणूं लागले आहेत! शिकलेल्या मुलींना स्थळें मिळण्यास पूर्वीं पंचाईत पडत असे ती आतां पडेनाशी झाली, इतकेंच नव्हे तर त्यांना उलट मागण्या येऊं लागल्या, हा परिणाम कशाचा? आमच्या आधींच्या स्त्रीशिक्षणाभिमान्यांनीं लोकांकडून जो त्रास सोसला, त्याचा नव्हे काय ? त्यांनीं जर आमच्या विदुषींच्या उपदेशाप्रमाणें भिऊन माघार खाल्ली असती, तर आजमितीस स्त्रीशिक्षणाचा जो प्रसार झाला आहे तो झाला असता काय? अद्यापही जर स्त्रीशिक्षणास कोठें विरोध होत असेल, तर तो फारच अल्प आहे; व आपण आपल्या आधींच्या सुधारकाग्रणींचा कित्ता गिरविला असतां तोही लवकरच नाहींसा होईल. स्त्रीशिक्षणाबद्दल प्रयत्न करणारांवर ग्रंथकर्त्रींचा असा एक आरोप आहे कीं, ते स्त्रीशिक्षणाची ही जी चळवळ करितात, ती केवळ पाश्चात्यांचें अनुकरण ह्मणून, किंवा प्राचीनकाळीं आपल्याकडे मुली शिकलेल्या असत ह्मणून होय; स्वतः विचारपूर्वक नव्हे. असें ह्मणणें ह्मणजे आमच्या मतें स्त्रीशिक्षणाभिवृद्ध्यर्थ ज्यांनीं दीर्घ प्रयत्न केले त्यांचा मोठा अन्याय करणें होय. स्त्रीशिक्षणाची चळवळ पाश्चात्य ज्ञानाची ज्योति इकडे चमकल्यावरच सुरू झाली, ही गोष्ट जरी खरी आहे, तरी, केवळ युरोपियन स्त्रिया शिकलेल्या आहेत ह्मणून आपल्याही असाव्या या हेतूनेंच ती उत्पन्न झाली, असें विधान करणें ह्मणजे स्त्रीशिक्षणवाद्यांच्या हेतूंचा कुत्सित बुद्धीनें विपर्यास करणें होय. पूर्वीं परकीयांच्या वारंवार होणाऱ्या स्वाऱ्यांमुळें देशांत सर्वत्र अस्वस्थता पसरली, व कोणाचीही सुरक्षितता राहिली नाहीं. त्यामुळें प्रत्येक स्त्रीला तिच्या लहान वयांतच एकेक

अनुक्रमणिका

रक्षक देणें भाग पडून प्रौढविवाह बंद करावा लागला असावा. त्याचा परिणाम लागलीच स्त्रीशिक्षणाचा लोप होण्यांत झाला. आणि या कष्टमय स्थितींतच आपलीं अनेक शतकें लोटल्यामुळें, या सर्व गोष्टी कायम होऊन बसल्या. स्त्रीशिक्षणाच्या अभावामुळें जरी आपल्या कुटुंबसौख्याचा सारखा ऱ्हास होत होता, तरी देशांतील राजकीय अस्वस्थतेमुळें तिकडे कोणाचें लक्ष गेलें नाहीं. पण पुढें इंग्लिशांचा अंमल बसून सर्वत्र शांतता झाल्यावर लोकांचें लक्ष क्षात्रधर्मापासून पुनः विद्येकडे वळूं लागलें, तेव्हां मात्र कुटुंबसौख्याची झालेली हानि आपणांस दिसूं लागली. मुसलमानांच्या स्वाऱ्या होण्याच्या आधींची आपली गृहस्थिति, युरोपिअन लोकांची गृहस्थिति, आणि स्त्रीशिक्षणाच्या अभावीं असलेली आपली हल्लींचीं गृहस्थिति, यांत फार मोठें अंतर दिसूं लागलें, व ह्मणून स्त्रीशिक्षणाच्या अभिवृद्ध्यर्थ प्रयत्न सुरू झाले. केवळ पाश्चात्यांचें अनुकरण ह्मणून नव्हे. या सर्व गोष्टींचा विचार न करितां, रानडे, आगरकर अशा पूज्य लोकांवर,–ज्यांनीं स्त्रीशिक्षणाच्या अभिवृद्ध्यर्थ आजन्म जिवापाड श्रम केले, ज्यांनीं आपल्या इष्ट हेतूंसाठीं लोकांचा हवा तो छळ सोसण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं, अशा वंदनीय व्यक्तींवर,–त्यांनीं स्त्रीशिक्षणाची चळवळ पाश्चात्यांचें अनुकरण ह्मणून सुरू केली, ते अविचारी होते, असे आरोप बेधडक करणें, यापेक्षां अधिक मोठा अविचार आणि धाडस तें कोणतें असावयाचें आहे?

ग्रंथकर्त्री पुढें ह्मणतात, " हल्लीं मुली शिकलेल्यासवरलेल्या अशा मोठ्या वाढविल्या ह्मणजे त्यांना वरण्यास चांगल्या कुळांतील योग्य वर तयार होत नाहीं''''''''अशा मुलींसाठीं एकादा जख्खड ह्मातारा बायकोसाठीं हपापलेला असा, किंवा १०–१२ रु. पगारवाला पोरगेलासा व सडा असा कारकून बघून देणें भाग पडतें. " येनकेन प्रकारेण आपलें मत स्थापित करण्यासाटीं असें धडधडीत खोटें विधान करतांना आमच्या विदुषींना कांहींतरी दिक्कत वाटावयास हवी होती. जख्खड ह्मातार्‍याशीं किंवा आपल्याहून कमी प्रतीच्या बुद्धिमत्तेच्या पुरुषाशीं लग्न करण्यापेक्षां सुशिक्षित स्त्री आजन्म अविवाहित राहील एवढें सुद्धां तर्कज्ञान ग्रंथकर्त्रीस असूं नये काय? आह्मीं वर ह्मटलेंच आहे कीं, ज्यावेळीं स्त्रीशिक्षणास प्रथम नुकताच आरंभ झाला होता त्यावेळीं ही स्थिति कदाचित् होती शकेल. पण हल्लीं तशी मुळींच नाहीं; आणि याचें उत्तम उदाहरण ह्मणजे, दोनवर्षांपूर्वी झालेला श्री. सांगलीकरांचा विवाह होय. अनेक रूपवान् मुली सांगून आल्या असतां, सर्वांहून हल्लींचीच पत्नी त्यानीं पसंत करण्याचें कारण काय? श्री सौ० सरस्वतीबाईंना मिळालेलें उत्तम शिक्षण, व त्यामुळें त्यांच्या मनावर झालेला सुसंस्कृत परिणाम, यामुळेंच त्या हल्लींच्या श्रेष्ठपदावर चढल्या नाहींत काय? तसेंच आधुनिक पदवीधरांचा कल कोणती वधू पसंत करण्याकडे असतो, हें पाहिलें असतांही बाईंच्या या विधानाची असत्यता सहजीं कळून येणार आहे. ग्रंथकर्त्रींनीं हुंड्याबद्दल जी टीका केली आहे, ती योग्य आहे. पण हल्लींच्या तरुण पिढींत हुंड्याबद्दल बराच तिरस्कार दिसून येत आहे,

अनुक्रमणिका

आणि हें हुंड्याचें खूळ आपल्या समाजांतून गेल्याचा मंगलकारक दिवस लवकरच दृष्टीस पडण्याचीं सुचिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं आहेत. सभांमधून हुंड्याचा तिरस्कार करून, स्वतःला बडे सुधारक ह्मणून मिरवून, आपल्या मुलाच्या किंमती लावणारे कांहीं लोक आहेत; नाहींत असें नाहीं. पण त्यांचेबद्दल आतां कोणालाही अभिमान वाटत नाहीं.

याप्रमाणें स्त्रीशिक्षणाभिमान्यांवर यथेच्छ प्रहार करून, व स्त्रीशिक्षणाच्या वृद्धीस आवश्यक अशा प्रौढविवाहाविरुद्ध हवीं तितकीं मनसोक्त खोटीं विधानें करून, ग्रंथकर्त्रीनीं पुन्हा लागलीच वाचकांस पुढील सूचना दिली आहेः— "आतां या वरील विचारांवरून मला कोणी स्त्रीशिक्षणाविरुद्ध आहें, असें समजूं नये. स्त्रियांना शिक्षण हवें, व राष्ट्रोन्नतीला त्याची फार अवश्यकता आहे, असें माझेंही मत आहे." ग्रंथकर्त्रींना प्रौढविवाह नको व स्त्रीशिक्षण मात्र पाहिजे हें कसें? ज्याप्रमाणें वृक्षाच्या वृद्धीस पाण्याची आवश्यकता आहे, त्याप्रमाणेंच स्त्रीशिक्षणाच्या वृद्धीस प्रौढविवाहाची आवश्यकता आहे. याप्रमाणें या दोहोंचा निकटतम संबंध असतां, एक पाहिजे आणि एक नको असें होणें शक्य नाहीं. स्त्रीशिक्षणाची राष्ट्रोन्नतीला फार आवश्यकता आहे ही गोष्ट सौ. गिरिजाबाईनाही कबूल आहे. पण आह्मीं त्यांना असें विचारितों कीं, नुसतें र ट फ करणें याला शिक्षण ह्मणतां येईल काय? आणि दहा वर्षांच्या मुलीला कितीसें शिक्षण मिळूं शकेल? फार झालें तर मराठी तीन इयत्तांपर्यंत, अशी खुद्द ग्रंथकर्त्रींनींच कबुली दिली आहे. पण एवढ्या शिक्षणानें राष्ट्रोन्नति करूं पाहणारांत, आणि मधाच्या एका थेंबानें समुद्र गोड करणाऱ्या भर्तृहरीच्या मूर्खांत, काय फरक आहे?

मुलीला शिक्षण देण्यापूर्वी ज्या दोन गोष्टींचा विचार करण्याबद्दल ग्रंथकर्त्रींनीं आईबापांस उपदेश केला आहे, त्या याः—

१. जर मुलीला योग्य पति मिळाला नाहीं, तर तिची साऱ्या जन्माची व्यवस्था लावण्याची हमी आह्मी घेऊं.

२. लोकापवाद सोसण्यास आह्मीं तयार होऊं व तिचें मन तयार करूं.

ग्रंथकर्त्री जगाच्या मागें पन्नास वर्षें आहेत असें ह्मटलें पाहिजे. कारण हल्लीं स्त्रीशिक्षणाला लोकमत किती अनुकूल झालें आहे याची प्रतीति मुलींच्या शाळांच्या वाढत्या प्रमाणावरून स्पष्ट दिसून येत आहे. शिकलेल्या मुलींना योग्य वर मिळण्यास अल्पही त्रास पडत नाहीं, असा लोकांना अनुभव येत आहे; आणि स्त्रीशिक्षणाच्या प्रसाराबरोबरच लोकापवादाचाही लोप झाला आहे. यामुळें हल्लींच्या स्थितींत आईबापांना, मुलीला शिक्षण देण्यापूर्वीं, वरील दोन गोष्टींचा विचार करण्याचें कारणच उरलेलें नाहीं. तथापि ज्यांना बऱ्याच मोठ्या वयापर्यंत मुली अविवाहित ठेवावयाच्या असतील त्यांना मात्र लोकापवादाचें थोडेंसें भय आहे. कारण चौदा वर्षांपर्यंत अविवाहित मुली पाहण्याची आमच्या समाजास संवय झाली आहे. पण सोळा वर्षांपेक्षां अधिक मोठ्या कुमारिका अद्यापि फारशा दृष्टीस पडत नसल्यामुळें, अशा मुलींच्या आईबापांस मात्र थोडासा लोकापवाद सोसावा लागेल. पण ज्याप्रमाणें ८ वर्षांची मर्यादा

अनुक्रमणिका

१४ वर्षांवर येऊन बसली, त्याचप्रमाणें कालांतरानें हीही मर्यादा वाढेल, आणि ब-याच मोठ्या कुमारिका दृष्टीस पडूं लागल्या ह्मणजे हें लोकापवादाचें भयही नाहींसें होईल.

ग्रंथकर्त्रीच्या ह्मणण्याप्रमाणें, मुलींचीं लग्नें १०।१२ वर्षांच्या सुमारास केल्यास दुसराही एक तोटा होणार आहे. हल्लीं ब-याच विद्यार्थ्यांची निदान शिक्षणक्रम पुरा होईपर्यंत तरी अविवाहित राहण्याकडे प्रवृत्ति दिसून येते. आणि हल्लींच्या परिस्थितीचा विचार करितां ही गोष्ट मोठी अभिनंदनीय आहे यांत शंका नाहीं. यामुळें आतांशा बरेच अविवाहित तरुण पदवीधरं दिसूं लागले आहेत. याप्रमाणें मुलांच्या विवाहाच्या वयाची यत्ता वाढली असतां मुलींच्याही वयाची यत्ता न वाढविणें हे मोठें अनर्थावह आहे. अलीकडे जरी १३।-१४ वर्षांपर्यंत मुली अविवाहित राहतात, तरी, ऋतुप्राप्तीच्या पूर्वीं मुलीचें लग्न झालेंच पाहिजे अशी लोकांची समजूत असल्यामुळें, वधूवरांच्या वयांत साहजिकच फार मोठें अंतर पडतें. वर पहावा तो चांगला २४।२५ वर्षांचा ग्रॅज्युएट्र झालेला, पण वधू मात्र १२।१३ वर्षांची, असे विषम विवाह हल्लीं बरेच दृष्टीस पडतात. वैद्यकीय दृष्ट्या ही स्थिति फार अनर्थकारक आहे. अशा रीतीनें जर क्रम पुढें चालू राहिला तर विषम विवाहाचे दुष्परिणाम आपल्या समाजांत लवकरच दिसूं लागतील. असा अनिष्ट प्रकार न होऊं देण्यास दोनच उपाय आहेत. पहिला,मुलांचीं लग्नें त्यांच्या लहान वयांत त्यांचा शिक्षणक्रम पुरा होण्यापूर्वींच करणें; किंवा दुसरा, मुलांच्या वयाबरोबरच मुलींचीं वयें वाढविणें. पहिला उपाय अमलांत येणें आतां इष्टही नाहीं, आणि शक्यही नाहीं. स्वतःला पैसा मिळूं लागेपर्यंत अविवाहित राहण्याची जी विद्यार्थ्यांची प्रवृत्ति होत आहे, ती सर्वथैव इष्ट असून तिचा बींमोड करणें अत्यंत अविचारीपणाचें होणार आहे; शिवाय हें करूं असें कोणीं ह्मटल्यास तेंही अशक्यच आहे. ह्मणून पहिल्या उपायाच्या अभावीं दुस-या उपायाचेंच,–ह्मणजे मुलांच्या वयाबरोबरच मुलींचीं वयें वाढविणें याचेंच, आपणांस अवलंबन केलें पाहिजे.

सहाव्या लेखांत ग्रंथकर्त्रींनीं " अर्वाचीन स्त्रीशिक्षणाचे परिणाम " वर्णिले आहेत. त्या प्रथम ह्मणतात कीं, हल्लीं मुलींना जें पाश्चात्य रीतीचें मुलांप्रमाणेंच शिक्षण देण्यांत येत आहे त्यामुळें एक मोठें भयंकर नुकसान होणार आहे. तें नुकसान हें कीं पाश्चात्यराष्ट्रांत हल्लीं स्त्रियांनीं जी राजकीय हक्कांसाठीं चळवळ चालविली आहे तीच चळवळ आपल्याकडेही उत्पन्न होण्याचा संभव आहे. दुसरें असें कीं, असें–ह्मणजे अर्थातच उच्च–शिक्षण दिल्यानें स्त्रियांना लग्न करणें आवडत नाहीं, आणि मग त्यामुळें संततीची तूट पडेल. पाश्चात्य राष्ट्रांतून ही स्थिति दिसून येत आहे; व यामुळें तिकडील विचारी (?) माणसांचीं मनें घाबरून गेलीं आहेत. पोकळ स्त्रीशिक्षणाभिमान दाखवून व्यर्थ ढोंग करणा-या लोकांचा स्त्रियांना उच्च शिक्षण देण्याविरुद्ध हा एक ठरीव आक्षेप आहे. याला आह्मीं मागें उत्तर दिलेंच आहे, व तेंच येथें पुन्हां देणार. स्त्रियांना पुरुषाप्रमाणें शिक्षण दिलें, ह्मणजे

अनुक्रमणिका

जरूरीपेक्षां अधिक संतति उत्पन्न करण्याचे तोटे त्यांना समजून येतात. यामुळें तिकडील कित्येक स्त्रिया विवाहबंधनापासून दूर राहिल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. आतां या कारणास्तव जर तिकडील देशांत बालकांच्या उत्पत्तीचें प्रमाण कमी झालें असेल, तर त्यामुळें त्यांचा कांहींच तोटा झालेला नसून, राष्ट्रांत माणसांची व्यर्थ भरती न झाल्यामुळें सर्वांचे, आपल्याप्रमाणें, खावयाचे हाल मात्र होत नाहींत. पण इकडे मात्र आपण अन्नास मोताद होत चाललों असतांना, स्त्रियांस अज्ञानांत ठेवून किंवा तुटपुंजें शिक्षण देऊन, त्यांचेकडून प्रजोत्पादनाचें काम करून घेऊन, खावयाचीं तोंडें मात्र वाढवून, आपण स्वतःचे व्यर्थ हाल करवून घेत आहोंत. आतां राजकीय हक्कांसंबंधीं पाहिलें तर "आडांतच नाहीं, मग पोहोऱ्यांत कोठलें ?" या न्यायानें आह्मांसच जर कांहीं राजकीय हक्क नाहींत तर आमच्या स्त्रियांस त्यासाठीं आमच्याशीं भांडून काय मिळणार आहे ? बरें, जर त्या हक्कांसाठीं खुद्द राज्यकर्त्यांशींच भांडावयाची त्यांची तयारी झाली, तर फारच उत्तम ! आह्मां पुरुषांस या कामीं नवें साहाय्य मिळेल, आणि आमच्या ध्येयप्राप्तीचा मार्ग आह्मांस अधिक सुकर होईल !!

अर्वाचीन शिक्षणावर ग्रंथकर्त्रींचा दुसरा असा एक आरोप आहे कीं, त्यामुळें स्त्रिया " स्वच्छंदी, स्वतंत्र विचाराच्या, मनःप्रमाणें वर्तन करणाऱ्या अशा निघतात." हल्लीं आपणांस अशा कांहीं स्त्रिया आढळून येतात ही गोष्ट यद्यपि खरी आहे, तथापि याचा सर्व दोष बाईंनीं स्वमतप्रतिपादनाच्या भरांत केवळ अर्वाचीन शिक्षणावरच लादलेला आहे हें आमच्या मतें अगदीं गैर होय. जर स्त्रियांना सांगोपांग शिक्षण दिलें तर असा परिणाम क्वचितच आढळून येईल. हल्लीं जर सुशिक्षित ह्मणून ह्मटल्या जाणाऱ्या कांहीं स्त्रिया अशा उद्धट व स्वतंत्र विचाराच्या असतील, तर तो दोष त्यांस मिळालेल्या अर्धवट शिक्षणाचा होय. अर्धवट शिक्षणाचा परिणाम असाच व्हावयाचा. भर्तृहरीनें ह्मटलें आहे कीं, "ज्ञानलव दुर्विदग्धं ब्रह्मापि नरं न रंजयति." अर्वाचीन शिक्षणांत कांहीं दोष आहेत, नाहींत असें नाहीं. पण यथासांग शिक्षणाचा परिणाम मनाच्या सुसंस्कृतेंत आणि विकासांत झाल्याशिवाय कधींही राहणार नाहीं.

यापुढील ग्रंथकर्त्रींचा मुद्दा असा आहे कीं, हल्लींची पिढी पूर्वींपेक्षां अधिक कमी दर्जाची व अधिक अशक्त झाली आहे. त्यांतच शिक्षणाची भर पडल्यामुळें प्रकृतीवर अधिकच वाईट परिणाम होतो. याप्रमाणें जर अति अध्ययनानें आमच्या स्त्रिया दुर्बल झाल्या तर पुरुष त्यांच्यावर भुलून जाणार नाहींत, व त्यांच्याशीं लग्नें करणार नाहींत. आपल्या या ह्मणण्याला बाईंनीं स्पेन्सरसाहेबांचा आधार दिला आहे. हे स्पेन्सरसाहेब ह्मणतात—"तरतरीत तोंडवळा, हंसत मुख, व पाणीदार नेत्र असतील तरच पुरुष स्त्रीवर भुलेल........आणि शरीरस्वच्छता असली तरच पाणीदार तोंडवळा व चंचलता हीं येतात." याप्रमाणें पुरुष भुलण्याचीं साधनें जर सर्व शरीरस्वच्छतेवरच अवलंबून आहेत, तर अति अध्ययनानें त्यांवर कांहींच परिणाम होणें शक्य नाहीं. कारण अति अध्ययन करणारी

अनुक्रमणिका

स्त्री अस्वच्छ खास राहणार नाहीं. शिवाय हें सर्व अति अध्ययनाबद्दल आहे, आणि आपला येथें शिक्षणासंबंधीं प्रश्न आहे. आमच्या अल्पमतीस तरी शिक्षण ह्मणजे अतिअध्ययन आहे असें वाटत नाहीं.

पतिपत्नी समान अभिरुचीचीं असलीं ह्मणजे त्यांचें वैवाहिक आयुष्य सुखांत जातें असा सामान्यतः सिद्धांत आहे. पण सौ. गिरजाबाईचें मत त्याविरुद्ध दिसतें, व आपलें मत सिद्ध करण्यासाठीं त्यांनीं एक गोष्टही दिली आहे. आपण पाश्चात्य राष्ट्रांत पुष्कळदां असें पाहतों कीं, समान व्यवसायांतील स्त्रीपुरुष एकमेकांशीं लग्न करितात. आणि त्याचा फायदा असा होतो कीं, नवराबायकोंची परस्परांला व्यवसायांत मदत होऊन, संसाराचा गाडा सुयंत्र चालून, शिवाय त्या धंद्याचीही प्रगति होते. डाक्टर डाक्टरणीशीं लग्न करितात, शास्त्रज्ञ शास्त्राची गोडी असणाऱ्या स्त्रीसच आपली सहधर्मचारिणी करितो, आणि वाङ्मयाचा व्यासंग करणारा पुरुष आपल्याप्रमाणें अभिरुचि असलेल्या स्त्रीसच धर्मपत्नी निवडतो. आणि हें स्वाभाविकच आहे. नाहीं तर “ तक्षेन तक्षमयसा घटनाय योग्यम् ” हा न्याय खोटा ठरला असता. आपलेकडे असें नसल्यामुळें, स्त्रियांकडून पुरुषांना त्यांच्या व्यवसायांत जी मदत व्हावयास पाहिजे, ती होत नाहीं. ग्रंथकर्त्रींनींच मागें ह्मटलें आहे कीं, “ पुरुषांना जेवणाखेरीज आपल्या मुलांबाळांशीं व पत्नीशीं बोलण्यास अवघे दोन तास देखील सांपडत नाहींत. ” याचें कारण काय बरें ? पत्नीला पतीच्या व्यवसायांतील अल्पसुद्धां माहिति नसल्यामुळें, तिला त्याला कांहीं मदत करितां न येऊन स्वस्थ बसावें लागतें, आणि पतीचा सर्व वेळ आपल्या उद्योगांत गेल्यामुळें त्याला घराकडे पाहण्यास काडीचीही फुरसत होत नाहीं, हेंच नव्हे काय ? जर सौ. गिरिजाबाईंच्या गोष्टींतल्या प्रोफेसरांनीं रसायनशास्त्राची गोडी असलेल्या मुलीशींच लग्न केलें असतें, तर त्यांना त्यांच्या कामांत तिची पुष्कळच मदत झाली असती, आणि काय सांगावें, कदाचित् आपल्या पत्नीच्या साहाय्यानें त्यांना आपल्या आवडत्या शास्त्रांत कांहीं नवीन शोधही लावतां आले असते.

ग्रंथकर्त्रींनीं पुढें हल्लींच्या स्त्रियांच्या पराधीनतेचें व दुर्बलतेचें जें वर्णन केलें आहे तें बरोबर आहे. आणि याचें कारण त्यांच्या मतें अभ्यास व गृहकृत्य हें समयावच्छेदेंकरून करणें होय. हें कारण असणें शक्य आहे. आणि ही स्थिति सुधारण्यासाठींच बालवयांत अभ्यास व तारुण्यांत गृहकृत्य अशी वांटणी झाली पाहिजे. हल्लीं आमच्या स्त्रियांस तारुण्य ह्मणजे काय हें ठाऊकच नाहीं. शिशुपणाचा उंबरठा ओलांडून तारुण्याच्या सुंदर उपवनांतील एकादी झुळुक तिला लागते न लागते तोंच तिचे कपाळीं मातृपद येतें! या अल्पवयांतील मातृत्वाचा परिणाम पुढें अकालीं वार्धक्यांत झाला तर त्यांत आश्चर्य तें काय? व याप्रमाणें एका अर्धांगाची स्थिती झाली असतांना दुसऱ्या अर्धांगाच्या—ह्मणजे पुरुषांच्याही—अंगांतील, कर्तृत्वाचा लय होऊन तशीच स्थिति झाल्यास त्यांत नवल नाहीं.

इतका वेळ आह्मीं जें सहा लेखांचें परीक्षण केलें त्यावरून वाचकांस या पुस्तकाची

अनुक्रमणिका

व ग्रंथकर्त्रीच्या विद्वत्तेची बहुधा कल्पना झाली असेलच. यापुढील लेखांचें सुद्धां इतक्याच बारकाईनें विवेचन करणें ह्मणजे केवळ चर्वितचर्वणच होणार आहे. तथापि हें परीक्षण अर्धेच सोडून देणेंही योग्य होणार नाहीं. ह्मणून पुढील लेखांचा शक्य तितक्या थोडक्यांत विचार करून हा बराच लांबलेला लेख पुरा करूं. सातव्या लेखांत ग्रंथकर्त्रीनीं स्त्रियांस योग्य शिक्षण कोणतें याचा विचार केला आहे. याठिकाणीं त्यांनीं स्त्रीशिक्षकांच्या जरूरीवर विशेष जोर दिला आहे, आणि तो आम्हांस पसंत आहे. पण मागील लेखांत बाईंचे जे विचार बाहेर पडले आहेत, त्यांची आणि या विचाराची सांगड घालतांना काय चमत्कार होतो तो पहा. ग्रंथकर्त्रीनीं मागें प्रत्येक मुलीचें दहाव्या वर्षीं लग्न व्हावें असा नियम घालून दिलेला वाचक विसरले नसतीलच. स्त्रीचें लग्न झालें ह्मणजे तिचा सारा वेळ गृहशकट हांकण्यांतच जाणार हें निर्विवाद आहे. मग शिक्षकाचें काम करावयास ज्या स्त्रिया पाहिजेत, त्यांचे मागें संसाराचा लकडा उपयोगी नाहीं हें सिद्ध होतेंच. आतां अशा स्त्रिया एक अविवाहित तरी असल्या पाहिजेत किंवा गतमर्तृका तरी पाहिजेत. पण प्रत्येकीचें दहाव्या वर्षीं लग्न व्हावयाचें असल्यामुळें मोठ्या कुमारिका सांपडणें शक्य नाहीं. बाकी राहिल्या विधवा. यांपैकीं सुद्धां ज्या मोठेपणीं या स्थितीला आल्या असतील, त्यांचे मागें मुलाबाळांचा व्याप असणारच. तेव्हां शिक्षकिणीच्या कामाला योग्य बालविधवाच राहिल्या. प्रस्तुतकालीं आपल्या समाजांत अशा स्त्रियांचा जो मोठा वर्ग आहे, त्याजकडे हें काम देणें फारच योग्य होईल; पण पुढेंसुद्धां यांची जागा घ्यावयाला पुनः बालविधवाच पाहिजेत, असें, ग्रंथकर्त्रीच्या मागील पुढील विधानांचा विचार करितां दिसून येत नाहीं काय ? याप्रमाणें बालविधवांचा दुर्दैवी वर्ग समाजांतून नाहींसा करण्याचा अल्पही प्रयत्न न करितां, उलट त्याची आवश्यकता आहे, असें मोठ्या गांभीर्यानें प्रतिपादणें,–आणि तेंही एका स्त्रीनें,–हें मानुषी आहे कीं राक्षसी आहे याचा विचार करणें आह्मीं वाचकांवरच सोंपवितों.

यापुढें, ग्रंथकर्त्रीनीं, मुलींना शिक्षण कोणतें द्यावें याबद्दल जे आपले विचार प्रगट केले आहेत, त्यांत आक्षेपाई असें विशेष कांहीं दिसत नाहीं. पुढें तिसऱ्या पृष्ठावर न्हाणवलीच्या तमाशाचें समर्थन करण्याचा ग्रंथकर्त्रीनीं प्रयत्न केला आहे, तो पाहून मात्र सखेदाश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाहीं. आठव्या लेखांत मुलींनीं सासरीं कसें वागावें याबद्दल त्यांना ग्रंथकर्त्रीनीं उपदेश केला आहे, त्यांत नवीन असें कांहींच नाहीं. ३६ व्या पृष्ठावर बाई ह्मणतात कीं, "**प्रौढ** मुलींनीं हें नेहमीं लक्षांत ठेवावें कीं, सासर हेंच आपलें खरें घर आहे. व त्या ह्या घरांची मुख्य मालकीण जी सासू तीच आपली खरी आई आहे." हें सर्व ठीक आहे. पण दहा वर्षांच्या मुलीला "**प्रौढ**" हा शब्द कितपत लावितां येईल याची आह्मांला शंका वाटते. तसेंच पुढें सावित्रीचें उदाहरण सांगून सर्व मुलींना त्याप्रमाणें सासरच्या मंडळीवर प्रेम करण्याचा ग्रंथकर्त्रीनीं उपदेश केला आहे. येथें आपणांस एक गोष्ट

अनुक्रमणिका

लक्षांत ठेविली पाहिजे कीं, सावित्रीनें आपला पति स्वतः पसंत केला होता; व ती विवाहसमयीं प्रौढ होती. तसेंच तिनें स्वतःच सासर पसंत केलें असल्यामुळें त्या सर्व मंडळीवर तिनें खरें प्रेम केलें यांत आश्चर्य नाहीं. पण बाल्यावस्थेंतून अजून बाहेरही न पडलेल्या बालिकेला, तिनें पूर्वीं कधींहि न पाहिलेल्या ठिकाणीं घालवून देऊन, तिला तेथील मंडळीवर अंतःकरणपूर्वक प्रेम करावयाचा उपदेश करणें ह्मणजे मनुष्यस्वभावाविषयीं आपलें पूर्ण अज्ञान प्रकट करणेंच होय. नवव्या लेखाचा मथळा, " संक्रांतीचा हलवा " असा आहे. पण या लेखांत काय सिद्ध करण्याचा ग्रंथकर्त्रींचा हेतु आहे हेंच समजत नाहीं; तथापि शेवटीं स्त्रीपुरुषांच्या समान हक्कांबद्दल जे विचार प्रदर्शित केले आहेत, तिकडे थोडेंसें लक्ष दिलें पाहिजे. ४७ व्या पृष्ठावर ग्रंथकर्त्री ह्मणतात, "आह्मांला समान हक्क देण्याकरितां ऊहापोह करणाऱ्या बंधूंनीं तो भ्रमाचा नाद सोडून आह्मांला ज्ञानामृत देण्याचा प्रयत्न करावा. " शिक्षण दिल्याशिवाय समान हक्क देऊं लागणें ह्मणजे पायाशिवाय वरील इमारत बांधण्यासारखेंच आहे, एवढी स्वल्प गोष्ट सुद्धां आमच्या विदुषींस समजूं नये याचें आश्चर्य वाटतें. स्त्रियांना अशिक्षित ठेवूनच समान हक्क द्यावे असें कोणीही सुज्ञ ह्मणत नाहीं. शिवाय लेखाच्या शेवटीं ग्रंथकर्त्रींनीं जे उद्गार काढिले आहेत, त्यांवरून "समान हक्क" ह्मणजे काय हेंच त्यांना नीटसें समजलेलें नाहीं असें स्पष्ट दिसतें. सौ. गिरिजाबाई ह्मणतात, "सूक्ष्मदृष्टीनें पाहतां स्त्री आणि पुरुष यांचे हक्क सारखेच आहेत. खाणेंपिणें, कपडेलत्ते वापरणें, यांत दोन्ही सारखेच आहेत. मग आह्मांला सारखे हक्क मिळविण्याची खटपट करणारे आमचे बंधु आणखी कोणते सारखे हक्क आह्मांला मिळवून देणार ?" वाहवा ! खाशी समान हक्कांची कल्पना ! आमचे राजकीय पुढारी कितीतरी मूर्ख आणि बेअकली कीं, आह्मांस आणि आमचे गोरे राज्यकर्ते यांस खाण्यापिण्यांत, कपडेलत्ते वापरण्यांत सारखीच मुभा असतांना, त्यांनीं आह्मांस समान रीतीनें वागवावें, राज्यकारभारांत आमचें अधिक अंग असावें, असल्या मलभलत्या हक्कासाठीं ते भांडतात ! खाणेंपिणें, कपडेलत्ते वापरणें, हेच समान हक्क अशी ज्या बाईची कल्पना आहे, त्या बाईनीं सामाजिक सुधारणेबद्दल कितपत विचार केला असेल याचें अनुमान वाचकांनींच करावें !

दहाव्या लेखांत " देशभक्त पुत्र निपजण्यास माता कशी असावी " या प्रश्नाचा विचार केला आहे. मागील लेखांप्रमाणेंच या लेखांतही विचारसरणीच्या विसंगततेचे बरेच मासले आहेत; आणि त्या सर्वांचा विचार करूं म्हटलें तर पुनः त्याच मार्गावरून पायपिटी करण्यासारखें होणार आहे. देशभक्त पुत्र होण्यास माताही तशीच असली पाहिजे, व आई देशभक्त होण्यास तिला बरेंच शिक्षण मिळालें पाहिजे, या सर्व गोष्टी ग्रंथकर्त्रींस कबूल आहेत; पण, प्रौढविवाहाविरुद्ध जो त्यांनीं मागें मुखरस पाघळला आहे, त्याचा आणि याचा मेळ कसा घालावयाचा ? शेवटच्या लेखांत, सुगृहिणी ह्मणजे काय, याचा विचार केला आहे. त्यांत सुगृहिणीस अवश्य

अनुक्रमणिका

असे जे गुण सांगितले आहेत ते सर्वसंमतच आहेत, व ते गुण आपल्या अंगांत आणण्याचा प्रत्येक स्त्रीनें आणि मुलीनें प्रयत्न केला पाहिजे.

याप्रमाणें हें "गृहिणीभूषण" पुस्तक वाचून आह्मांस जे विचार सुचले, ते आह्मीं वाचकांसमोर मांडिले आहेत. आह्मीं आतांपर्यंत जें लिहिलें, त्यावरून ग्रंथकर्त्रीच्या विचारांची अपरिपक्व दशा वाचकांस स्पष्टपणें दिसून आलीच असेलच. आपलें वाचन आहे त्यापेक्षां अधिक वाढवून, सामाजिक गोष्टींवर नीटपणें अधिक विचार करून, आणि आपल्यापेक्षां अधिक विद्वान् गृहस्थांशीं या गोष्टींवर वादविवाद करून, मग जर सौ. गिरिजाबाई तर त्यांची स्थिति इतकी हास्यस्पद खचित झाली नसती. तथापि सामाजिक सुधारणेचे बाबतींत बाईंचे ठिकाणीं जी कळकळ वसत असलेली या पुस्तकावरून दिसून येते, तीबद्दल त्यांचें अवश्य अभिनंदन केलें पाहिजे. तसेंच त्यांच्या वाचनाच्या हौसेबद्दल आणि विद्याव्यासंगाबद्दल प्रस्तावनेंत जी स्तुति करण्यांत आली आहे ती खरी असेल तर, त्यांच्या या गुणाबद्दलही त्यांचें कौतुक केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

आतां पुस्तकासंबंधीं एकंदरींत मत द्यावयाचें ह्मटलें तर, तें वाचून, कोणता हेतु मनांत धरून हें पुस्तक सौ. गिरिजाबाईनीं लिहिलें आहे हें समजत नाहीं सुधारक मताचें हें खंडन आहे कीं मंडन आहे, याचा वाचकांस कांहींच उलगडा होत नाहीं. एका लेखांत पहावें तों स्त्रियांना खूप शिक्षण द्यावें असें प्रतिपादिलेलें, तर त्याच्याच पुढल्या लेखांत स्त्रियांना पुष्कळ शिकविलें कीं त्या संसाराला कुचकामाच्या होतांत अशा मताची त्यांत छाया पडलेली. एकीकडे पहावें तों स्त्रियांना राजकीय गोष्टीसुद्धां समजण्याइतकें शिक्षण मिळावें असा आग्रह; आणि पुनः दुसरीकडे पहावें, तर स्त्रियांना फक्त थोडेंसें लिहिण्यावाचण्यापुरतेंच शिक्षण देऊन त्यांचें दहाव्या वर्षींच लग्न करून दिलें पाहिजे असें मत बिनधोक ठोकून दिलेलें! अशा परस्परविरुद्ध अनेक मतांच्या समर्थनामुळें हें पुस्तक ह्मणजे विसंगततेचा एक उत्कृष्ट मासलाच झालें आहे.

शेवटीं, सौ. गिरिजाबाई आपल्या ज्ञानाचा व वाचनाचा उपयोग या पुस्तकांत त्यांनीं प्रतिपादन केलेल्या आपल्या मतांचा पुनः नीट विचार करण्यांत करतील अशी आशा करून, आणि आतांपर्यंतच्या लिहिण्यांत त्यांना अधिकउणा एकादा शब्द गेला असल्यास त्याबद्दल त्यांची मनःपूर्वक क्षमा मागून, हा बराच लांबलेला परीक्षणात्मक लेख पुरा करितो.

"वाग्भट."

अनुक्रमणिका

हरी केशवजी यांचें चरित्र.

(मागील अंकावरून समाप्त.)

पहिल्या सुशिक्षित मंडळांत जातिभेद-वाचक विचारांचा अभाव व त्यांचें सार्वजनिक ऐक्य.

(१०) या काळांतली मोठी लक्षांत घेण्यासारखी तिसरी गोष्ट ह्मटली तर ती ही होय कीं, या वेळीं सार्वजनिक कामांत सर्व जातींचे सुशिक्षित लोक–हिंदु, मुसलमान, पारशी वगैरे–मोठ्या जुटीनें उत्साहपूर्वक सामिल होत असत. त्यांत जातिभेद जातिमत्सर वगैरे हीन मनोवृत्तींचें नांव दिसत नाहीं. अशा पुष्कळशा लोककार्यांस त्या वेळच्या कांहीं थोर इंग्रजी अंमलदारांचें पाठबळ मिळे, ही गोष्ट विशेष आहे. या वस्तुस्थितीचा निर्देश ना. सर फेरोजशहा मेहेता यांनीं आपल्या एका प्रसिद्ध भाषणांत कांहीं काळापूर्वी केला होता, त्याची पुष्कळांस आठवण असेलच. या वेळीं जातिसंमेलनें, जातिपरिषदा, पोटजातींचीं मंडळें, संस्था, समाज वगैरे प्रकारांनीं व्यक्त होणारा तुटकपणा, भेदभाव, अदूरदर्शीपणा व संकुचितपणा यांचा प्रादुर्भाव झाला नव्हता, हें उघड होतें. सर्व देशीमंडळ एकाच नावेंत बसल्याप्रमाणें असून, परस्परांचीं सुखदुःखें व हिताहित यांचे संबंध एकाच लौकिक सूत्रबंधांत गोविले आहेत, हा समज या काळीं तरी सार्वत्रिक होता यांत संशय नाहीं.

पहिल्या सुशिक्षित इंग्रजी विद्वानांचें स्वभाषाप्रेम.

(११) पहिल्या पिढींतील इंग्रजी जाणणाऱ्या मराठी विद्वन्मंडळांत स्वभाषाप्रेम अत्युत्कट होतें. त्यांचें स्वभाषाज्ञान फार मार्मिक व शुद्ध असे, ही गोष्ट विशेष आहे. तिच्या द्वारें आपणास मिळालेलें नवें ज्ञान स्वदेशबांधवांस देण्याच्या कामीं त्यांचा उत्साह अपूर्व होता. जुन्या मराठी कवींविषयीं त्यांच्या ठायीं अत्यंत आदर व पूज्यभाव वसत होता. त्यांचे काव्यग्रंथ त्यांनीं मोठ्या आवडीनें सहानुभूतिपूर्वक वाचले होते, इतकेंच नव्हे, तर त्यांतलें अध्यात्मिक सार त्यांच्या हृदयकुंडीं जाऊन बरेंच भिनलें होतें. पूर्वोक्त चौघां मराठी ग्रंथकारांची भाषा अत्यंत शुद्ध, सरळ, सुबोध व गोड होती. परकी भाषाप्रकारांची घेडगुजरी व वेडीवांकडी भेसळ तिच्यांत नसे. नैसर्गिक भाषासंप्रदायाची पायमल्ली कोठें ठळकपणें तिच्यांत झालेली फार करून आढळत नाहीं. प्रस्तुत चरित्र नायकाची गति पद्यरचनेंत देखील फार चांगली होती असें दिसतें. ही गोष्ट मोठी असाधारण वाटते. कारण दुसऱ्या पिढींतील इंग्रजी विद्वानांत हा प्रकार इतका ठळक दिसत नाहीं. उलट कांहीं जणांच्या लेखांतली मराठी भाषा तर विचित्र, परकी वेषांतर झालेली, व इंग्रजी न येणारास बरीच दुर्बोध, अशी वाटते. पहिल्या पदवीधरांपैकीं बहुतेकांच्या ठायीं तर मराठीविषयीं विलक्षण अनादर व औदासिन्यही वसत होतें. हा प्रकार स. १८७०-च्या नंतर बदलत गेला. आणि मराठी भाषेच्या तिसऱ्या स्थित्यंतरास प्रारंभ झाला.

या ग्रंथांतील दोषांचे दिग्दर्शन.

(१२) वरील सर्व विचार हें चरित्र वाचतांना सुचले, ते सत्यशोधकास व इतिहासभक्तास सादर केले आहेत. त्यांत जो काय सत्यांश असेल तो त्यांनीं पडताळून घ्यावा. शेवटीं या कृतींतील दोषांचा उल्लेख करून ग्रंथकाराची व वाचकांची रजा घेऊं. या दोषांकडे विशेष कडकपणानें अगर बारकाईनें पाहणें ठीक दिसत नाहीं. कारण चरित्रकार लेखनकलेंत अगदींच नवखे आहेत, हें उघड दिसतें. तशांत "तीद्विषयक अभ्यास नसतां केवळ आनुवंशिक गुणधर्मांच्या प्रसादबळाचें तें (सदर चरित्र) फळ होय" असें त्याचे उपोद्घातकर्ते ह्मणतात. अशा स्थितींत तें आहे इतकें चांगलें उतरलें याचें अभिनंदनच केलें पाहिजे. त्यांत कमीपणा राहिला याचें नवल वाटण्याचें प्रयोजन नाहीं. शिवाय पितृभक्त पुत्रानें केलेली परमपूज्य पित्याची गुणवर्णनात्मक अशी ही कृति होय. तेव्हां या दृष्टीनेंही ती अपूर्व वाटते. तेव्हां तिच्याकडे दोषदृष्टीनें पाहणें देखील पाप होय. अशा स्थितींत पुढील दोषांनें दिग्दर्शन त्यांच्या दूरीकरणार्थ केलें आहे. त्यांत जो कांहीं

अनुक्रमणिका

ग्राह्यांश दिसेल तदनुरूप या ग्रंथाच्या पुढील आवृत्तीच्या वेळीं इष्ट ती सुधारणा करण्यास ठीक पडेल.

त्यांतील जीवनरसाभाव व त्याची सूत्रबद्धता.

(१३) प्रथमतः ही गोष्ट येथें नमूद केली पाहिजे कीं, प्रस्तुत कृतीचें स्वरूप अर्वाचीन पाश्चात्य विद्वानांस मान्य झालेल्या चरित्राच्या धर्तीप्रमाणें अगदींच दिसत नाहीं. सदर नमुना चरित्रकारापुढें नसल्यामुळें हें चरित्र वाचतांना "प्रत्येक जीवनचरित्रास पुस्तकाचें रूप असलें पाहिजे, पण पुष्कळदा त्यांत खरें जीवन असत नाहीं, तेव्हां तें जीवनविहीन चरित्र होतें, हें दुर्भाग्य होय." (The queer doctrine is that every life ought to be a book which often proves what is worse,—a book without a life) या महासिद्धांताची –सत्याभासाची– आठवण होते. त्यास चरित्र ह्मणण्यापेक्षां "नायकाच्या जीवनांतील सार्वजनिक कार्यभागांतील कांहीं गोष्टींचीं टिपणें," असें ह्मणणें ज्यास्त शोभेल. कारण त्यांत मुळीं जीवनरसच फार दुर्मिळ भासतो. तो इतका कीं नायकाची मुद्रा, लौकिक आवरणांत गुरफटलेला लाकडी मुखवटा अगर पुतळा (wooden front) यासारखी भासते. ती बोलत्याचालत्या माणसाप्रमाणें दिसत नाहीं. त्याच्या अंतर्गत व खासगी स्वरूपावर ओढतां येईल तितका पडदा ओढण्यांत कमी केलेलें नाहीं. उलट हें अत्यंत भक्तिभावानें केलेलें भासतें. आतां एवढें खरें कीं, पुष्कळदां अशा प्रकारची माहिती न मिळाल्याकारणानें चरित्रग्रंथांत हवा तेवढा जीवनरस ओतणें शक्य नसतें. पण प्रस्तुत कृतीस ही सबब लागू पडत नाहीं. कारण ती भक्तिमान पुत्रानें आपल्या प्रेमळ पित्याची–ज्याच्या हाताखालीं त्याचें प्राथमिक शिक्षण झालें होतें व ज्याचा वात्सल्यरूप सहवास त्यास घडला होता त्याची–काढलेली प्रतिकृति होय. अशा स्थितींत तिच्यांत नायकाचें नुसतें वरपंगी दर्शन व दरबारी भेट मात्र व्हावी, त्याचें स्वभाववर्णन, स्वरूपवर्णन, शिकविण्याची हातोटी, घरगुती वर्तन, तसेंच त्याची धर्मशील माता, धर्मपत्नी वगैरे सुहृद् आप्तांचें–ज्यांच्या सन्मार्गवर्ती जीवनक्रमाचा व्यापार व सुपरिणाम नायकाच्या कृतीवर व वर्तनावर घडला असला पाहिजे त्यांचें–नांवनिशाण नसणें ह्मणजे विचित्रच दिसतें ! त्यांचीं नुसतीं नांवेंच देण्याची इतकी मारामार. तर मग त्यांचीं स्वरूपाविष्करणें तर दूरच !! हें नुसतें नायकाचेंच नव्हे तर भक्तिमान वाचकसमूहाचें देखील दुर्दैव होय, असें कोण ह्मणणार नाहीं ? हा सर्व प्रभाव **मिथ्या मर्यादा, संकोच व विनय** (False modesty) यांच्या अतिरेकाचा दिसतो. वस्तुतः पाहिलें तर नायकाचे खासगी दुर्गुण–लौकिक दोष लपणें शक्य नसतें–गुलदस्तांत ठेवण्याकडे चरित्रकाराचा कल असलेला पुष्कळदां व्यक्त होतो. त्यांत विशेष नाहीं. पण सद्गुणाचा असा प्रकार होणें मात्र नवल आहे !–आणि तोही सुपुत्राच्या हातून सत्पित्याच्या संबंधांत, हें तर फारच अपूर्व वाटतें. पड्यांत राखायाच्या वस्तूंचें स्वरूप असें नसतें. पाप अंधारांत लपतें. पुण्यास उजेड आवडतो. त्यास अंधारांत लपविणें ह्मणजे, त्यांत त्याचा उपमर्द व अन्याय होतो. त्याच्या शुभ्र यशावर डाग पडला, असें मानण्यास विनाकारण जागा मिळते. फार तर काय, पण ज्या देशांत पड्याचा प्रघात परंपरागत चालत आला आहे, अशा देशांच्या इतिहासांत देखील आर्यांगनांचीं पुण्यचरित्रें मोठ्या उदार मनानें गाईलेलीं आहेत. राजस्थानांतील बंदिजन, चारण, भाट वगैरे देखील "**राणिवसाची**" पुण्यपावन कीर्ति मोठ्या प्रेमानें गात होते. अशा स्थितींत वरील मौन दाखवून पूर्वोक्त कथाभाग गाळण्यांत काय रहस्य साधलें, हें मोठें आश्चर्यमय गूढ होय. कदाचित् पापी जगासमोर पुण्यशील अबला जनांचीं नांवें मांडणें देखील संकोचशीलतेस गैर वाटलें असेल ! पण नायक हा महाजन व लोकोद्धारक वर्गांतील ह्मणून त्याचें चरित्र लोकांपुढें आणलें, व "जिच्या हातीं पाळण्याची दोरी, ती सर्व जगास उद्धरी" हें तत्त्व शिष्टजनमान्य झालें आहे, त्या अर्थी वरील मौन ह्मणजे **दुरभिरुचीचें** शोचनीय फल होय असेंच ह्मणावें लागतें. पुण्यास पापदृष्टीचा तिट्कारा वाटणें साहजिक आहे. पण ज्या अर्थी चरित्रप्रकाशन पापी जगाकरितां असत नाहीं, पुण्यशीलांकरितांच असतें, त्या अर्थी "वड्याचें तेल वांग्यावर" ह्मणतात, तसें पहिल्याचें प्रायश्चित्त दुसऱ्यांना देणें, ह्मणजे पुण्यात्म्या चरित्रनायकाचें पुण्यांग नाहींसें करण्यासारखेंच होय. "चित्रांत चित्रकाराची अंगलट कोठेंना कोठें तरी दिसतेच" असें उपोद्घातकर्ते ह्मणतात. पण टीकाविषयक चरित्रचित्रांत चरित्रकार

अनुक्रमणिका

व उपोद्घातकर्ते यांच्या दुहेरी संकोचशील (दोषार्थानें नव्हे हो!) अंगलटीचा भास होतो. त्यावर 'बालबोधां'तील नमुनेदार "सूत्रबद्ध" चरित्ररचनेचा बेमालुम छाप बसल्याप्रमाणें दिसतो. पण बालबोधासारख्या छोटेखानी मासिकांत तो मासला चालतो, व थोडा फार खुलतोही; पण तोच स्वतंत्र ग्रंथांत तोकडा पडतो! तेव्हां ही उणीव पुढील आवृत्तीच्या वेळीं शक्य तितकी भरून काढणें रास्त होय. तिच्या अभावीं नायकाची मुद्रा व ठेवण यावरचें सात्विक तेज बरेंच मंद पडलेलें भासतें, याचा विचार व्हावा.

त्यांतील विवेचनाची मुत्सद्दी संदिग्धता व दुटप्पीपणा.

(१४) प्रस्तुत चरित्राची भाषा फारच चांगली आहे. ती हरिकेशवजींच्या चरित्रास पूर्ण शोभते, यांत संशय नाहीं. चरित्रकार लेखनकार्यांत अगदींच अनभ्यस्त व नवशिके असल्यामुळें ती केवळ "अनुवांशिक गुणधर्माच्या प्रसादबलानेंच" फल होय, असें ह्मणावें लागतें. नायकाच्या भाषेची ती अगदीं प्रतिकृति आहेसें भासतें. कोठें तर मतमतांतराच्या विवेचनप्रसंगीं नायकाच्या भाषेवर तिची ताण झाली आहे! त्यांत नवा व जुना पक्ष व त्यांचीं मतमतांतरें ह्यांच्यांतील ग्राह्यांश, सार व चांगुलपणा हीं जशीं कांहीं एकवटून अगदीं एकजीव झाल्यासारखीं भासतात. पक्षभेदास त्यांत थारा मिळत नाहीं. नायक हे सर्व पक्षांस आपल्यांतलेच वाटत, व सर्वांना सारखेच प्रिय झाले होते, असें दाखविलें आहे. त्यांत अप्रतिम मुत्सद्देगिरी व्यक्त होते. पण त्यामुळें वस्तुस्थितिसंबंधीं मोठा गैरसमज उत्पन्न होतो. सर्व लोकांना सारखेच प्रिय होणारे गुण (गुणवंताच्या हयातींत तरी) फारसे कार्यकारी, सुपरिणामवाहक व सत्वसंपन्न असत नाहींत; पण लोकांना मात्र ते अमोल भासतात! व त्याच्या मागें तर ते कवडीमोल होतात! त्यांना इंग्रजींत Negative qualities ह्मणतात, व संस्कृतांत 'व्यतिरेकात्मक गुण' ह्मटल्यास चालेल. या वर्गांतील गुणांना खास स्वतःचा असा एकही पक्का रंग नसून, पाण्यासारखी त्यांची दशा असते. ज्यांत तें मिळतें त्याच्या रंगावर तें ठरतें. एवं गुणविशिष्ट असे एक वैद्यराज अगदीं आसन्न दशेंतील एका रोग्याच्या घरीं त्यास उपचार करण्याकरितां गेले. तेथले सर्वजण घाबरून गेलेले दिसले. त्यांतला एक बोलला, "वैद्यबुवा, या रोग्याला हेमगर्भाची मात्रा दिली तर कसें?" वैद्य-"कांहीं चिंता नाहीं." दुसरा बोलला, "रससेंदुराची मात्रा दिली तर?" वैद्य—"तरी चिंता नाहीं, चालेल." तिसरा ह्मणतो, "सुंठीचा काढा दिला तर?" वैद्य—"तरी धकेल." चौथा—"तुळशीचा काढा दिला तर?" वैद्य—"तरी चालेल." पांचवा—"वैद्यबावा, याला विष दिलें तर कसें?" वैद्य-"कांहीं नफा न झाला तरी त्यापासून नुकसानही नाहीं." शेवटी सर्वांनीं त्यास पुसलें, "वैद्यराज! आपण स्वतःचें असें एखादें मत आपल्याजवळ ठेवितां कीं नाहीं?" तेव्हां ते ह्मणाले "या रोग्याची काया ब्रह्मीभूत होण्याच्या रंगांत आहे. औषधपाण्याच्या आटोक्यांतून तो पार पडला आहे." या नकलेंतील शेवटल्या उत्तराशिवाय बाकीचा सर्व भाग वरील इंग्रजींत ह्मटलेल्या "नकारार्थी" किंवा मराठी ह्मणतां येणाऱ्या "होकारार्थी" गुणांचा निदर्शक होय. × ×

"A man will please more upon the whole by negative qualities than by positive, because he (Fitzherbert) was the most acceptable man in London, and yet overpowered no body by the superiority of his talents, made no man think worse of himself by being his rival, seemed always to listen, did not oblige you to hear much from him, and did not oppose what you said."

Johnson.

या जातीच्या गुणांनीं सार्वत्रिक लोकप्रियता मिळते, ती वरीच सवंग असते. पण ती आपलें तट्टू पुढें दामटून स्वार्थ साधण्यास जितकी उपयोगीं पडते तितकीच खऱ्या लोकसुधारणेस बाधक होते. खरा लोकोद्धारक पुढारी असा सर्वांगांनीं गोड होऊं शकत नाहीं, आणि ज्या अर्थी आमच्या चरित्रनायकानें पुनर्विवाहासारखीं जनविरोधकारक कार्यें स्वज्ञातींत प्रचारांत आणलीं त्याअर्थीं वरच्यासारख्या गुळचट व

अनुक्रमणिका

फिक्या गुणांपेक्षां ज्यास्त पक्या रंगाचे व वरिष्ठ जातीचे परिणामकारक (effective) गुण त्यांच्या ठायीं वसत होते असें उघड होतें. सरड्याच्या रंगासारखा रंगबदलेपणा व गुळचटपणा कोणत्याही अम्मलबजावणीच्या सामाजिक सुधारणाप्रांतांत कामीं पडत नाहीं. याप्रमाणें पूर्वोक्त मुत्सद्दी कलमबहादरी नायकाच्या खऱ्या व सजीव गुणांस कांहींशीं बाधक होऊन, त्यांना संदिग्धता आली आहे. ह्याच प्रकार नायकाच्या धर्ममतसंबंधीं विवेचनांतही झालेला भासतो. ते **"हिंदुधर्मकर्मठ"** होते ह्मणजे काय ? ख्रिस्ती धर्माचा पगडा त्यावेळीं बऱ्याच इंग्रजी सुशिक्षितांवर बसून त्यांनीं धर्मांतर केले, तसेंच प्रस्तुत नायकाचें होऊं पाहत होतें. पण देशी धार्मिक व तात्त्विक सन्मार्गदर्शक सद्गुरु त्यांना मिळाला, तेव्हां त्यांस धार्मिक तत्त्वांची खूणगांठ पटली, यामुळें धर्मांतराची गरज त्यांस लागली नाहीं. पण वरून प्रचलित कर्मठपणाचा ओध जडता, मंत्रचळेपणा, खुळकटपणा यांना वर्धक अशा अधोगतीनें जात होता, हें उघड दिसतें. ह्या प्रकार **नियमरूप** होता. नायकाचा धर्मांध चैतन्याकडे वळविला गेला, तो **अपवादरूप** दिसतो. पण या धार्मिक अवनतीबद्दल प्रस्तुत कृतींत चकार शब्द दिसत नाहीं. नायकाच्या धार्मिक लेखांतील कांहीं उतारे दिले आहेत, त्यांत नुसत्या तात्विक दृष्टीनें केलेलें विवेचन आहे. पण त्या काळीं समाजाची धार्मिक स्थिति कशी होती याचा विचार त्यांत नाहीं. **तो जुन्या पक्षास दुखवूं नये ह्मणून मोठ्या मुत्सद्दीपणानें गाळला आहे.** पण त्यापासून **अपवादरूप** वस्तुस्थिति **नियमरूप** वाटून तिजविषयीं गैरसमज उत्पन्न होतो. याप्रमाणें संदिग्धतात्मक कलमबहादरी नायकाच्या सत्यस्वरूपदर्शनास अपकारक झाल्याप्रमाणें दिसते.

त्यांतील एकाकित्व, संकुचितदर्शनप्रांत व परिस्थितिवाचक मौन.

(१५) या कृतींत नायकाचा गुणवर्णनात्मक जो भाग आला आहे तो अगदींच एकाकी व तुटक दिसतो. चित्राप्रमाणें चरित्रास देखील सभोंवारचा प्रदेश, वातावरण, बहिःस्थान, आजूबाजूचा व मागचा पुढचा देखावा, संबंधी जन, परिजन, यांचें सांनिध्य लागतें. त्यामुळें त्यास शोभा येते. त्यावांचून नुसतें एकलकोंडें चित्र नीट खुलत नाहीं. थोर पुरुष देखील आकाशांतून पडला व धरणीवर येऊन सांवरला, असें सहसा होत नाहीं. पण या कृतींत असाच प्रकार घडला आहे. तिच्यांतील विषयनायकापाशीं काय तीं एकचार पात्रें–त्याचा आजा, चुलता, पिता, धर्मगुरु हरिभक्तिपरायण केसकर महाराज–ओळख पटण्यासारखीं वाटतात. बाकीचीं नुसतीं इंग्रजींत ज्यास छायारूप Shadows of names ह्मणतात तशीं भासतात. त्यांच्यांत जीवनरस असल्याचें नांवनिशाण मिळत नाहीं. फार तर काय, भाऊ दाजी, मडंलिक, पाळंदे, रोगे, भाटवडेकर, नानाशंकरशेट वगैरे सुप्रसिद्ध लोककार्यकर्ते व प्रगतिकार्यसाधक यांचा नामनिर्देश अगदींच अपुरा व ओझरता झालेला आहे; तो इतका कीं त्यापासून त्यांच्या देशहितनिदर्शक व प्रगतिसाधक जीवनकार्यांची नुसती कल्पना देखील साधारण वाचकास येणार नाहीं. व बहुश्रुत वाचकास असा वरपंगी पैठणी आदर पाहून तो त्या महाशयांना अपमानास्पद झालासें वाटेल ! प्रत्येक लोकनायक मूळारंभीं स्वकालीन परिस्थितीचा **बालक** असतो, नंतर तिचा तो **चालक** बनतो, आणि शेवटीं क्वचित् एखादा दुसरा विरळा महात्मा तिच्या **जनक**पदावर चढून **शककर्ता** (Epoch Maker) बनतो. असें ५००–४०० वर्षांत कधीं काळीं घडल्यास घडतें. या दृष्टीनें वरील तीन्ही अंगांची (बालक, चालक व अंशतः जनक) घटना व विकास हीं शक्य तितकीं व्यक्त करणें ह्या चरित्रलेखनाचा प्रधान कार्यभाग होय. ह्या विद्यमान संस्कृतीचा आदर्श होय. पण या दिशेकडे योग्य प्रकारें लक्ष गेल्याचा आढळ सदर कृतींत होत नाहीं. तत्कालीन रायकीय, सामाजिक, धार्मिक, वगैरे परिस्थितिसंबंधीं विवेचन इतकें कांहीं त्रोटक व **गुळचट** पण **भ्रमोत्पादक** वाटतें कीं, त्यापासून नायकाच्या **असामान्य** जीवनकार्याचें दिव्य तेज **सामान्य** वर्गांतलें भासतें, तें अपवादरूप असून नियमरूप भासतें व त्याचें मोल उतरतें. चोहोंकडे सोंवळ्याचें साम्राज्य पसरल्यामुळें सोंवळ्याओंवळ्यांतला फरक लोपून स्वांतःकरणांतील पापमलाकडे दुर्लक्ष होतें मग त्याचें क्षालन करण्यांची गोष्ट तरच दुरच ! अशा स्थितींत तो गुप्तरूपानें वाढून पापाचें अंतिम फळ जें दौर्बल्य त्यांत त्याचा शेवट होतो; आणि हें **दौर्बल्य मिथ्या मर्यादातिरेकाचें आवरण**

अनुक्रमणिका

पांघरून दांभिकपणाच्या पायरीस पोंचतें. याप्रमाणें हा **गुळचटपणा पाणचटपणाप्रमाणें** वेचव बनतो. पुण्यास पापाचा शक्तिपात करून त्यास स्वस्वरूपीं मिळविण्याचें सामर्थ्य न राहतां तें त्यास भिऊं लागतें. पण " भित्यापाठीं ब्रह्मराक्षस " ह्मणतात तशी गत होऊन दुसरें पहिल्याचें सत्त्व घेतें. उघडच आहे. चरित्रविषय होणारा पुरुष **असामान्य** कोटींतला असतो ह्मणूनच त्याचें दर्शन लोकांना ध्यावेंसें वाटतें, तेव्हां त्याचें "रामायस्वति रावणायस्वस्ति" किंवा " नरो वा कुंजरो वा" अशा तऱ्हेचें संदिग्ध व गोलमोल गुणवर्णन देऊन तें कसें पुरें होईल ? त्यांत जुन्या व नव्या मतमतांतरांचा **ग्राह्यांश** व **त्याज्यांश** स्पष्ट रीतीनें व्यक्त व्हावयास नको काय ? नायकास जुन्यांत जुने, नव्यांत नवे, अशा तऱ्हचे **"पक्षहीन"** करण्यापासून शुद्ध वातावरणातील त्यांच्या संचारास व्यत्यय येऊन त्यास भुईवर सरपटत ठेवण्यासारखेंच होत नाहीं काय ? त्यांत जुना व नवा असा भेदभाव नव्हता, दोहोंतील उन्नतिप्रद पक्ष अंगीकारून आपली प्रगति त्यांनीं साधली, हें दाखवितांना दोहों पक्षांतील उन्नतिप्रद व अवनतिप्रद भाग कळवायास हवा. पण तो या कृतींत हवा तसा दिला नाहीं. उपोद्घातांत थोडासा आहे, पण तोही फारच **संकुचित** व **सूत्रबद्ध** असल्यामुळें सुव्यक्तसा भासत नाहीं. पण हा भाग चरित्राच्या पूर्ततेस अत्यावश्यक आहे. त्यावांचून नायकाच्या जीवनकार्यांचीं तीन अंगें–ज्यांचा उल्लेख वर केलाच आहे– व त्यांतील कार्यकारणभाव वगैरे, यांचा संबंध नीटपणें स्पष्ट होणार नाहीं. सदर विषयाचें विवेचन दिग्दर्शनरूपानें यथामती व यथाज्ञान मी वर अंशतः कांहीं कलमांत केलें आहे; त्यावरून नायकाच्या काळांतील जुनी व नवी परिस्थिति, जुनीं व नवीं मतें, त्यांतील मेळ व फरक, तत्कालीन सार्वजनिक संस्था, वगैरे गोष्टींसंबंधानें कांहीं कल्पना होईल अशी आशा आहे.

त्यांतील किरकोळ उणिवी.

(१६) याशिवाय या कृतींत बारीक सारीक उणिवी राहिल्या आहेत. त्या बहुतेक वगळणीच्या (omissions) वर्गांत येतात. उदाहरणार्थ, प्रस्तुत चरित्रनायकानें रशियाची महाराणी दुसरी क्याथराइन हिचें चरित्र लिहिलें होतें, तसेंच कोल्हापूरचा इतिहास, मिसरदेशचा इतिहास, ज्योतिषशास्त्र व रसायनशास्त्र यांवर त्यांचे ग्रंथ आहेत, असें त्या वेळच्या ग्रंथांच्या यादीवरून कळतें. पण त्यांचा समावेश व नामनिर्देश त्यांच्या ग्रंथांच्या विवरणांत अगर यादींत (पा. ३२) आढळत नाहीं. सदरप्रमाणेंच "ज्ञानप्रसारक सभे"च्या मासिकांत आलेल्या त्यांच्या लेखांची यादी देणें रास्त होतें. हे सर्व लेख आतां उपलब्ध नसल्यानें त्यांचें महत्त्व कमी होत नाहीं. **त्यांनीं मराठी वाङ्मयरूपी मंदिराचा पाया घातला आहे,** त्यावरच त्याच्या पवित्र देउळाचे मजले रचलेले आहेत. त्यांनीं अनेक ओजस्वी ग्रंथकारांच्या अक्षरजननीस चेतना दिली, व पुढील मार्ग सुगम केला. ज्याप्रमाणें मिस् बर्ने उर्फ मॅडम डायरब्ले हिच्या कादंबऱ्या आतां मागें पडल्या तरी, पुढें जेन आस्टिन, मेरिया इव्हॅन्स, चार्लोटी ब्रान्टी यांच्यासारख्या नामांकित कलमबहादर स्त्री-कादंबरीकर्त्यांना तिच्या ग्रंथांनींच प्रेरणा केली, तशीच गोष्ट **हरी केशवजी**च्या लेखांची होय. त्यांनीं आपली चैतन्यमय प्रेरणा पूर्व मराठी सारस्वताच्या द्वारें अनेक लेखकांच्या हृदयांत भिनविली, ती **अमर** होय. या दृष्टीनें सदर नायकाचा लेखनरूप कार्यभाग अंशतः शाश्वत होय; व त्यांच्या जनकाचें **परम वंद्य नांव मराठी सारस्वताच्या इतिहासांतून पुसून जाणें अशक्य होय.** प्रत्यक्षतः किंवा अप्रत्यक्षतः त्यांच्यापासून माडगांवकर, चिपळूणकरद्वय, फडके, बापट, पंडित, गुंजीकर, गोडबोले, लोकहितवादी, ओक वगैरे अनेक नामांकित लेखकांना लोकांचें अज्ञान दूर करण्यास प्रस्तुत नायकाच्या वर्गांतील महाशयांचे लेखच उद्युक्त करीत असतात, हें या ग्रंथाच्या उपोद्घातावरून उघड होतें.

त्यांतील लोकमतवाचक मतांचा अभाव.

(१७) प्रस्तुत ग्रंथांतील ६ व्या भागांत 'शिष्टाभिप्राय' सदराखालीं त्या वेळच्या अधिकारी इंग्रज लोकांचे दाखले नमूद केले आहेत. ते सर्वोत्तम आहेत. त्यांवरून नायकाविषयीं सरकारी मत काय होतें व गोरे अंमलदार लोक त्यास किती मानीत असत हें कळतें. लोकमतही त्याच्या संबंधांत तितकेंच चांगलें होतें, असें तत्कालीन लेख, वृत्तपत्रें, मासिकें, वगैरे साधनांवरून जाहीर होतें. विशषतः गोविंद नारायणकृत "मुंबईचें वर्णन" या ग्रंथांत हरि केशवजीच्या ग्रंथकर्तृत्वाचें व लेखन-

अनुक्रमणिका

कौशल्याचें मोठें मार्मिक वर्णन वाचल्याचें प्रस्तुत लेखकास पक्कें स्मरतें. तसेंच दादोबा पांडुरंगकृत "महाराष्ट्र व्याकरण" ग्रंथाच्या प्रस्तावनेंत त्याचा उल्लेख फार सन्मानपूर्वक केलेला आहे. बाळशास्त्री जांभेकरांच्या मराठी चरित्रांतही बहुमानपुरस्सर त्याच्या ग्रंथकर्तृत्वासंबंधांत त्यांचा नामनिर्देश केला आहे. "ज्ञानप्रसारक" मासिकांतही त्यांच्या मृत्युलेखांत त्यांच्याविषयीं लोकमतनिदर्शक गुणवर्णन आलें असलें पाहिजे. या सर्वांचे उतारे प्रस्तुत कृतींत दिले असते तर "नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता" या नायकाच्या उभयविध सद्गुणांचा गौरव होऊन त्याचें खरें लोकनायकत्व प्रगट झालें असतें. नुसत्या सरकारी अंमलदारांच्या मतांवरून गैरसमज होण्यास जागा राहते. ती दूर करण्यास हा भाग या ग्रंथास दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं अवश्य जोडावा अशी सूचना आहे. याप्रमाणें "न्यूनं संपूर्णतां यांतु" या सदिच्छेनें हा भाग लिहिला आहे, त्याचें साफल्य होवो, अशी प्रार्थना करून वाचकांची व ग्रंथकार मित्राची आदरपूर्वक रजा घेतों.

या लेखांत ग्रंथकारास न रुचणारा कांहीं भाग असेल तर त्याबद्दल न रागावतां, शांतपणें विचार करून, ते त्यांतील ग्राह्यांश स्वीकारतील अशी आशा आहे.

बा. ना. देव.

काव्यमंजूषा.

धन्य कोण ?

व्यायामा करुनी तुवां स्वतनुचें सामर्थ्य संपादिलें
'भीमाचा अवतार हा' तुज जरी लोकीं ह्मणूं लागले
शक्तीचा उपयोग भारहरणीं हो ना पराच्या जरी
सारी शक्ति तुझी वृथा मज गमे बा मानवा भूवरी. १

अभ्यासा करुनी अनेक वरुषें विद्या तुवां साधिली
तूतें 'पंडित' ही प्रशस्त पदवी लोकीं जरीही दिली
लोकाज्ञान हरावया जर तुवां ना ती कधीं योजिली
मातें सर्व तुझी गमे विफल ती विद्या जरी चांगली. २

नाना कष्ट करूनियां निशिदिनीं संपादिलें त्वां धन
आहे हा दुसरा 'कुबेर' वदती पाहूनि तूतें जन
नाहीं त्वां दिधलें जरी धन परा दारिद्र्य नाशावया
या लोकीं तर संपदा मिळविली त्वां एवढी कासया! ३

नाहीं ते करुनी प्रयत्नचि तुवां सत्ता करीं आणिली
इंद्राचीच जणो ह्मणूनि तिजला लोकांत वाखाणिली
सत्ता ती न जरी परार्तिहरणीं त्वां मानवा लाविली
मातें ती गमते प्रयत्न करुनी त्वां व्यर्थ संपादिली. ४

विद्वत्ता अधिकार वैभव तसें सामर्थ्य हीं साधनें
स्वार्थातें उपयोजिणें मज गमे हें मानवाचें उणें
जाणी स्वार्थ न या जगीं कवण तो? सर्वांस तो ठाऊका
जो अन्यास्तव आत्मयज्ञ करितो तो धन्य लोकीं निका!

माधवानुज.

कुजनाचा संग.

[पद.]

('भाव धरारे'—ह्या चालीवर)

संग नसावा।

कुजनाचा संग नसावा ॥ ध्रु० ॥
पातक कुजनाचें मुख बघणें,
पातक त्यासह भाषण करणें,
पातक त्याची मैत्री धरणें,

संग नसावा इ० ॥ १ ॥

कुजन नीतिचे बंध विसरवी,
कुपथीं गोडी कुजन उपजवी,
मोठीं दुःखें मग अनुभववी,

संग नसावा इ० ॥ २ ॥

कुजनाला अहि मानुनि टाळा
त्याच्या बहिरंगास न भाळा
व्रत विद्याधरकविचें पाळा

संग नसावा इ० ॥ ३ ॥

विद्याधर वामन भिडे.

अनुक्रमणिका

महादेवाचें मूळ स्वरूप.

[१५८ पृष्ठावरून पुढें चालू.]

परंतु स्वतः महादेवानें आपला कंठ काळा होण्याचें जें कारण महाभारतांत सांगितलें आहे तें तर अगदींच निराळें आहे.

" इन्द्रेण च पुरा वज्रं क्षिप्तं श्रीकांक्षिणा मम ।
दग्ध्वा कंठं तु तद्यातं तेन श्री+ कंठता मम ॥ ८ ॥
महाभारत, अनु० पर्व, अध्याय १४१.

अर्थ—पूर्वी इन्द्रानें माझी श्री (शोभा) हरण करण्यासाठीं माझ्यावर वज्र टाकलें, तें माझा कंठ जाळून निघून गेलें. त्यामुळें मी नीलकंठ (विषकंठ) झालों.

याशिवाय महाभारतांत महादेवाचा कण्ठ निळा होण्याचीं आणखी दुसरींही कारणें दिलीं आहेत. तीं अशीं:—

" त्रिपुरवधार्थं दीक्षामुपगतस्य रुद्रस्य उशनसा जटाः शिरस उत्कृत्य प्रयुक्तास्ततः प्रादुर्भूता भुजगास्तैरस्य भुजगैः पीड्यमानः कण्ठो नीलतामुपगतः ।

पूर्वे च मन्वन्तरे स्वायंभुवे नारायणहस्तग्रहणान्नीलकण्ठत्वमेव च ॥" २६ ॥ म० भा०, शान्तिपर्व, अ० ३४२.

अर्थ—त्रिपुरवधासाठीं तयार झालेल्या रुद्राच्या अंगावर शुक्राचार्यांनें आपल्या डोक्याच्या जटा उपटून फेंकल्या. त्यांपासून सर्प उत्पन्न झाले. त्या सर्पांनीं त्याच्या कंठाला विळखे घातल्यामुळें तो नीलकंठ झाला.

पूर्वी स्वायंभुव मन्वन्तरांत नारायणानें त्याचा गळा आपल्या हातानें दाबला होता ह्मणून तो (महादेव) नीलकंठ झाला. (कारण नारायण कृष्णवर्ण आहे.)

" अथ रुद्र उपाधावत्तावृषी तपसान्वितौ ।
तत एनं समुद्धूतं कण्ठे जग्राह पाणिना ॥ ११४ ॥
नारायणः स विश्वात्मा तेनास्य शितिकण्ठता" ॥ ११५ ॥
शान्तिपर्व, अ० ३४२

अर्थ—नंतर तप करीत असलेल्या त्या (नरनारायण) ऋषींच्या अंगावर रुद्र धांवून गेला. तेव्हां त्या विश्वव्यापी नारायणानें तो अंगावर येतांच आपल्या हातानें त्याचा गळा दाबून धरला. त्यामुळें तो नीलकंठ झाला. (नारायणाचा हात काळा असल्यामुळें महादेवाच्या गळ्याचा तेवढा भाग काळा दिसला.) *

तेव्हां यांतून खरें कारण कोणतें हें सांगणें फार कठिण आहे. एवढें मात्र खरें कीं, ज्याचा कंठ निळा आहे असा जो रुद्र (महादेव) तो दुसरा तिसरा कोणी नसून केवळ अग्नीच+ (मग तो सूर्यरूपी कां असेना) होय.

वृषभवाहन—"नमो बभ्लुशाय" इत्यादि मंत्रांत रुद्राला (अग्नीला) बभ्लुश ह्मटलें आहे. 'बभ्लुश' या शब्दाचा अर्थ भाष्यकारांनीं पुढीलप्रमाणें केला आहे.

+ अमराचे टीकाकार रायमुकुट ह्यांनीं 'श्रीकंठ' या शब्दावर नीलकंठ नांवाच्या टीकाकाराचें अवतरण दिलें आहे तें असें:—'धृतं कंठे विषं घोरं ततः श्रीकंठतामगात्' इति ।

* " कृष्णवर्णस्य नारायणस्य संबंधान्नीलकण्ठत्वं रुद्रेगत इत्यर्थः"—नीलकण्ठ.

+ रुद्राच्या चरित्रांत 'नीलग्रीव' आणि 'नीललोहित' हे पर्याय होत असें सायणाचार्यांचें मत होतें असें दिसतें. कारण, 'नीललोहित' याचा त्यांनीं 'कण्ठे नीलोऽन्यत्र लोहित इति नीललोहितः,' (अर्थात् नीलकण्ठ) असा अर्थ केला आहे. (तै० सं० भाष्य ४।५।१०) त्यावरूनही वरील सिद्धान्ताला बरीच पुष्टि मिळते.

अनुक्रमणिका

" बिभर्ति रुद्रमिति बभ्रुः वृषभः । स एव बभ्लुः । रलयोर्भेदाभावः । तस्मिन् शेते तिष्ठतीति बभ्लुशः । "

अर्थ—रुद्राला धारण करतो ह्मणून बभ्रु। बभ्रु तोच बभ्लु। कारण र् आणि ल् यांमध्यें भेद नाहीं. त्या बभ्लूवर (ह्मणजे वृषभावर) बसणारा तो बभ्लुश.

हा अर्थ भाष्यकारांनीं केवळ व्युत्पत्तीच्या जोरावर केला आहे. याला वेदांत कांहीं-एक आधार नाहीं. उलट बभ्रु किंवा बभ्लुश यांचा अर्थ बहुधा 'पिंगट' असा होतो; आणि तोच अर्थ प्रस्तुत स्थलीं विवक्षित दिसतो. भाष्यकारांनीं देखील स्वतः 'असौ यस्ताम्रो अरुण उत बभ्रुः।' या मंत्रांत बभ्रु शब्दाचा अर्थ 'पांढरा' असा केला आहे.* ऋग्वेदांतही अनेक ठिकाणीं+ रुद्राला 'बभ्रु' असें ह्मटलें आहे. त्या सर्व ठिकाणीं 'बभ्रु' शब्दाचा अर्थ पिंगट असाच होतो. असें असतां प्रस्तुत स्थलींच भाष्यकारांनीं 'बभ्रुः' ह्मणजे रुद्राला धारण करणारा (बिभर्ति रुद्रम्) असा विलक्षण अर्थ कां केला हें समजत नाहीं. या अर्थाकडे पाहिले असतां 'बभ्लुश' या शब्दावरून पौराणिकांनीं रुद्राला किंवा महादेवाला 'वृषभवाहन' असें वर्णिलें असेल असें दिसत नाहीं. उलट भाष्यकारांनींच महादेवाचें वाहन वृषभ आहे या पौराणिक कथेला अनुसरून 'बभ्लुश' याचा वरील अर्थ केला आहे असें स्पष्ट दिसतें. तेव्हां रुद्राला ह्मणजे अग्नीला वृषभावर बसणारा ह्मणण्याचें खरें कारण कोणतें हा प्रश्न तसाच शिलक राहतो. त्याचें उत्तर माझ्या मतें शतपथ ब्राह्मणांतील पुढील मंत्रांत सांपडतें.

" तस्य हिरण्यं दक्षिणा आग्नेयो वा एष यज्ञो भवति, अग्ने रेतो हिरण्यं, तस्मात् हिरण्यं दक्षिणा, अनड्वान् वा, स हि वहेनाग्नेयो अग्निदग्धमिव हि अस्य वहं भवति ॥ " ४, ५, १, १५

" आग्नेयो वा अनड्वान् "—श० ब्रा० १३,८,४,६.

या मत्रांत अनड्वान् ह्मणजे सांड—बैल—हा अग्नीचा पशु होय, असें सांगितलें आहे; आणि अग्नि व रुद्र किंवा महादेव हे एकच होत. यावरून पौराणिकांनीं वृषभाला महादेवाचें वाहन बनविलें असावें असें वाटतें. तरी यासंबंधानें निश्चयात्मक असें कांहीं सांगतां येत नाहीं, हें कबूल करणें भाग आहे.

कपर्दी—' विज्यं धनुः कपर्दिनो विशल्यो बाणवानुत'—या मंत्रांत रुद्राला (ह्म० अग्नीला) **कपर्दी** ह्मटलें आहे. ऋग्वेदांतही ' इमा रुद्राय तवसे कपर्दिने क्षयद्वीराय प्रभरामहे मतिम् ' (ऋ० १, १४१, १.) या मंत्रांत रुद्राला कपर्दी ह्मटलें आहे. सायणाचार्य ह्मणतात कीं, यांतील ' कपर्दी ' शब्दाचा अर्थ ' कपर्दो जटाजूटःसोस्यास्तीति कपर्दी' ह्मणजे कपर्द ह्मणजे जटाजूट ज्याला आहे तो कपर्दी. यांत हा जटाजूट ह्मणजे काय हें जरी सायणाचार्यांनीं सांगितलें नाहीं तरी हा जटाजूट (कपर्द) ह्मणजे लौकिक अग्नि किंवा सूर्यगत अग्नि यांच्या ज्वाला किंवा किरण असावेत, अथवा लौकिक अग्नीचे धुराचे लोट असावेत, असें वाटतें. यासंबंधानें ऋग्वेदांतील पुढील मंत्र फार महत्वाचा आहे:—

* सायणाचार्य कधीं कधीं 'बभ्रु' याचा अर्थ 'काळा' असाही करितात. उदाहरणार्थ 'बभ्रुः कपिलः' तै० सं० भाष्य ७।३।१८.

+ 'प्र बभ्रवे वृषभायश्वितीचे'—ऋ० २,३३,८.
'एवा बभ्रो वृषभ चेकितान'—ऋ० २,३३,१५ इत्यादि.

अनुक्रमणिका

" केशी अग्निं केशी विषं केशी विभर्ति रोदसी ।
केशी विश्वं स्वर्दृशे केशीदं ज्योतिरुच्यते ॥ " १ ॥
ऋ० १०, १३६.

अर्थ-**केशी** अग्नीला, **केशी** विषाला (पाण्याला), **केशी** आकाश आणि पृथ्वी ह्यांला धारण करितो. **केशी** दिसण्याला सर्व आकाश होय. ह्या तेजाला **केशी** ह्मणतात.

भाष्य—" इदं दृश्यमानं मंडलस्थं यज्ज्योतिरिदमेव केशीत्युच्यते नान्यः । "

या मंत्रांतील केशी ह्मणजे सूर्य होय, असें भाष्यकार सांगतात. अनुक्रमणीवरून व अर्थावरूनही तेंच दिसतें. पण ' केशी ' या शब्दाचा अर्थ ' अग्नि ' असाही होतो.* प्रो० ग्रिफिथ यांच्या मतें केशी ह्मणजे सूर्य, अग्नि आणि वायु होत. प्रो० रॉथ आणि बोथलिंग यांच्या मतें त्याचा अर्थ रुद्र असा आहे.

केश शब्दाचा अर्थ ज्वाला असाही पुष्कळ ठिकाणीं होत असतो. उदाहरणार्थ-' अयं पुरो हरिकेशः सूर्यरश्मिः ।" हा तै० संहितेच्या तिसऱ्या प्रपाठकांतील मंत्र आहे. याचा भाष्यकारांनीं ' अयमग्निः पुरः पूर्वस्यां दिशि हरिकेशो हिरण्यवर्णसमाना **केशस्थानीया ज्वाला** यस्यासौ हरिकेशः सूर्यरश्मिः सूर्यसमानरश्मिः ।' असा अर्थ केला आहे. तै० सं० ४,४,३, यांतही त्यांनीं हाच अर्थ केला आहे. परंतु ' हरिकेशाय उपवीतिने " तै० सं० ४,५,२, यांत त्यांनींच ' हरिकेशाय नीलमूर्धजाय पलितरहिताय (अग्नये),' असा ' हरिकेश ' शब्दाचा ' काळे केश ज्याचे ' असा अर्थ केला आहे. येथें अग्नीला **' नीलमूर्धज '** (हरिकेश) ह्मटलें आहे; व अथर्व वेद २,२७,६, यांत रुद्राला **नीलशिखण्ड** ह्मटलें आहे. ऋग्वेदांत **' शोचिष्केश '** हें विशेषण अग्नीला (ऋ० १,४५,६; १२७,२; २,५७,१; ६०,१. इत्यादि) व सूर्यालाच (ऋ० १,५०,८। इ०) लाविलेलें आहे. ऋ० ६,५५,२ यांत पूषालाही ' कपर्दी ' असें ह्मटलें आहे. पूषा हा देखील सूर्याचाच एक मूर्तिभेद होय. या सर्व गोष्टींवरून ' कपर्दी ' ह्मणजे सूर्यरूपी किंवा लौकिक अग्निच होय हेंच सिद्ध होतें.

भव आणि **शर्व**.–" नमो भवाय च रुद्राय च नमः "–(रुद्राध्याय). या अनुवाकांत रुद्राचीं बहुतेक सर्व प्रमुख नांवें आलेलीं आहेत. तीं **भव, रुद्र, शर्व,* पशुपति, नीलग्रीव, शितिकण्ठ, शिव, सोम, गव्हरेष्ठ** (गिरीश), **नीललोहित** आणि **विलोहित** हीं होत. हीं सर्व नांवें महादेवाचीं होत असें अमरकोशांत सांगितलें आहे. (पण यांत–या सर्व रुद्राध्यायांत–गंगाधर, स्मरहर आणि चन्द्रशेखर या तीन अत्यंत प्रमुख विशेषणांचा मुळींच उल्लेख नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे).

यावर कोणी कदाचित् असें ह्मणतील कीं, पशुपति, भव वगैरे नांवें वस्तुतः महादेवाचींच होत, अग्नीचीं नव्हत; पण रुद्ररूपी अग्नीचें सर्वात्मकत्व वर्णन करण्याकरितां तीं त्याला लाविलेलीं आहेत. परंतु तें बरोबर नाहीं. कारण हीं सर्व नांवें अग्नीचींच होत असें शतपथ ब्राह्मणांत स्पष्ट सांगितलें आहे.

---

* ऋ० १,१६४,४४.

* शर्व (सौर्व-झेंद) हें शिवाचें नांव पारशाच्या अवेस्ता ग्रंथांतही (Vendidad, Fargard XIX, 43) आढळतें. पण तेथें अर्थातच आमच्या देवाधिदेव शर्वाची गणना असुरांत केलेली आहे.

अनुक्रमणिका

" अग्निर्वै स देवः तस्यैतानि नामानि शर्व इति यथा प्राच्या आचक्षते भव इति यथा बाहीकाः पशूनां पती रुद्रो अग्निरिति । तान्यस्य अशान्तान्येवेतराणि नामानि । अग्निरित्येव शान्ततमम् ॥" १, ७, ३, ८.

अर्थ—तो देव अग्नि होय. त्याचीं हीं नांवें होत. **शर्व** असें पूर्वेकडील लोक ह्मणतात. **भव** असें बाहीक ह्मणतात. **पशूनां पतिः** (पशुपति), रुद्र आणि **अग्नि**. त्याचीं हीं (अग्नि खेरीज करून) इतर नांवें अशान्तच होत. **अग्नि** हेंच अत्यंत शान्त होय.

यावर भाष्यकार ह्मणतात, "प्राच्यादि देश-भेदेन शर्वादिनामभेदेऽपि देवता एक एव." प्राच्य (पूर्वेकडील) आदिकरून निरनिराळ्या देशांत शर्व, भव वगैरे नांवें जरी निरनिराळीं आहेत तरी तीं सर्व एकाच देवाचीं—अग्नीचींच-नांवें होत.

शतपथ ब्राह्मण ६, १, ३, यांत पुढील कथा आलेली आहेः **प्रजापति** (=वर्ष) आणि त्याची बायको **उषा** ह्यांच्यापासून कुमार (=अग्नि)+ उत्पन्न झाला. तो रडूं लागला. प्रजापति ह्मणाला, तूं कां रडतोस? तो ह्मणाला, मला नांव नाहीं. प्रजापति ह्मणाला 'तूं रुद्र आहेस.'—

" तमब्रवीत् रुद्रोसीति । तद्यदस्य तन्नामाकरोत् अग्निस्तद्रूपमभवत् । अग्निर्वै रुद्रः । यदरोदीत् तस्मा-द्रुद्रः । "

अर्थ—(प्रजापति) त्याला ह्मणाला, तूं रुद्र आहेस. (प्रजापतीनें) त्याचें नांव तें (रुद्र) ठेविलें ह्मणून तो तें रूप झाला. रुद्र खरोखर अग्नि होय; रडला ह्मणून रुद्र (झाला).*

तो कुमार—अग्नि—पुन्हा ह्मणाला, मला नांव दे. प्रजापति ह्मणाला, 'तूं सर्व (शर्व) आहेस; सर्व हें उदक होय.' अशा प्रकारें प्रजापतीनें त्या कुमार अग्नीला क्रमानें ओषधि, वायु, विद्युत्, पर्जन्य, चन्द्र आणि सूर्य या अर्थाची अनुक्रमें पशुपति, उग्र, अशनि, भव, महादेव आणि ईशान हीं नांवें दिलीं; असें सांगून पुढें ह्मटलें आहे कीं—

"तान्येतावष्टावग्निरूपाणि कुमारो नवमः । सोऽयं कुमारो रूपाण्यनुप्राविशत् । न वा अग्निं कुमार-मिव पश्यन्ति, एतान्येवास्य रूपाणि पश्यन्ति, एतानि हि रूपाणि प्राविशत् ॥"

अर्थ.—हीं तीं अग्नीचीं आठ रूपें होत; कुमार हें नववें. तो कुमार ह्या रूपांत शिरला. अग्नीचें कुमार रूप कोणाला दिसत नाहीं. त्याचीं हींच रूपें दिसतात. कारण ह्यांतच तो शिरला.

हीच कथा मार्कंडेयपुराण (अध्याय ९२), वायुपुराण (अध्याय २७), विष्णुपुराण (अंश १ अध्याय ८) आणि पद्मपुराण (सृष्टिखंड अध्याय ३) यांत अगदीं बहुतेक त्याच शब्दांत पुढीलप्रमाणें थोडक्यांत सांगि-तली आहे.

" कल्पादावात्मनस्तुल्यं सुतं प्रध्यायतः प्रभोः ॥२॥
प्रादुरासीदथाङ्केऽस्य कुमारो नीललोहितः ।
रुरोद सुस्वरं सोऽथ द्रवंश्च द्विजसत्तम ॥ ३ ॥
किं रोदिषीति तं ब्रह्मा रुदन्तं प्रत्युवाच ह ।
नाम देहीति तं सोऽथ प्रत्युवाच जगत्पतिम् ॥ ४॥

+ ऋ० ५, २, १. ह्याच प्रजापतीचा मुलगा अथर्व वेदाच्या १५ व्या काण्डांत व्रात्य (=सूर्य) या नांवानें प्रसिद्ध आहे. तेथें या कुमाराला ह्मणजे अग्नीला सूर्य-रूपानें वर्णिलें आहे.

* अग्नि रडला ह्मणून त्याचें नांव रुद्र पडलें, असें तै० सं० १, ५, १, १ यांत सांगितलें आहे.

अनुक्रमणिका

रुद्रस्त्वं देव नाम्नासि मा रोदीर्धैर्यमावह ।
एवमुक्तस्ततः सोऽथ सप्तकृत्वो रुरोद ह ॥ ५ ॥
ततोऽन्यानि ददौ तस्मै सप्त नामानि वै प्रभुः ।
स्थानानि चैषामष्टानां पत्नीः पुत्रांश्च वै द्विज ॥ ६ ॥
भवं शर्वं तथेशानं तथा पशुपतिं प्रभुः ।
भीममुग्रं महादेवमुवाच स पितामहः ॥ ७ ॥
सूर्यो जलं मही वह्निर्वायुराकाशमेव च ।
दीक्षितो ब्राह्मणः सोम इत्येतास्तनवः क्रमात् ॥ ८ ॥

अर्थ—कल्पाच्या आरंभीं प्रभु (ब्रह्मदेव) आपल्यासारखा पुत्र असावा असा विचार करीत असतां एक नीललोहित (काळा * आणि तांबडा) मुलगा त्याच्या मांडीवर प्रकट झाला. नंतर हे द्विजश्रेष्ठा ! तो (इकडे तिकडे) धांवत मोठमोठ्यानें रडूं लागला. त्या रडत असलेल्या (मुला)ला ब्रह्मा ह्मणाला ' तूं कां रडतोस ? ' तो त्या जगत्प्रभूला ह्मणाला, ' मला नांव दे.' (ब्रह्मा ह्मणाला) ' हे देवा, तुझें नांव रुद्र आहे; तूं रडूं नको, धीर धर. ' असें सांगितल्यावरही पुन्हा तो सात वेळां रडला. तेव्हां हे द्विजा ! प्रभु ब्रह्मदेवानें त्याला आणखी सात नांवें, त्या सर्वांचीं स्थानें, स्त्रिया आणि मुलें दिलीं. तो पितामह प्रभु त्याला **भव, शर्व, ईशान, पशुपति, भीम, उग्र,** आणि **महादेव** ह्मणता झाला.× सूर्य, उदक, पृथ्वी, अग्नि, वायु, आकाश, दीक्षा घेतलेला ब्राह्मण आणि चन्द्र ह्या (त्याच्या) क्रमेंकरून तनु (मूर्ति) होत.

सांख्यायन ब्राह्मणांतही हीच कथा किंचित् निराळ्या रीतीनें सांगितली आहे. ती थोडक्यांत अशीः

" प्रजापतीनें प्रजेसाठीं तप केलें. तेव्हां त्याच्यापासून **अग्नि, वायु, आदित्य, चन्द्रमा** आणि पांचवी **उषा** उत्पन्न झाली. प्रजापतीच्या आज्ञेवरून ते पांचही जण तप करूं लागले. ते तप करीत असतां त्यांचें मन उषेवर गेलें. त्यामुळें वीर्य स्खलन झालें. तें वीर्य प्रजापतीनें एका सोन्याच्या पात्रांत टाकलें. त्यापासून हजार डोळ्यांचा, हजार पायांचा आणि हजारांनीं परिष्ठित (असा एक) मुलगा उत्पन्न झाला. तो प्रजापतीकडे जाऊन त्याला ह्मणाला, 'मला नांव दे.' प्रजापति ह्मणाला, 'तूं भव आहेस. कारण भव हें उदक होय.' तो प्रजापतीकडे दुसऱ्यानें गेला आणि ह्मणाला, " मला दुसरें नांव दे.' प्रजापति ह्मणाला 'तूं शर्व आहेस. कारण शर्व अग्नि होय.' तो प्रजापतीकडे तिसऱ्यानें गेला आणि ह्मणाला 'मला तिसरें नांव दे. ' प्रजापति ह्मणाला, 'तूं पशुपति आहेस, कारण पशुपति वायु होय.' तो चवथ्यानें प्रजापतीकडे गेला आणि ह्मणाला, ' मला चवथें नांव दे.' प्रजापती ह्मणाला, ' तूं उग्र आहेस. कारण उग्रदेव ओषधि आणि वनस्पति होय.'

* पुराण-प्रकाशक.मंडळीनें (विष्णुपुराणांत) 'नीललोहित ' याचा अर्थ ' पूर्वीं तांबडा असून नंतर नीलवर्ण झालेला ' असा केला आहे. पण तो चुकीचा आहे. कारण एक तर ' नील लोहित ' याचा अर्थ तसा होत नाहीं, आणि दुसरें अथर्व वेद १५।१ यांत ह्या कुमाराचें जें वर्णन दिलें आहे त्यांत 'नीलमस्योदरं लोहितं पृष्ठम् । ' ह्मणजे त्याचें पोट काळें असून पाठ तांबडी होती असें विशद करून सांगितलें आहे. शिवाय सायणाचार्यांनींही याचा 'कण्ठेनीलोऽन्यत्र लोहित इति नीललोहितः ।' असा अर्थ केला आहे. तै० सं० भाष्य ४।५।१०.

×पद्मपुराणांत "शिव" हें एक नांव अधिक आहे.
" भवं शर्वमथेशानं शिवं पशुपतिं नृप ॥ १९३ ॥
भीममुग्रं महादेवमुवाच स पितामहः ॥ १९४ ॥

अनुक्रमणिका

तो पांचव्यानें प्रजापतीकडे गेला आणि ह्मणाला 'मला पांचवें नांव दे.' प्रजापति ह्मणाला, 'तूं महादेव आहेस,* कारण महादेव आदित्य होय." तो सहाव्यानें प्रजापतीकडे गेला आणि ह्मणाला 'मला साहवें नांव दे.' प्रजापति ह्मणाला 'तूं रुद्र आहेस. कारण रुद्र चन्द्रमा होय.' तो सातव्यानें प्रजापतीकडे गेला आणि ह्मणाला, 'मला नांव दे.' प्रजापति ह्मणाला, 'तूं ईशान आहेस. कारण ईशान अन्न होय.' तो आठव्यानें प्रजापतीकडे गेला आणि ह्मणाला 'मला आठवें नांव दे.' प्रजापति ह्मणाला, 'तूं अशनि आहेस. कारण अशनि इन्द्र होय." असा हा आठ नांवांचा प्रकार सांगून शेवटीं ह्मटलें आहे कीं "स एषोऽष्टनामाष्टधा विहितो महान् देवः" ह्मणजे तो हा आठ नांवांचा आणि आठ प्रकारांनीं केलेला महादेव होय.

अग्नीचीं हीं आठही नांवें महादेवाचीं नांवें होत असें महिम्न स्तोत्रांत सांगितलें आहे.

" भवः शर्वो रुद्रः पशुपति रथोग्रः सहमहान्
तथा भीमेशानाविति यदभिधानाष्टकमिदम् ॥ " इत्यादि.

सांख्यायन ब्राह्मणांत 'भीम' या नांवाच्या ऐवजीं 'अशनि' हें नांव आलें आहे. बाकीचीं सर्व नांवें सर्व उताऱ्यांत सारखींच आहेत. असो.

वरील उताऱ्यांवरून महादेव ह्मणजे अग्नीच होय हेंच पुन्हा निर्विवाद सिद्ध होतें.

अष्टमूर्ति.—आतां वर दिलेल्या या कथांतच महादेवाच्या अष्टमूर्तींचें बीज आहे हें सहज दिसून येईल. वर उद्धृत केलेल्या ब्राह्मणांत व पुराणांत अग्नीच्या आठ मूर्तींचीं नांवें दिलेलीं असून त्यांचे अर्थ (स्थानें)ही दिलेले आहेत. ते असेः—

श० ब्रा०	सां० ब्रा०	पद्मपु०, मार्कं०, पु० वायुपु०* व विष्णुपु०
१. रुद्र=अग्नि.	रुद्र=चन्द्रमा.	रुद्र=सूर्य.
२. सर्व=उदक	शर्व=अग्नि	शर्व=पृथ्वी.
३. पशुपति=ओषधि.	पशुपति=वायु.	पशुपति=वायु.
४. उग्र=वायु	उग्र=ओषधि व वनस्पति.	उग्र=दीक्षित ब्राह्मण.
५. अशनि=विद्युत्.	अशनि=इन्द्र.	(अशनि) भीम =आकाश.
६. भव=पर्जन्य	भव=उदक.	भव=उदक.
७. महादेव=चन्द्र.	महादेव=सूर्य.	महादेव=चन्द्र.
८. ईशान=सूर्य.	ईशान=अन्न.	ईशान=अग्नि.

आतां महादेवाच्या प्रसिद्ध अष्टमूर्ति पुढीलप्रमाणें आहेतः—पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, सूर्य, चन्द्र, आणि यजमान.× ह्या आठ मूर्ति वस्तुतः अग्नीच्या होत असें वर दाखविलें आहे. अर्थात् अष्टमूर्ति महादेव ह्मणजे अग्नीच होय हें उघड आहे.

ह्या महादेवाच्या, ह्मणजे अग्नीच्या, आठ मूर्ति कल्पण्याचें कारण यज्ञामध्यें अग्नीचे आठ धिष्ण्य (स्थानें) असतात हें होय. ह्या आठ

* अथर्व वेद १५।१ यांत प्रजापतीच्या मुलाचें 'महादेव' हें नांव पडण्याचें कारण निराळेंच दिलें आहे. तें असेंः–'सोऽवर्धत स महानभवत् स महादेवोऽभवत्' ह्मणजे तो वाढूं लागला, तो मोठा झाला, (ह्मणून) तो महादेव (मोठा देव) झाला.

* याशिवाय वायुपुराणांत (अध्याय २७) भव=उदक, शर्व=भूमि, ईशान=वायु, आणि पशुपति=अग्निं, असे चार नांवांचे चार अर्थ दिले आहेत.

× " या सृष्टिः स्रष्टुराद्या वहति विधिहुतं या हविर्या च होत्री ये द्वे कालं विधत्तः श्रुतिविषयगुणा या स्थिता व्याप्य विश्वम्। यामाहुः सर्वबीजप्रकृतिरिति यथा प्राणिनः प्राणवन्तः प्रत्याक्षाभिः प्रपन्नस्तनुभिरवतुवस्ताभिरष्टाभिरीशः ॥ "
—कालिदास.

अनुक्रमणिका

धिष्ण्यांचीं नांवें अशीं: आग्नीध्र, होता, ब्राह्मणाच्छंसी, पोता, नेष्टा, अच्छावाक, मैत्रावरुण आणि मार्जालीय. ह्याच आठ अग्निकुंडांवर किंवा अग्नीच्या आठ मूर्तींवरच महादेवाच्या अष्टमूर्तींची कल्पना बसविलेली आहे, असें ह्मणण्यास महाभारतांतील पुढील श्लोकानें बरीच बळकटी येते.

" ललाटक्षाय सर्वाय मीढुषे शूलपाणये ।
पिनाकगोप्त्रे सूर्याय **मार्जालीयाय** वेधसे ॥ ७७॥
प्रसादये .... वनपर्व अध्या० ३९

यांत महादेवाला **मार्जालीय** हें धिष्ण्याचें नांव उघड उघड दिलेलें आहे. सारांश, अष्टमूर्ति महादेव ह्मणजे अष्टधिष्ण्यात्मक किंवा अष्टकुंडात्मक अग्नीच होय.

भूतेश.—हें नांव अग्नीचेंच होय. शतपथ ब्राह्मणांत (१, ३, ३, १७) अग्नीला तीन भाऊ होते असें सांगून त्यांचीं नांवें दिलेलीं आहेत. तीं अशीं: ' भुवःपति ' ' भुवनपतिः ' आणि ' भूतानां पतिः.' यांतील ' भूतानांपति ' ह्मणजेच भूतेश होय हें सांगायला नकोच. तसेंच तै० संहितेच्या तिसऱ्या कांडांत पुढील मंत्र आढळतो:

" अग्निर्भूतानामधिपतिः......"

पशुपति.—हेंही नांव अग्नीचेंच होय. तै० संहितेंत पुढील मंत्र आलेला आहे; " इमं पशुं पशुपते तेऽद्य **बध्नाम्यग्ने.**" तसेंच " यो नो अग्निर्गार्हपत्यः पशूनामधिपा असत् ।" अ० वे० १९, ३१, २. यांत अग्नीला पशुपति ह्मटलें आहे.

शिव.—हें विशेषण अनेक मंत्रांत अग्नीला लावलेलें आहे. 'ओषधयः प्रतिगृण्हीताग्निमेतं **शिवम्**'—तै. सं. ४, १, २; ४. 'शिवो भूत्वा मह्यमग्नेऽथो सीद **शिवस्त्वम्**' तै. सं. ४,१,९.

शंभु.—हें विशेषण ऋग्वेदांत अग्नीला लावलेलें आहे. उदाहरणार्थ—' द्विता च सत्ता स्वधया च **शंभुः**'॥ ३,१७,१.

पिनाकी आणि **कृत्तिवासाः**—महादेवाला पिनाकी आणि कृत्तिवासा ह्मणण्याचें कारण शतपथ ब्राह्मणांत आढळतें:—

" एतत्ते रुद्रावसं तेन परो मूजवतोऽतीहीति (वा० सं० ३, ६१) अवसेन वा अध्वानं यन्ति, तदेनं सावसमेवान्ववार्जति यत्रास्य चरणं तदनु, तस्मादाह 'परो मूजवतोऽतीहीति'—अवततधन्वा पिनाकावसः इत्यहिंसन्नः शिवोऽतीहीति एव एतदाह 'कृत्तिवासाः' इति निष्वापयति एवैनमेतत, स्वपन्नु न कञ्चन हिनस्ति, तस्मादाह कृत्तिवासा इति ॥ " २,६,२,१७.

अर्थ—' रुद्रा ! ही तुझी शिदोरी होय, ही घेऊन तूं [1]मूजवताच्या पलीकडे जा. ' लोक शिदोरी बरोबर घेऊन मार्ग आक्रमीत असतात, ह्मणून त्याला (रुद्राला) जेथें जावयाचें आहे तेथें तो (यजमान) त्याला शिदोरी देऊन पाठवितो. या प्रसंगीं त्याला मूजवताच्या पलीकडे जावयाचें आहे. ह्मणून तो ह्मणतो 'धनुष्य चढवून **पिनाक** बरोबर घेऊन मूजवताच्या पलीकडे जा. ' आणि ह्मणतो—' आह्माला उपद्रव न करितां शान्तरूपानें जा.' ' कृत्तिवासा (ह्म० कातडें पांघरलेला) असें ह्मणून तो (यजमान) त्याला निजवितो. निजलेला असतां

१. मूजवत्' नांवाचा एक पर्वत असून त्यावर सोम वाढतो अशी वेदांत प्रसिद्धि आहे.

कोणाला उपद्रव करीत नाहीं, ह्मणून 'कृत्तिवासाः' असें ह्मणतो. "[२]

या मंत्रांत 'रुद्रा !' हें संबोधन अग्नीचेंच होय हें उघड आहे. कारण वर सांगितलेंच आहे कीं 'रुद्र' हें अग्नीचेंच अशान्त नांव असून 'अग्नि' हें शान्त नांव होय. ह्मणूनच कण्वशाखेच्या शतपथ ब्राह्मणांत रुद्राला "शिवः शान्तः अतीहि+" ह्मणजे शान्तरूपानें जा, असें ह्मटलें आहे. प्रकरणावरूनही 'रुद्र' या पदानें येथें अग्नीच विवक्षित आहे असें दिसतें.[३] शिवाय अथर्व वेदांतील पुढील मंत्रावरून 'कृत्तिवासाः' हें अग्नीचेंच नांव होय हें स्पष्ट दिसतें:—

"ब्रह्मचार्येति समिधा समिद्धः **कार्ष्णं वसानो** दीक्षितो दीर्घश्मश्रुः। स सद्य एति पूर्वस्मादुत्तरं समुद्रं लोकान् त्संगृभ्य मुहुरा चरिक्रत् ॥ अथर्ववेद ११।५।६.

अर्थ.—— समिधांनीं प्रदीप्त केलेला, कृष्ण मृगचर्म धारण केलेला, दीक्षा घेतलेला आणि लांब दाढीचा ब्रह्मचारी येतो. तो एक दिवसांत पूर्व समुद्रापासून उत्तरसमुद्राकडे जातो. तो लोकांचा संहार करून पुन्हा (त्यांना) उत्पन्न करीत असतो.

सारांश, कृत्तिवासा आणि पिनाकी महादेव ह्मणजे वस्तुतः अग्नीच होय.

या ठिकाणीं 'पिनाक' ह्मणजे काय याचा विचार करणें अप्रस्तुत होईल असें वाटत नाहीं. अमरसिंहानें 'पिनाक' आणि 'अजगव' हीं महादेवाच्या धनुष्याचीं दोन 'नावें आहेत असें सांगितलें आहे. 'अवततधन्वा' या पदाच्या साहचर्यावरूनही पिनाक रुद्राचें धनुष्य होतें एवढें ठरतें. पण त्यावरून 'पिनाक' या शब्दाचा अर्थ काय हें समजत नाहीं. पाणिनीनें 'गाण्ड्यजगात्संज्ञायाम्' (५,२,११०) या सूत्रांत 'अजग' शब्दाला 'व' प्रत्यय लावून 'अजगव' हा शब्द सिद्ध केला आहे. कोणी* ह्मणतात, 'अजगव' हा शब्द' आ जगव' असा असावयाला पाहिजे आहे. तसा जरी असला तरी त्या शब्दाचा मूळ अर्थ अज्ञातच राहतो. रायमुकुट आपल्या टींकेंत ह्मणतात:–"अजकवमिति तु भाष्यम्। तन्मते (गाण्ड्यज्ञकात्संज्ञायामिति ५, २, ११०) सूत्रेऽपि ककारः।.... कपक्षे 'अन्येषामपी' ति दीर्घत्वे अजकावमित्यपि। 'धनुस्त्वजगवं युग्यमजकावजीजक (कव) मिति शब्दार्णवात्।" यावरून असें दिसतें कीं पिनाक–वाचक दुसरा खरा शब्द 'अजगव' नसून अजकाव असा आहे. 'अजकाव' हा शब्द कात्त्यायन श्रौत सूत्र 'अजकावं मैत्रावरुणम्।' ९, २, ६, यांत आला आहे. त्यावरील भाष्यकार याज्ञिकदेव ह्मणतात:— 'अजागलस्तनौ अजका तद्वत्। अजागलस्तनाकारकाष्ठावयवयुक्तं मैत्रावरुणस्य द्विदेवत्यस्य पात्रं भवति। गाण्डयकात् संज्ञायामिति मत्वर्थे

२. तै० संहितेंतही अशाच अर्थाचा मंत्र आढळतो: 'एष ते रुद्र भागस्तं जुषस्व। तेनावसेन परो मूजवतोऽतीहि। अवततधन्वा पिनाकहस्तः कृत्तिवासाः।' १. ८. ६.

+ 'पिनाकावस इत्यहिंसन्नः शिवः शान्तः अतीहीति एवैतदाह'—कण्वशाखेचें शतपथ ब्राह्मण.

३. श० ब्रा० १, ७, ३, ८. कात्त्यायन श्रौतसूत्र ५, १०, २२.

* अमरकोशाचे टीकाकार रायमुकुट ह्मणतात— प्रज्ञादित्वादणि आजगवामिति दीर्घाद्यपि। तेन शार्ङ्गधनुर्मुरारेराजगवमस्य वा पिनाकं वेति बोपालितः॥ स्थाणोर्धनुराजगवमित्यमरमाला च॥

अनुक्रमणिका

वः। " अजकाव हा शब्द ऋग्वेदांतही पुढील मंत्रांत आला आहेः—

" आ मां मित्रावरुणेह रक्षतं कुलाययद्विश्वयन्मा न आयन्। अजकावं दुर्दृशीकं तिरो दधे मा मां पद्येन रपसा विदत्सरुः ॥ ७, ५०, १.

अर्थ–हे मित्रावरुण हो! येथें माझें रक्षण करा. घर करून बसणारें आणि चोहोंकडे पसरणारें (विष) मजप्रत न येवो. दिसण्याला हिडिस असा अजकाव (सर्प) न दिसो. त्सरु (सर्प) मला पावलाच्या आवाजानें न जाणो. (किंवा सर्प माझ्या पायाला दंश न करो).

सायणाचार्य 'अजकाव' याचा 'अजका रोगविशेषः तद्वत् दुर्दृशीकं दुर्दर्शनंविषं' असा विशेषणपर अर्थ करितात. पाश्चात्य पंडित 'विंचु' किंवा 'सर्प' असा अर्थ करितात. पण याज्ञिकदेवाचें भाष्य व प्रस्तुत मंत्र यांचा विचार करितां 'अजकाव' ह्मणजे सर्पविशेषच होय असें वाटतें. या शब्दाचा 'सर्प' हाच अर्थ आहे असें निश्चयपूर्वक ह्मणण्याला दुसराही एक स्वतंत्र आधार आहे. तो असा कीं 'अजकाव (अजगव)' याचा पर्याय शब्द जो 'पिनाक' तो सर्प होय असें महाभारतांत सांगितलें आहेः—

'पिनाक इति यत्ख्यातं स च वै पन्नगो महान्।' अनुशा० पर्व, अध्याय १४, श्लो० २५२.

अर्थात् यावरून अजगव किंवा अजकाव आणि पिनाक यांचा अर्थ 'सर्प' असाच असून, रुद्राचें ह्मणजे महादेवाचें पिनाक नांवाचें धनुष्य सर्पात्मकच होतें हें सिद्ध होतें. या सिद्धान्ताला त्रिपुरवधप्रसंगीं महादेवाचें धनुष्य (किंवा धनुष्याची दोरी) सर्पाचें केलेलें होतें, या पौराणिक कथेचीही बरीच पुष्टि मिळते. असो.

[पुढें चालू.]

काव्यमंजूषा.

कवीचें आत्मसमाधान.

गेलों दूर कुठेंहि, काय ह्मणुनी व्हावें उदासीन मी?
आहे काय इथें विशेष? तिकडे आहे कमी कोणतें?
स्वर्गंगा विधु हासरा विमल हे तारेहि गानप्रिय
कोठेंही असणार ना मजसवें आनंदवीत स्वयें? १

तेथेंही मज पाहुनी प्रिय उषा हासेल लाजेल ना?
मत्काव्यश्रवणास तो अरुणही प्रेमोत्सवें येइल?
यत्नें नूतन कल्पना जमवुनी आणील ना मारुत?
श्रांतस्वांतविनोद ना करिल हें आकाश दीपोत्सव? २

ही चेतोरम दिव्य सृष्टि कविची मैत्रीण आहे खरी,
जा कोठेंहि खुशाल, तेथ सरला राहील तैशीच ती!
आत्मा नूतन, दिव्य दृष्टिहि जयां काव्योदयें लाधली
त्यांना शांति सुख प्रमोद मिळतो सर्वस्थलीं सर्वदा! ३

रेंदाळकर.

मुक्ता.

यत्नें दुर्गम ते विशाल अचल प्रोत्तुंग उल्लंघुनी
गेलों बाहुबळें अनंत तरुनी चंडोर्मि उन्मत्तसा
नाहीं दारुणनक्रभीति धरिली प्रेमोत्सवें लेशही
सिंधूच्या तलिं जाउनी मिळविली ही चारु मुक्ता पहा! १
प्राणाची परवा क्षणैक धरिली नाहींच नाहीं कदा
या मुक्तेस्तव संभ्रमें अजवरी केले अनंत श्रम
त्यांचें सार्थक होऊनी विधिकृपें हातांत ही पातली
ती माझीच अतां, तिचा मजविणें स्वामी न लोकीं दुजा! २
रत्नांच्या मधुदामबंधनिं मुदें मुक्तेस या गुंफुनी
कंठीं घालुनि मी विहार करितों स्वच्छंद कोठें तरी!
तद्दिव्यामलरम्यकांति हृदयीं विस्तारतां माझिया
मी होईन अहा! खराच सहसा प्रत्यक्ष देवापरी!
मुक्ते! तूं असलीस सस्मित जरी वृक्षावरी लोळत
स्वर्गाचीहि मला क्षणैकहि कधीं होणार नाहीं स्मृति! ३

रेंदाळकर.

अनुक्रमणिका

डेलॉसचा संघ व मराठ्यांचें साम्राज्य.

(२३३ पृष्ठावरून पुढें चालू, आणि समाप्त.)

डेलॉसच्या संघाचें राजाराम महाराजांच्या कारकीर्दींतील मराठी साम्राज्याशीं पुष्कळ साम्य आहे. ईजियन समुद्राच्या किनाऱ्यावर लहान लहान वसाहती करून राहिलेल्या ग्रीक लोकांच्या स्वातंत्र्याचा अपहार करण्याकरितां पर्शिया पुढें सरसावतांच त्यांनीं आपली स्वाभाविक तुटसपणाची वृत्ति टाकून देऊन नवीन जूट उत्पन्न केली व प्रचंड शत्रूशीं बरोबरीच्या नात्यानें दोन हात करितां येतील अशी तयारी केली. त्याचाच विकास पुढें डेलॉसच्या संघांत झाला. राजाराम महाराजांच्या वेळीं मराठी साम्राज्यासही अशाच परिस्थितींत प्रारंभ झाला. आजच्या श्रोतृसमाजापुढें डेलॉसच्या संघाची पूर्वपिठिका सांगणें अयुक्त नाहीं. पण मराठी श्रोत्यांपुढें मराठ्यांच्या स्वराज्याच्या उदयाचा मनोरंजक इतिहास सांगणें अक्षम्य कालापव्यय होईल. ग्रीक लोकांच्या लहान समाजांनीं आपल्या स्वातंत्र्याची जोपासना जलतीरीं केली, तर मराठ्यांनीं सह्याद्रीच्या पहाडांत आपल्या स्वातंत्र्याची ज्योत केव्हांही मावळूं दिली नाहीं. महाराष्ट्रांतील मावळांमध्यें मुसलमानांचा अंमल कधींही पूर्णत्वानें बसला नव्हता. अग्नीचें रक्षण करावयाचें असल्यास त्याजवर राखेचें उडपण घालून ठेवतात व जरूर लागली कीं तें काढून टाकल्याबरोबर आंतील अग्नि तयार सांपडतो. त्याप्रमाणें सह्याद्रीच्या निबिड अरण्यांत, दऱ्यांत व खोऱ्यांत मराठ्यांनीं योग्य प्रसंगाची वाट पाहात आपलें स्वातंत्र्य जपून ठेविलें होतें. अनुकूल परिस्थिति मिळतांच व शिवाजी महाराजांसारखा अलौकिक पराक्रमाचा पुरुष त्यांस नायक लाधतांच त्यांनीं आपलें गुप्त तेज व्यक्त केलें; व त्या तेजानें विजापुर गोंवळकोंड्यांची दक्षणेंतील मुसलमानी राज्यसत्ता तर राहोच, पण खुद्द चकत्यांच्या पादशाहीचे देखील डोळे दिपवून टाकिले. शिवाजी महाराजांनीं मावळ्यांच्या उत्साहाच्या व स्वातंत्र्यप्रीतीच्या पायावर आपली स्वराज्याची इमारत उभारली. परंतु शिवाजी महाराजांची स्वराज्यसंस्थापनेची महत्त्वाकांक्षा दिल्लीपति अवरंगजेबास खपली नाहीं. आपल्या हुकमाप्रमाणें प्रत्येकास मान वांकविण्यास लावणाऱ्या व महंमदी धर्माखेरिज इतर धर्मांचे अनुयायांचा सर्व प्रकारें छल करणाऱ्या अलमगीर पादशहास शिवाजी महाराजांचा स्वराज्यसंस्थापनेचा प्रयत्न धृष्टतेचा वाटला. त्यांचें गोब्राह्मणप्रतिपालनाचें व हिंदु धर्मसंरक्षणाचें व्रत पैगंबराच्या अमर्षण धर्माचा एक मोठा उपमर्दच आहे अशी त्यानें आपली समजूत करून घेतली. त्या अन्वयें त्याचीं मराठ्यांबरोबर युद्धेंही झालीं. अखेरीस शिवाजी महाराजांचा आग्र्यास कोंडमारा करून टाकण्याचा आपला डाव हुकला इतकेंच नव्हे, तर त्यांनीं आपणांस राज्याभिषेक करून घेऊन राजचिन्हें धारण केलीं व आपलें मूर्तिमंत स्वातंत्र्य जगाच्या प्रत्ययास आणून दिलें, हें पाहातांच तो अत्यंत

संतापाला. पुढें थोड्याच कालांत मराठे व मोंगल ह्यांजमधील त्रिशद्वार्षिक युद्धास प्रारंभ झाला. शिवाजी महाराज समाधिस्थ झाले. संभाजी महाराज आपल्या दुर्व्यसनासक्तीमुळें मोंगलांच्या क्रूरतेस बळी पडले. स्वदेश मुसलमानांच्या ताब्यांत गेला. राज्यकर्त्या पुरुषास एखाद्या भिकार भणंगाप्रमाणें जीवित रक्षणाकरितां देशोधडीस जावें लागलें. अशा स्थितींतही हिंमतवान व युक्तिबाज मराठ्यांनीं धीर सोडला नाहीं, किंवा आपलें काज फुकट गेलें असें मानिलें नाहीं. झर्सिसनें अथेन्स घेतल्यानंतर 'जोंपर्यंत दोनशें अथीनियन जहाजें तयार आहेत तोंपर्यंत अथीनियन लोकांस कॉरिंथपेक्षां जास्त मजबूद नगराचा आधार आहे' असें ग्रीकराष्ट्रांच्या परिषदेंत जोरानें सांगणाऱ्या थेमिस्टॉक्लीजप्रमाणें, किंवा फ्रान्सच्या चवदाव्या लुईनें आपल्या सर्वस्वाची होळी करण्याचा घाट घातला असतां वुइल्यम ऑफ ऑरेंजच्या उपदेशाप्रमाणें आपले संरक्षक 'डाइकस्' फोडून सर्व नेदरलंडस् जलमय करून सोडण्याचा व आपली संपत्ति जहाजांवर घालून अन्य देशीं—पण स्वातंत्र्य न गमावितां—वसाहत करण्याचा संकल्प केलेल्या डच लोकांप्रमाणें, मराठे वीरांनीं आपला दृढ निश्चय कसोटीस लाविला, व आपल्या घोड्यांची खोगरें हींच आपलीं घरें कल्पून "जेथें जेथें मराठा शिलेदार जाईल तेथें तेथें तो राजसत्ताच स्थापन करील," असें हिंदुस्थानांतील लोकांच्या निदर्शनास आणून दिलें. बिकट संकटाखालीं चुरडून गेले असतां व अपरंपार निराशेंत निमग्न असतां मराठ्यांनीं असा अतुल पराक्रम करावा हें चमत्कारिक दिसतें. परंतु मराठ्यांस संकटानें शिक्षण दिलें, व निराशेनें पंगु न करितां मनास उमेद व हातांस शक्ति दिली. ह्या दुरतिशय आपत्कालीं मराठ्यांनीं आपल्या साम्राज्याची प्राणप्रतिष्ठा केली. तळमजल्यास आग लागून त्यांतून ज्वालांचा लोट सारखा सुरू असतां, दुसरा मजला बांधूं लागणाऱ्या मालकाप्रमाणें मराठ्यांचें हें कृत्य विलक्षण दिसेल. परंतु जरा खोल विचार केल्यास असें आढळून येईल कीं, साम्राज्यसंस्थापनेस प्रारंभ करण्याची मराठ्यांस ह्यावेळीं अत्यंत आवश्यकता होती. ह्यावेळीं त्यांनीं जाणूनबुजून, बुद्धिपुरःसर, दूर नजर देऊन, हें काम केलें असें दिसत नाहीं. परंतु साम्राज्यसंस्थापना हा स्वराज्य परत मिळविण्याचा एकच उपाय त्यांस राहिला होता. हें कसें ह्याचा खुलासा हिंदुस्थानच्या नकाशाकडे एकवार नजर टाकिली असतां सहजीं ध्यानांत येईल.

मोंगली राजसत्तेचें केंद्र जें उत्तरहिंदुस्थान तें व महाराष्ट्र ह्यांत फार अंतर आहे. मोंगली सैन्याची दक्षिणेंतील कामगिरी व्यवस्थित रीतीनें पार पडण्यास त्याचें उत्तरहिंदुस्थानाशीं दळणवळण अप्रतिबद्ध राहाणें जरूर होतें. तेव्हां मराठ्यांनीं आपल्यावरील संकट टाळण्याचा अगदीं सोपा उपाय योजिला. मराठी स्वराज्यास मोंगलांनीं दिलेला शह उठविण्याकरितां मोंगलांची रहदारीची वाट बंद करण्याचा त्यांनीं विचार केला. गंगथडींत निंबाळकर, वऱ्हाडांत भोसले, खानदेश व गुजराथेंत दाभाडे, माळव्यांत पवार, ह्या मराठे सरदारांनीं मोंगली अधिकाऱ्यांस त्राहि भगवान

अनुक्रमणिका

करून टाकिलें व त्याबरोबरच त्या त्या प्रांतीं आपले चौथाईचे व सरदेशमुखीचे हक्कांचा वसूल करण्याची वहिवाट पाडली. मराठ्यांच्या ह्या धामधुमीनें अवरंगझेबाच्या सैन्याची भरती कमी झाली, युद्धसामुग्रीचा तुटवडा पडला, व त्याची अत्यंत दुर्दशा होऊन आजन्मांत कधीं सोसावे लागले नाहींत असे हाल त्यांस कसे काढावे लागले, ह्या इतिहास प्रसिद्ध गोष्टींचा पुनरुच्चार करण्याचें प्रयोजन नाहीं. मोंगलांचें सैन्य नाश पावलें व मराठ्यांचें भय नाहींसें झालें, तरी त्यांस ह्या युद्धांत परदेश काबीज करण्याची जी चटक लागली ती गेली नाहीं. सर्व हिंदुस्थानभर मराठेशाही करण्याचा उपक्रम कदाचित् त्यांनीं ताबडतोब केला असता. परंतु त्यांच्या दुर्दैवानें ह्याच वेळीं गृहकलहास सुरवात झाली. ताराबाईच्या महत्त्वाकांक्षेनें व हट्टानें मराठेमंडळांत कायमची फूट पडली, व ही बाई जर फारवेळपर्यंत राज्यनौकाकर्णधार राहिली असती तर जो प्रसंग स्पार्टाच्या मत्सरी बुद्धीनें व आसुरी भावनेनें अथेन्सवर गुदरला तोच कदाचित् सातारच्या छत्रपतींवर येता. पण त्यांच्या सुदैवानें त्यांस कर्ते व मुत्सद्दी प्रधान लाधले;आणि दुसऱ्या शिवाजीच्या मृत्यूनें ताराबाईचेंही कोल्हापूर दरबारीं वजन नाहींसें झालें. शाहूमहाराजांच्या कारकार्दीचा पूर्वार्ध कोल्हापुरकरांबरोबर सुरू असलेल्या तंट्यांत गेला. त्यामुळें निजामाचे पाय दक्षिणेंत कायमचे रुतले व अवरंगझेबाचे पश्चात् दिल्लीदरबारांत जो घोंटाळा उडून गेला व थोड्याच वर्षांत ज्या अनेक राज्यक्रान्त्या झाल्या त्यांजपासून मराठ्यांस व्हावा तसा फायदा झाला नाहीं. राज्याची वाढ मात्र सारखी सुरू होती. ह्या कारकीर्दीच्या उत्तरार्धांत साम्राज्याची कल्पना दृढमूल झाली. तिचे पुरस्कर्ते थोरले बाजीराव साहेब होते, व त्यांस विरोध करण्याचा प्रतिनिधींनीं जणूंकाय विडाच उचलिला होता. प्रतिनिधींचें घराणें पहिल्याप्रथम ताराबाईच्या पक्षाचें, मोठ्या कष्टानें शाहूमहाराजांच्या बाजूस आलें. पण असल्या पूर्व संस्कारामुळें व परस्पर दृढविश्वासाच्या अभावीं प्रतीनिधिंचा उत्साह व त्यांचें कर्तृत्व शाहू महाराजांच्या फारसें उपयोगीं पडलें नाहीं. सातारच्या दरबारीं ह्यावेळीं उघड दोन पक्ष होते व स्थूलपणें त्यांस 'स्वराज्यवादी' व 'साम्राज्यवादी' अशीं नांवें देण्यास हरकत नाहीं. पहिल्या पक्षाचे पुढारी प्रतिनिधि ह्यांचें ह्मणणें कीं जोंपर्यंत सर्व दक्षिण आपल्या ताब्यांत आली नाहीं तोंपर्यंत उत्तरहिंदुस्थानांत मोहिमा करणें व्यर्थ होय. साम्राज्यपक्षाचे पुरस्कर्ते थोरले बाजीरावसाहेब ह्यांनीं ह्या आक्षेपास दिलेलें समर्पक उत्तर प्रसिद्धच आहे. "झाडाच्या बुंध्याशीं घाव घातला ह्मणजे त्याच्या फांद्या आपोआप गळून पडतील." ह्या रूपकांत मराठ्यांस शत्रुनाशाचे कामीं मिळालेला पूर्वींचा अनुभव, साम्राज्य विस्ताराकरितां त्यांनीं पुढें स्वीकारलेली पद्धति, व लष्करी मोहिमांचें एक सामान्य मूलतत्त्व, ह्या सर्वांचा समावेश केलेला आहे. राजाराम महाराजांच्या वेळीं संताजी, धनाजी, परसोजी वगैरे सरदारांनीं स्वराज्याबाहेर मोंगली मुलखांत शिरून तेथील वसूल आणण्याचा तडाखा चालविला नसता, तर दक्षिणेंतील मोंगली सैन्य हैराण झालें असतें काय ? जी पद्धति

अनुक्रमणिका

अनुभवाच्या कसोटीस उतरली, तीच स्वीकारण्याबद्दल आतां बाजीराव साहेबांचा आग्रह होता. तसेंच मराठ्यांची राज्यविस्ताराची पद्धति व्यापृतत्वाची होती, सुसंहतत्वाची नव्हती. म्हणजे थोडा मुलूख काबीज करून तेथें आपली सत्ता पूर्णपणें स्थापित करावयाची व नंतर दुसरें पाऊल पुढें टाकावयाचें, हें मराठ्यांनीं केव्हांही केलें नाहीं. बऱ्याच मोठ्या प्रदेशावर चौथाई सरदेशमुखी सारख्या बहुतांशीं अव्यक्त हक्कांचें जाळें पसरावयाचें व जेथें जसा लाग साधेल त्या मानानें तेथें आपला अंमल बसवावयाचा, हें त्यांस पसंत असे. माळव्यांत व हिंदुस्थानांत असले हक्क मिळविण्याकरितां पेशवे जे सारखे झटत होते ते ह्याच उद्देशानें होत. प्रतिपक्षाचे दळणवळणाचे मार्ग बंद करणें हा लष्करी हालचालींत व डावपेचांत मोठा महत्त्वाचा मुद्दा असतो. बाजीराव साहेब हीच गोष्ट करण्याचें सुचवीत होते. निजाम दक्षिणेंत स्वतंत्र राजा म्हणून केव्हांही नव्हता. तो फक्त बादशहाचा प्रतिनिधि—दक्षिणेचा सुभेदार—ह्या नात्यानें इकडे होता. अर्थात् त्याचा मोठा जोर दिल्लीशीं त्याच्या असलेल्या संबंधावर होता; व स्वतः किंवा मुलांचे मार्फत तो संबंध कायम ठेवण्यास निजाम केव्हांही चुकला नाहीं. तेव्हां हिंदुस्थानांत राजकारण करून तिकडून निजामाला शह बसेल, त्याच्या शक्तीच्या उगमापासून त्याची ताटातूट होईल व त्याचें दक्षिणेंतील बस्तान बिघडेल, असें करण्याचा बाजीरावसाहेबांचा सल्ला साम्राज्यमूलक असला तरी स्वराज्यपोषक नव्हता, असें कोणाही विचारी टीकाकारास म्हणतां येणार नाहीं. असल्या प्रश्नांचा ऊहापोह होते वेळीं पुष्कळदां आगंतुक भावनांचा व वैयक्तिक पूर्वग्रहांचा मनावर पगडा बसतो, व त्यामुळें सरळ आणि निःपक्षपाती विचारसरणीस मोठा व्यत्यय येतो. खेरीज कांहीं लोक स्वभावतः धाडसी व व्यापक कल्पनांपासून पराङ्मुख असतात व त्यामुळें अशा कल्पनांचें याथातथ्य त्यांच्या मनांत बरोबर उतरत नाहीं. शाहूमहाराजांच्या दरबारीं कांहीं अंशीं असाच प्रकार झाला. परंतु छत्रपतींच्या गुणग्राहकत्वामुळें साम्राज्यपक्षाचा जय झाला. साम्राज्याचें स्पष्ट आदर्श बुद्धिपुरःसर मराठेमंडळापुढें मांडणारा पहिला पुरुष बाजीरावच होय. ‘ हिंदुस्थान सर्व आपलें करावें,’ ‘ अटकेपार घोडे चालवावे ’ ही भाषासरणि येथून पुढें साधारण झाली. पुढच्या पिढीच्या वेळीं जर श्रीपतराव प्रतिनिधि ‘ निजामचें पारिपत्य कायमचें झाल्याखेरीज, व कर्नाटक परत मिळविल्याखेरीज, हिंदुस्थानावर जाऊं नका ’ असें सांगूं लागले असते, तर त्यांनीं आपलें हंसें मात्र करून घेतलें असतें; डोक्यांत आलेली कल्पना कृतींत उतरवून दाखविण्याची धमक बाजीराव साहेबांच्या अंगीं होती. ह्मणून आपल्या आकस्मिक व अकालीं मृत्यूच्या अगोदर त्यांनीं प्रतिनिधींच्या विशेष आवडीच्या कर्नाटकावरील स्वाऱ्या करून व निजामाचें योग्य पारिपत्य करून मराठ्यांच्या सत्तेचा पाया नर्मदेच्या पैलतीरास घातला. त्यांच्या मागील पेशव्यांच्या कर्तृत्वानें, व शिंदे होळकर भोंसले वगैरेंच्या मर्दुमकीनें मराठी साम्राज्याचा विस्तार सर्वदेशभर झाला. पानिपतच्या भयंकर प्रसंगामुळें मराठ्यांची फार

नुकसानी झाली, परंतु त्याच्या पुढील तीस वर्षांत विशेषतः महादजी शिंद्यांच्या कामगिरीमुळें मराठ्यांच्या अंमल पंजाबापर्यंत बसला व खुद्द मोंगलपातशाही मराठ्यांच्या छत्राखालीं सुखानें राहूं लागली. ह्यावेळीं मराठ्यांस पुनः एकदां संधि मिळाली होती; परंतु त्यांच्या दुर्दैवानें त्यांची राज्यपद्धति सुव्यस्थित होण्यापूर्वी व नवें लष्करी गूढ त्यांस उकलण्यापूर्वी त्यांचा एका बलाढ्य, हुशार, व सुव्यवस्थित पाश्चात्य राष्ट्राशीं विरोध झाला, व ही मोठ्या श्रमानें उभारली गेलेली मराठी साम्राज्याची इमारत एखाद्या कागदी डोलाऱ्याप्रमाणें एकदम ढांसळून पडली.

डेलॉसचा संघ व मराठी साम्राज्य ह्या दोन्हीही संस्था, स्वातंत्र्याकरितां धडपड करणाऱ्या दोन राष्ट्रांनीं, तें स्वातंत्र्य नाहींसें होण्याची वेळ आली असतां, आत्मसंरक्षणाकरितां अस्तित्वांत आणिल्या. येथपासून त्यांमधील साम्यास आरंभ होतो. पर्शियाचें सैन्य ग्रीस देशांत असतां ह्या संघाची स्थापना झाली नाहीं हें खरें, पण त्याप्रमाणेंच अवरंगजेबाच्या सेनासमुद्राच्या लाटा सर्व दक्षणभर पसरलेल्या असतां मराठ्यांचा साम्राज्यदुर्ग बांधिला गेला नाहीं. सॅलॅमिसच्या किंवा प्लेटीयाच्या लढाईच्या वेळीं ज्याप्रमाणें निरनिराळे ग्रीक समाज एका सर्वसाधारण स्वयंस्फूर्तीनें राष्ट्रकार्याकरितां एक झाले, त्याचप्रमाणें स्वराज्यप्राप्तीकरितां धडपड करणारे मराठे स्वराज्य नामशेष झालें असतां परराज्यावर हल्ले करूं लागले. पर्शियन युद्धामध्यें बीजभूत असलेल्या ग्रीक लोकांच्या एकीस ॲरिस्टाइडीसनें डेलॉसच्या संघांत दृश्य स्वरूप व कायम घटना दिली. मोंगलांशीं युद्ध सुरू असतां स्वसंरक्षणाकरितां ज्या राज्यविस्तारास नकळत प्रारंभ झाला, त्याचें खरें धोरण व त्याची खरी दिशा बाजीरावसाहेबांनीं शाहूमहाराजांच्या दरबारीं मांडली व आपल्या वक्तृत्वाच्या व मुत्सद्देगिरीच्या जोरावर आकुंचित दृष्टीच्या प्रतिपक्षास निरुत्तर करून साम्राज्याच्या यथार्थ कल्पनेचें आदर्श त्यांनीं मराठमंडळास कायमचें बनवून दिलें व आपल्या अल्पकालीन आयुष्यांत देखील ह्या महत्कार्याचा त्याच्या योग्यतेनुरूप उपक्रम केल्याशिवाय ते राहिले नाहींत. डेलॉसच्या संघाचें परिणत स्वरूप जें पेरिक्लीजच्या कालीं अथेन्सच्या साम्राज्यांत दृग्गोचर झालें, त्याच्याबरोबर तुलना करण्यास योग्य नव्हे; परंतु जेथें त्या तुलनेची थोडी छाया मात्र दृष्टीस पडते असें मराठी साम्राज्याचें स्वरूप सवाई माधवरावांच्या कारकीर्दीत दक्षिण व उत्तरहिंदुस्थानांत एकसमयावच्छेदेंकरून कारभार करणाऱ्या नाना व महादजीच्या वेळीं प्रत्ययास येतें. आपापल्या खंडांत मोठ्या मानास चढलेलीं हीं दोन्हीं साम्राज्यें एकाच कारणामुळें लयास गेलीं याचें कारण हें कीं तेथें प्रचलित असलेली राज्यपद्धति नव्या परिस्थितीला अनुरूप नसल्यामुळें तिचा पाया कच्चा ठरला व तीस क्षयाची भावना होऊन ती नष्ट झाली. अथीनियन साम्राज्यांत हें कसें झालें ह्याचें दिग्दर्शन मागें केलें आहे. ग्रीक लोकांची स्वातंत्र्यकल्पना अत्यंत आकुंचित होती. नगरराज्य (city state) हेंच त्यांचें राजकीय आदर्श होतें. अर्थात् साम्राज्य व

अनुक्रमणिका

नगरराज्य ह्या दोहोंची सांगड त्यांस घालतां येणें शक्य नव्हतें. डेलॉसच्या संघास संघटित राज्याचें (federal state) स्वरूप त्यांस देतां आलें असतें, परंतु प्रातिनिधिक तत्वाच्या अभावीं व रूढ राजकीय कल्पनांच्या जोरामुळें तसें करणें शक्य झालें नाहीं. विस्तृत प्रमाणावर राज्यव्यवहार करितां येण्यासाठीं आपलें नगरस्वातंत्र्य मर्यादित करून आपलें राजकीय आदर्श उन्नत केलें पाहिजे, ह्या कल्पनेचें त्यांस बरोबर आकलन झालें नाहीं. एरव्हीं त्यांनीं आपल्या सोईसाठीं अथेन्सची सत्ता वाढूं दिली असती व पेरिक्लीजच्या साम्राज्यकल्पनेशीं त्यांनीं आपलें तादात्म्य करून घेतलें असतें. अथेन्सची साम्राज्य व्यवस्था फार चोख होती. ज्या उद्देशानें संघस्थापना झाली तो अथीनियन लोकांनीं इतक्या उत्कृष्टरीतीनें सिद्ध करून दाखविला कीं ग्रीक लोकांस पर्शियनांचें भय नाहींसें झालें. इतकेंच नव्हे तर पुढच्या शतकांतील अलेक्झांडरनें जी पर्शियावर स्वारी केली, तिच्या पूर्व तयारीकरितां इषारतीची नौबद ह्याचवेळीं वाजविली गेली असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आकस्मिक संकटांकरितांही त्यानीं भरपूर तजवीज करून ठेविली होती. निरनिराळ्या घटकांच्या—व पुढें मांडलिकांच्या,—मधील तंट्यांच्या योग्य निकाल व्हावा ह्मणून त्यानीं न्यायपीठांची सोय केली होती. खुद्द अथीनियन नागरिकांनीं देखील केलेल्या अत्याचारांची चौकशी करण्यांत येत असे, व सामान्यतः सर्वांस योग्य न्याय मिळे. कारभारांत इतकी दक्षता असतां, अथीनियन लोक आयोनियन सहकाऱ्यांचे जवळचे संबंधीं असतां, व त्यांच्या उज्ज्वल कीर्तीमुळें तरी आयोनियन लोक आपल्या स्थितींत समाधान मानतील असा संभव असतां, तसें घडून आलें नाहीं. आयोनियनांच्या तीव्र असंतोषाची स्पार्टाच्या तामसी द्वेषांत भर पडली व अथेन्सचें साम्राज्य लयास गेलें.

मराठी साम्राज्याच्यापुढील प्रश्न व त्याच्या अडचणी अगदीं निराळ्या स्वरूपाच्या होत्या, हा डेलॉसचा संघ व मराठी साम्राज्याया मधील मोठा विरोध आहे. डेलॉसच्या संघाची शिथिल व्यवस्था अथेन्सच्या दृढ साम्राराज्यांत अन्तर्धान पावली, व मराठ्यांच्या साम्राज्याचा प्रारंभ सुसंहत स्वराज्याच्या घटनेंत होऊन, शेवट मात्र सरंजामी पद्धतींतील मुख्य सत्तेच्या दौर्बल्यांत झाला. एकाचा जेथें शेवट झाला, तेथें दुसऱ्याचा प्रारंभ झाला. ग्रीक समाजांत राजसत्तेचें केन्द्रीकरण दुर्घट होतें; पण तें अथेन्सनें केलें; मराठ्यांच्या साम्राज्याच्या प्रारंभीं एकच केंद्रावरं अवलंबून असणारा राज्यकारभार अखेरीस विविध केंद्र होऊन विस्खलित झाला. हें कां व कसें घडून आलें ह्याचा थोडा विस्तारानें विचार करणें अवश्य आहे; व तो विचार सुसंगत होण्यास शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीतील धोरणाचें थोंडें स्पष्टीकरण करणें जरूर आहे. शिवाजीमहाराज **स्वराज्य**संस्थापक होते, **साम्राज्य**-संस्थापक नव्हते, असें ह्मटल्यास त्याविरुद्ध बरेच आक्षेप येण्याचा संभव आहे. सर्व हिंदुस्थानभर हिंदुपदपादशाही स्थापन करण्याच्या कल्पनेचा शिवाजीमहाराजांच्या मनास स्पर्श देखील झाला नसेल, असें ध्वनित करण्याचा येथें उद्देश नाहीं. परंतु तत्कालीन स्थि-

अनुक्रमणिका

तीचा, लोकमताचा, व खुद्द शिवाजी महाराजांच्या व्यवसायांचा विचार करितां साम्राज्याची कल्पना डोळ्यांपुढें ठेवून तीस मूर्तस्वरूप देण्याची तजवीज त्यांनीं केली, असें ह्मणणें धाडसाचें होईल. शिवाजी महाराजांच्या वेळीं दिल्लीची चकत्यांची पादशाही जोरांत होती. अवरंगजेब बादशहाच्या नंतर तिजला जें वार्धक्य आलें, तें ह्या वेळीं नव्हतें. जोंपर्यंत ही पादशाही सकस असेल तोंपर्यंत दुसऱ्या पादशाहीचा उदय होणें शक्य नव्हतें. दक्षणेंतही विजापुर गोंवळकोंड्यासारखीं संपन्न राज्यें जिवंत होतीं. मराठ्यांची स्वातंत्र्यप्रीतीची हांव स्वराज्यसंस्थापनेपर्यंत देखील गेलेली नव्हती. एरव्हीं शिवाजी महाराजांच्या धाडसी महत्त्वाकांक्षेस स्वकीयांकडून व आप्तजनांकडून अडथळे आणण्यांत आले नसते. महंमदी राजांच्या पदरीं मनसबदार होऊन अर्धवट स्वतंत्र रीतीनें काळ काढणाऱ्या मराठ्यांत पूर्ण स्वतंत्र स्वराज्याची कल्पना जागृत करणें व तें स्वराज्य अस्तित्वांत आणणें, ही कामगिरी लहानसहान नव्हती; व शिवाजीसारखा लोकोत्तर कर्तृत्वाचा व असामान्य बुद्धीचा पुरुष जर महाराष्ट्राचा त्यावेळीं पुढारी नसता तर ती कदाचित् कोणाचे हातून झाली देखील नसती. ही विचारक्रांति साम्राज्यकल्पनेपेक्षां फार महत्त्वाची आहे. स्वराज्य व साम्राज्य ह्यांमधील अंतर केवळ प्रमाणाचें आहे. परंतु मनसबदारी किंवा जहागिरदारी, व स्वराज्य, ह्यांतील भेद धर्मवैचित्र्याचा आहे. स्वराज्यापासून साम्राज्यावर धांव सहज जाईल, परंतु जहागिरी आणि स्वराज्य ह्यांमधील भेद केवळ क्रांतिकारक होईल. ह्या दृष्टीनें विचार करितां बाजीराव साहेबांच्या साम्राज्याची कल्पना शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या कल्पनेशेजारीं निष्प्रभ होते. शिवाजी महाराजांच्या दिल्लीस जाण्यांतून साम्राज्याचा उद्देश शोधूं पहाणें धाष्टर्याचें आहे. कर्नाटकची मोहीम, आपल्या भावास विजापुरकरांचें मांडलिकत्व सोडण्यास भाग पाडून आपलें स्वामित्व कबूल करण्यास लावावें व प्रसंगीं मोंगलांशीं लढतांना आपल्यास पायबंद बसूं नये, ह्याच हेतूनें करण्यांत आली. त्यांतून साम्राज्याची कल्पना निघणें शक्य नाहीं. त्यांच्या राज्याभिषेकाच्या समारंभामुळें कित्येकांचा गैरसमज होत असतो. परंतु त्या समारंभाचें खरें रहस्य समजण्यास त्याचे पूर्ववृत्ताचें अधिक काळजीपूर्वक परिशीलन केलें पाहिजे. ते आपल्यास राजे ह्मणवीत होते हें खरें, पण हेंच उपपद त्यांचे वडील शहाजी ह्यांसही असे. त्या वेळच्या मोठमोठ्या मराठे सरदारांस राजे म्हणण्याची वहिवाट असे. हें राजेपण खरें असावें, व छत्रचामरादि स्वतंत्र राजचिन्हांनीं व बाहेरच्या थाटमाटानें व समारंभानें आपलें स्वतंत्र राजेपण लोकांच्या मनांत पक्कें बिंबवावें, अशी त्यांस इच्छा झाली. खेरीज असें करण्याची आवश्यकताही त्यांस १६७२ च्या सुमारास फार भासली असावी. सिंहगडच्या तहानें व दिल्लीस जाण्यानें शिवाजीमहाराजांच्या खऱ्या स्थितीविषयीं लोकांच्या मनांत बराच गैरसमज उत्पन्न होण्याचा संभव होता. त्यानंतर जरी अवरंगझेबानें त्यांचें स्वातंत्र्य कबूल केलें, तरी ही गोष्ट लोकांच्या पूर्ण प्रत्ययास आणून त्यांचा पूर्वी गै-

रसमज झाला असल्यास तो राज्याभिषेकासारख्या मोठ्या समारंभाच्या द्वारें नाहींसा करणें त्यांस अवश्य वाटलें असावें. म्हणून राज्याभिषेकाचें महत्त्व साम्राज्यासंबंधी, नसून तोंपर्यंत अर्धवट, अस्पष्ट व डळमळीत असलेलें स्वराज्य मोंगलपादशाहांच्या संमतीनें भक्कम पायावर स्थापलें गेलें आहे, असें महाराष्ट्रास समजविण्याकरितां तो एक जाहिरनामाच होता. शिवाजीमहाराज साम्राज्याचे संस्थापक नव्हते, असें म्हणण्यांत त्यांची योग्यता कमी होत नाहीं. उलट वर दाखविल्याप्रमाणें त्यांच्यापुढें दुसऱ्या कोणत्याही मराठे वीरांचें किंवा मुत्सद्याचें काम फिकें पडतें. मॅसिडोनिमाच्या फिलिपच्या कामाशिवाय अलेक्झँडरचा दिग्विजय जसा सुलभ झाला नसता, किंवा शहाजीराजांच्या कर्तृत्वाशिवाय, पाठिंब्याशिवाय व जहागिरीशिवाय शिवाजीमहाराजांचें काम जसें सुदुष्कर झालें असतें, त्याचप्रमाणें शिवाजी महाराजांच्या स्वराज्याखेरीज बाजीरावांचें साम्राज्य कल्पनाकोटींतच राहिलें असतें.

शिवाजीमहाराजांचें धोरण बरोबर अजमावतांना दुसरी चूक कांहीं वेळां अशी होते कीं त्यांच्या अष्टप्रधानपद्धतीस नसतें महत्त्व देण्यांत येतें. अष्टप्रधानपद्धति चांगली कीं चांगली नाहीं ह्याविषयीं दोन मतें असूं शकणार नाहींत. सर्व ठिकाणच्या सुव्यवस्थित राज्यपद्धतींत अशा प्रकारची खात्यानिहाय कामाची वांटणी केलेली आढळते, हाच त्या पद्धतीच्या उत्कृष्टत्वाबद्दल पुरावा बस्स आहे. खेरीज ज्यावेळीं अशी व्यवस्था अन्यत्र ह्याच रूपांत प्रचलित नव्हती, त्यावेळीं तिची उपयुक्तता ओळखून व तिची बरोबर योजना करून ती अमलांत आणणें, हें असामान्य बुद्धिमत्तेचें व दूरदर्शी मुत्सद्दीपणाचें द्योतक आहे. पण ही वाजवी प्रशंसा करण्याचें सोडून कांहीं लोक ह्या पद्धतीचें स्वरूप निराळें भासवितात, हें योग्य नाहीं. खऱ्या कर्तृत्वाची स्तुती करण्यास वाटेल तितका अवकाश असतांही त्याच्यावर भलत्याच गोष्टीचा समारोप करून ह्या काल्पनिक कामगिरीचें वर्णन करीत बसणें हास्यास्पद आहे. अष्टप्रधानपद्धतीनें मराठी राजांचें अनियन्त्रत्व कमी झालें, किंवा लोकमतास अवसर मिळाला, किंवा राज्य हें अल्पजनसत्तात्मक होऊन बसलें, असें स्पष्टपणें ह्मणणें अगर तसें भासविण्याचा प्रयत्न करणें ह्मणजे ह्या पद्धतीविषयीं आपलें अज्ञान पूर्णपणें प्रगट करणें होय.

अष्टप्रधानपद्धतीनें जर असा कांहीं अजब चमत्कार करून दाखविला असला तर त्याच मानानें व तशाच रीतीनें, रशियाच्या कांहीं कालापूर्वींच्या इंपीरियल कौन्सिलनें किंवा तुर्कीच्या पोर्टीनें, झारचे किंवा सुलतानाचे अनियंत्रित अधिकार कमी झाले, हीं राज्यें अल्पजनसत्तात्मक झालीं किंवा त्यांच्यामध्यें लोकनियुक्तत्वाचें तत्व शिरलें, असें ह्मणण्यास बिलकुल हरकत येणार नाहीं. पण असा प्रकार रशियांत किंवा तुर्कींत झाल्याचें आपल्या ऐकिवांत नाहीं; व तो महाराष्ट्रांतही घडून आला नव्हता. अष्टप्रधानपद्धति ही एक अनियंत्रित राज्यकारभाराची व्यवस्था होती व ती तशीच अखेरपर्यंत कायम होती. तिच्यामध्यें अल्पजनसत्ताकत्वाचें (Oligarchy) किंवा लोक-

अनुक्रमणिका

नियुक्तत्वाचें (Representative Government) बीज देखील नव्हतें. छत्रपतींच्या हुकुमानें अष्टप्रधान अस्तित्वांत येत व त्यांच्याच हुकुमानें ते नष्टाधिकार होत. संघटनेच्या दृष्टीनें त्यांस स्वतंत्र जीवित कोणत्याही प्रकारचें नव्हतें, व तसें होईपर्यंत त्यांच्यानें राजाची ह्मणजे छत्रपतींची सत्ता मर्यादित होणें संभवनीय नव्हतें. प्रधानाच्या जागेवर कर्त्या माणसांची नेमणूक होई, व तशी झाली ह्मणजे त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांच्या सल्ल्यास छत्रपतींना मान द्यावा लागे, ही गोष्ट निराळी. पण तो दिलाच पाहिजे अशी कांहीं जबाबदारी संघटनेनें छत्रपतीवर टाकिलेली नव्हती. त्यांचा सल्ला घेण्याची व त्याप्रमाणें वागण्याची आवश्यकता फक्त नैतिक होती; कायदेशीर किंवा हक्कशीर नव्हती. अष्टप्रधानपद्धतीखेरीजही रामशास्त्री किंवा नानाफडणीस ह्यांसारख्या लायक प्रधानांचा सल्ला माधवरावसाहेबांसारख्या कर्त्या व करारी पुरुषास मानणें भाग पडे, व अष्टप्रधानपद्धति अमलांत असतांही संभाजी महाराजांसारख्या छत्रपतींच्या कारकीर्दींत प्रधानमंडळ केवळ पंगु होऊन कलुषासारख्या मंत्र्याच्या हातीं राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें जात. अष्टप्रधानमंडळ हें एक केवळ साधन होतें. त्याचा योग्य उपयोग करून घेणें अगर न घेणें हें सर्वस्वीं राजकर्त्या पुरुषाच्या तब्येतीवर अवलंबून असे. ह्मणून अष्टप्रधानमंडळ हा मराठी साम्राज्याचा' आधारस्तंभ मानून भट पेशव्यांनीं तो पाडून टाकला व त्यामुळें मराठी साम्राज्याची इमारत कोसळून पडली, ह्या विधानांतील सर्वच गोष्टी खोट्या होत. मराठी साम्राज्याचा तर राहोच, परंतु मराठी स्वराज्याचा देखील अष्टप्रधानमंडळ हा आधारस्तंभ नव्हता. स्वराज्याच्या पद्धतीपैकीं तो एक भाग होता, व तो भाग महत्त्वाचा असणें किंवा नसणें हें राज्यकर्त्या छत्रपतीच्या धोरणावर व स्वभावावर अवलंबून होतें. साम्राज्यसंस्थापनेच्या वेळीं तर अष्टप्रधानमंडळ मागें पडून प्रतिनिधि व हुकमतपन्हां ह्यांसारखे अष्टप्रधानाबाहेरील व त्यांहून वरचढ असे अधिकारी निर्माण करण्यांत आले होते. दुसरा कोणताही पुरावा नसता तरी भट पेशव्यांनीं अष्टप्रधानमंडळ मोडलें हें ह्मणणें खोडून टाकण्यास एवढी गोष्ट बस्स होती. आणीबाणीच्या प्रसंगीं अष्टप्रधानांतलि महत्वाचे अधिकारी विरुद्ध पक्षास मिळाले किंवा तटस्थ राहिले, तेव्हां शाहू महाराजांनीं 'सेनाकर्त्या' बाळाजी विश्वनाथावर राज्यव्यवस्थेचा सर्व भार टाकला, व बाळाजी विश्वनाथानें आपल्या सुखाची, हिताची व जीविताची पर्वा न करितां तो उचलला. ह्यांत कोणतेंच गैर झालें नाहीं व ह्याबद्दल कोणीही दोषी ठरत नाहीं.

शिवाजी महाराजांच्या धोरणामधील ज्या तिसऱ्या मुद्याचा विचार कर्तव्य आहे तो जहागिरीपद्धतीबद्दल होय. शिवाजी महाराज जहागिरीच्या व आनुवंशिक पद्धतीच्या विरुद्ध होते, व तदनुरोधानें त्यांनीं आपली राज्यव्यवस्था केली होती. कोणताहीं अधिकार वंशपरंपरेनें द्यावयाचा नाहीं, व कोणतेंही वेतन जहागिरीच्या रूपानें ठरवावयाचें नाहीं, असा त्यांचा बाणा असे. जहागिरदारी पद्धती-

अनुक्रमणिका

चे सर्व दोष त्यांच्या लक्षांत पूर्णपणें येऊन चुकले होते. महाराष्ट्रांत कोणाचेंही राज्य दृढ होण्यास जहागिरदारी व सरंजामी पद्धतीचा नाश होणें अवश्य होतें. एकतंत्री राज्यपद्धति त्यानंतर अमलांत आली असती. ह्या दृष्टीनें पाहतां शिवाजीमहाराजांनीं त्यावेळच्या राजकीय स्थितीचें पूर्ण आकलन करून मराठ्यांच्या आंगवळणीं पडलेल्या जहागिरदारी पद्धतीवर आपल्या सुधारणाशस्त्राचा तीव्र प्रयोग केला असें दिसतें. त्यांच्यामागून त्यांच्याचसारखे परिस्थिति पूर्ण ओळखणारे व राजकीय तत्त्वें नीट समजणारे पुरुष गादीवर येते व देशाची स्थितीही विलक्षण झाली नसती, तर कदाचित् शिवाजी महाराजांच्या ह्या नवीन सुधारणेस मराठ्यांनीं आपली मान वांकविली असती. पण त्यांच्या पश्चात् त्यांच्या तोडीचा एकही पुरुष भोंसले कुळांत उत्पन्न झाला नाहीं. देशावर अनेक संकटें येऊन चमत्कारिक घडामोडी झाल्या व मराठेलोकांच्या उत्साहास त्यांच्या वतनें व जहागिरी मिळविण्याच्या इच्छेचा दुजोरा देणें भाग पडलें. वतनें व जहागिरी ह्यांचा मराठ्यांस अत्यंत अभिमान वाटे. शिंदे होळकरांनीं—विशेषतः शिंद्यांनीं—आपल्या वैभवकालीं महाराष्ट्रांतील पाटिलकीचीं व देशमुखीचीं कित्येक वतनें खरेदी केलीं. तीं मिळविण्याकरितां मराठे वाटेल तें धारिष्ट करण्यास तयार असत. ही त्यांच्या आंगवळणीं पडून गेलेली संवय नाहींशी होण्यास शांततेचे, निदान सुव्यवस्थेचे तरी, दिवस कांहीं काल सारखे राहावयास पाहिजे होते. पण दुर्दैवानें तसा योग येऊं दिला नाहीं. शिवाजी महाराजांच्या सुधारणा चिरस्थायी होण्यापूर्वीच लयास गेल्या. त्याबद्दल भट—पेशव्यांस जबाबदार धरणें अगदीं अन्यायाचें आहे. राजाराम महाराजांचे कारकीर्दींत आलेल्या महत् संकटांतून पार पडण्यासाठीं किताब, मानमरातब व जहागिरी देण्याचा प्रघात सुरू करण्यांत आला, व तो मराठ्यांच्या संवईस व जुन्या वहिवाटीस अनुसरून असल्यामुळें मराठ्यांस अत्यंत मानवला. देशोद्धाराकरितां व वतनें मिळविण्याकरितां अनेक सरदार पुढें आले व शत्रूपासून स्वराज्य सोडविण्याचें काम जोरानें सुरू झालें. शाहू महाराजांच्या कारकीर्दींत परचक्र नाहींसें झालें होतें, परंतु गृहकलहाग्नीनें पेट घेतला होता. परचक्र नाहींसें करण्याकरितां जहागिरी देणें पूर्वीं अवश्य झालें होतें, तर मातबर सरदार आपल्या बाजूस राहतील अशी तजवीज करणें शाहू महाराजांस इष्ट व जरूरही होतें. बाजीरावाच्या कारकीर्दींत निज़ामाच्या चढाओढीमुळें फौजेंतील शिपायांस अधिक पगार देणें ज्याप्रमाणें जरूर झालें होतें, त्याचप्रमाणें कोल्हापूरकरांच्या व निज़ामाच्या फिसालतीस आळा घालण्याकरितां लढवय्ये सरदारांस पोक्त सरंजाम देणें शाहू महाराजांस अवश्य झालें होतें. हा परिणाम बहुतांशीं परिस्थितीचा होता; छत्रपतींच्या दुबळेपणाचा किंवा पेशव्यांच्या कर्तृत्वशून्यतेचा नव्हता. ही गोष्ट सिद्ध करण्यास बाळाजीशीं भांडून कोल्हापूरकरांकडे गेलेल्या—व तेथें पुरेशी जहागीर न मिळाल्यामुळें निज़ामाकडे गेलेल्या—चंद्रसेनराव जाधवाचें एकच उदाहरण पुरे आहे. शाहूच्या नूतन राज्यश्रीस सर्वथा आधारभूत झालेल्या सेनापती धनाजीराव जाधवांच्या प्रत्यक्ष मु-

अनुक्रमणिका

लाची जर ही स्थिति, तर इतरांची गोष्ट बोलावयास कशास पाहिजे ? ह्मणून जें काम स्वसंरक्षणाकरितां शाहूस करावें लागलें, त्याच्याबद्दल पेशव्यांस जबाबदार धरणें सर्वस्वीं अयोग्य आहे. पेशव्यांनीं कांहीं नवीन जहागिरदार किंवा सरंजामी सरदार उत्पन्न केले खरे. पण त्यांस तसें करण्याखेरीज दुसरा इलाज नव्हता. भोंसले, गायकवाड, पवार इत्यादि बहुधा विरोधी व नेहमी तटस्थ असणाऱ्या सरदारांच्यावर विश्वासून राहाणें त्यांस धोक्याचें होतें. ह्मणून त्यांस तोलून धरण्याकरितां व साम्राज्याचा विस्तार करण्याकरितां अवाढव्य सरंजामाचे नवीन सरदार करणें पेशव्यांस प्राप्त झालें. वर सांगितलें आहे कीं, साम्राज्याची व्यवस्थित कल्पना बाजीरावसाहेबांनीं उत्पन्न केली. ही कल्पना जडसृष्टींत आणण्यास त्यांनीं शिंदेहोळकर वगैरेंची माळव्यांत व हिंदुस्थानांत स्थापना केली. साम्राज्यविस्तार पाहिजे तर सरंजामाच्या प्रसरणशील पद्धतीखेरीज तो लवकर होणें शक्य नव्हतें. ह्या अटीवर साम्राज्याचा विस्तार होणें असेल तर तो विस्तारच नको, असें ह्मणणारांचा एक पक्ष असूं शकेल. त्यांच्याशीं ऐकमत्य होणें कठीण आहे. मराठ्यांच्या हाडींमाशीं खिळलेल्या सरंजामी पद्धतीनें जें काम सहज लीलेनें कांहीं दशकांत झालें, तेंच त्या वेळच्या स्थितींत व त्या वेळच्या राज्यपद्धतीनें कदाचित् एक दोन शतकांतही झालें नसतें. मात्र हा साम्राज्यविस्तार चिरस्थाई होण्यास व त्याचे भाग मुख्य राज्यसत्तेच्या केंद्रापासून स्वतंत्र न होण्यास एक गोष्ट अवश्य होती. ती ही कीं, सरंजामी सरदार मुख्य सत्ताधाऱ्यापेक्षां केव्हांही ज्यास्त बलाढ्य होतां कामा नव्हते. ही अट प्रारंभीं कायम होती, व त्यावेळीं साम्राज्याचें काम सुरळीतही चाललें होतें. शाहूमहारांजाच्या वेळच्या भोसले कुळांतील दुहीनें ज्याप्रमाणें सरंजामी पद्धतीस विशेष तेज आलें, त्याचप्रमाणें पेशवाईतील दुहीमुळें शिंदेहोळकरांसारख्या फौजबंद सरदारांस स्वातंत्र्य मिळविण्यास अवसर सांपडला.

राघोबादादांनीं पेशवेपद मिळविण्यासाठीं केलेल्या कारस्थानांनीं मराठी साम्राज्याचा मर्मभेद केला. त्यामुळें मराठी साम्राज्य विकल झालें. त्याच्या गुरुत्वाकर्षणाचा मध्य स्थिर व अचल न राहतां तो उत्तरेकडे कलूं लागला, आणि अशा रीतीनें हें साम्राज्य कोसळलें. फ्रान्समध्यें रिशेल्यू व मॅझॅरिन ह्या प्रधानांनीं राज्यसत्ता एकवट करण्याचा जसा प्रयत्न केला व तो सिद्धीस नेला, तसाच प्रयत्न येथें व्हावयास पाहिजे होता, व तशीच सिद्धि येथें यावयास पाहिजे होती. परंतु तो सुयोग आला नाहीं. ह्मणून सरंजामी पद्धति पेशव्यांनीं सुरू करून मराठी साम्राज्य बुडविलें असें ह्मणणें बरोबर नाहीं.

राजकीय विचारांच्या, कल्पनांच्या व आदर्शांच्या विकासामध्यें नगरराज्यही एक तात्पुरती स्थिति आहे; त्याचप्रमाणें सरंजामी राज्यही एक दुसरी अवस्था आहे. पेशव्यांनीं मराठी साम्राज्य बुडविण्याकरितां मुद्दाम ती उत्पन्न केली नव्हती, किंवा आपल्या अजागळपणानें दुसऱ्या कोठेंही न दिसणारी एखादी नवीनच पद्धति मराठी साम्राज्यांत प्रथम

अनुक्रमणिका

पेशव्यांच्यावेळीं आली नव्हती. राजकीय समाजांच्या प्रगतीमध्यें सरंजामी पद्धति ही एक अवस्था बऱ्याच समाजांस अनुभवावी लागते. आपण आशियांतील नाहीं असें कंठरवानें जगास सांगणाऱ्या आशियांतील जपानांतही ती एकाकाळीं असते. आणि तसेंच, राजकीय स्वातंत्र्याचे विचार आशियांत केव्हांही नव्हते असें डौलानें सांगणाऱ्या युरोपियन राष्ट्रांतही ती वाटेल तितकी फोंफावूं शकते. त्या अवस्थेंतून सर्वच राज्यें निभावून जातील असें नाहीं. ज्या सरंजामी राज्यपद्धतीनें जर्मनीचे शतशः तुकडे झाले, त्याच राज्यपद्धतीचा विकास भिन्न परिस्थितींत फ्रान्समध्यें एकतंत्री व एकमुखी राज्याधिकारांत झाला. मराठ्यांच्या साम्राज्याचें अथवा सरंजामी राज्याचें पर्यवसान मोंगल पातशाहीसारख्या एकतंत्री राज्यव्यवस्थेंत व्हावयास पाहिजे होतें. हें परिणत स्वरूप त्यास येण्यापूर्वीं पाश्चात्यांच्या नवीन तत्त्वावर घातलेल्या व्यवस्थित व टिकाऊ राज्यपद्धतीशीं टक्कर देण्याचा मराठ्यांस प्रसंग आला. त्यामुळें मराठी साम्राज्याचे अर्धवट स्वतंत्र झालेले घटक एकत्र होण्याची संधि येण्यापूर्वीं ते व्यक्तिशः ब्रिटिश राज्यसत्तेचे अंकित होऊन गेले. ह्याबद्दल पद्धतीसच केवळ जबाबदार धरितां येणार नाहीं, अगर असल्या परिणतीचा सर्व दोष कांहीं माणसांच्यावरच सर्वस्वीं टाकतां येणार नाहीं. व्यक्तींच्याप्रमाणें राष्ट्रांच्या आयुष्यक्रमांतही अदृष्ट हें एक महत्त्वाचें तत्त्व आहे. तें जर मराठ्यांस ह्यावेळीं अनुकूल असतें, तर मराठ्यांसही आपली साम्राज्याची इमारत दृढ करण्याची संधि मिळाली असती; आणि पेशवाई निःसत्त्व झाली ह्मणून अयोग्य ठरती तर कदाचित् शिंदेशाहीच्या प्रमुखत्वाखालीं मराठी साम्राज्याचा विस्तार झाला असता. कांहीं अंशीं ह्यासारखा प्रकार जर्मनीमध्यें प्रत्यक्ष घडून आलेला आहे. सोळाव्या व सतराव्या शतकांत निर्जीव व नष्टप्राय झालेलें जर्मन साम्राज्य एकोणिसाव्या शतकांत यूरोपांतील पहिल्या प्रतीचें बलाढ्य राष्ट्र होईल असें भविष्य सतराव्या शतकांत कोणी केलें असतें काय ? पण जें अदृष्ट मराठ्यांस प्रतिकूल झालें, त्याची जर्मनीवर कृपादृष्टि झाली. जर्मनसाम्राज्याच्या घटकांस आपला धर्माभिमान व आपले राजकीय विरोध विसरून जाऊन 'सर्वं कशा भगवती' पुढें मान वांकविण्याची बुद्धि झाली आणि प्रशियाच्या अध्यक्षत्वाखालीं जर्मनसाम्राज्याची पुनः प्राणप्रतिष्ठा करण्यांत आली.

मराठी साम्राज्याच्या ऱ्हासाचीं कारणें अनेक आहेत व त्यांचा निरनिराळ्या ठिकाणीं विचार झालेला आहे. त्याच प्रश्नाचा एका दृष्टीनें म्हणजे राज्य शास्त्राच्या व्यापक तत्त्वानुरोधानें विचार करण्याचा हा अल्प प्रयत्न आहे. पूर्वग्रह व अभिमान यांचा पगडा विचारावर बसूं दिल्यास सत्यान्वेषणाचे कामीं फार अडचण पडते. सरंजामी पद्धति स्वीकारण्यांत व त्या पद्धतीचा फैलाव करण्यांत पेशव्यांनीं मोठी चूक केली असा जो दोष त्यांस नेहमीं देण्यांत येतो, त्याची योग्यायोग्यता ठरविण्याची जबाबदारी फार मोठी आहे. मराठे हे सरंजामी पद्धतींतच वाढलेले होते; व एकट्या शिवाजी महाराजांचे कारकीर्दीखेरीज इतर वेळीं सामान्यतः

अनुक्रमणिका

हीच पद्धति अमलांत होती. असें असतां व त्या पद्धतीचा साम्राज्यविस्ताराचे कामीं होणारा उपयोग स्पष्ट दिसत असतां पुन्हां पेशव्यांसच त्याबद्दल जबाबदार धरणें अन्यायाचें आहे. उत्क्रांतीचें किंवा विकासाचें तत्त्व इतर ठिकाणांप्रमाणें राजकीय संस्थांतूनही दृष्टोत्पत्तीस येतें. बाह्य उपाधींकडूंन अडथळे न आल्यास त्या आपलें विकासाचें सामान्य स्वरूप सोडीत नाहींत. मराठ्यांच्या राजकीय उत्क्रांतींत त्यांच्या पूर्वस्थितीकडे लक्ष दिलें असतां सरंजामी राज्य ही एक अवश्य येणारी अवस्था होती. पण बलिष्ठाशीं स्पर्धा होण्यापूर्वी ह्या अवस्थेंतून त्यांस पार पडावयास पाहिजे होतें, तें घडलें नाहीं. डेलॉसच्या संघांतील घटकांच्या शैथिल्यामुळें त्याचा स्वाभाविक विकास संघटित राज्यांत झाला नाहीं, व शिवाजी महाराजांच्या सुसंहत स्वराज्यानें साम्राज्य होतांना सरंजामी राज्याची अवस्था जी तात्पुरती असावयास पाहिजे होती ती अधिक कालपर्यंत राहिली गेल्यानें स्वाभाविक विकासाची गति कुंठित झाली. अथीनियन व मराठी साम्राज्यांचा प्रारंभ सारखाच स्वराज्याचें संरक्षण करण्याचे प्रयत्नांत झाला. दोघांचा शेवटही सारखाच झाला. नगरराज्याच्या आदर्शास साम्राज्य विरोधी वाटल्यामुळें स्पार्टन लोक व त्यांचे सहकारी ह्यांनीं अथीनियन साम्राज्य बुडविलें; व मराठ्यांच्या आवडत्या सरंजामी स्वातंत्र्यास गृहकलहानें दुर्बल केलेली मुख्यसत्ता बळी पडली. दोन्ही साम्राज्यांच्या इतिहासांत एकच राजकीय तत्त्व दृष्टीस पडतें, तें हें कीं, बदलणाऱ्या परिस्थितीप्रमाणें जनतेच्या राजकीय आदर्शाचा विकास झाला पाहिजे, आणि जुनाट व निरुपयोगी बनलेल्या संस्थांस व घटनांस चालन मिळालें पाहिजे. हें तत्त्व प्रगतीचें आहे. ह्यानें राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा परिपोष होतो व तीं चिरायु होतात.

अनुक्रमणिका

काव्यमंजूषा.

वेताळाची स्वारी.

[पद]

अस्तंगत जाहला दिनमणी,
तिमिरेंआवृत झाली धरणी,
स्वैर क्रीडा करिते रजनी;
चंद्र तारकांसवें लोपला दिसे न आतां नभोंतरीं !
अवसेचा अंधार भयद तो
सगळ्या भूतां प्रमोद देतो;
आतां हांसत नर्तन करिती भूतें प्रेतें महीवरी ! १

मध्यरात्रिचा सुमार झाला,
निद्रा व्यापी अखिल जगाला;
येई ती नच परि घुबडाला,
घू: घू: ऐसा शब्द काढुनी भिववी साऱ्या जगताला !
कर्कश ध्वनी काढुनि भूतें,
सूर देति त्या घू: शब्दातें,
अतिशय बेसुर तो कोलाहल भेदुनि टाकी गगनाला ! २

नररक्तीं वेताळ रंगुनी ,
नररुंडांचा हार घालुनी,
अस्थींच्या पालखींत बसुनी,
मिरवत चाले भूतांसंगें स्मशानभागीं ऐटीनें !
घुबडें घू: घू: शब्दा करुनी,
भूतें हू: हू: असें गाउनी,
वेताळाच्या त्या स्वारीचें स्वागत करिती निष्ठेनें ! ३

जळतीं प्रेतें घेउनि हातीं
भूतें उजळ प्रकाश देती
" आस्ते " " आस्ते " कोणी ह्मणती
" निगा रखो " हे शब्द मानपर वेताळाच्या स्वारीला !
समंध, राक्षस, भूतें यांनीं,
उच्चरवानें गाणीं ह्मणुनी,
राजराज त्या वेताळाला गुंग करोनी सुखवीला ! ४

भेसुर तें भूतांचें गान,
गान कशाचें ? भयकर क्रंदन,
विदारितें मृदु अंत:करण,
कोमलतेला चुरुनि टाकुनी उजाड करितें जगताला !
आनंदाला सत्प्रेमाला
सुरम्यतेला हें शान्तीला
आग लावितें, सकलां छळितें, खिन्नहि करितें चित्ताला ! ५

बाळकृष्ण महादेव गद्रे.

वेडा.

वेडा झाला ह्मणती सारे
फिरलें डोकें भरलें वारें
कामांतुनि हा अगदिंच गेला
उपाय कुणि तरि सांगा याला !

(२)

विहंगमातें प्रेमें बाहे
कुसुमासंगें खिदळत राहे
उषा सुंदरीप्रति चुंबाया—
जातो धांवत आलिंगाया !

(३)

निबिड तमाच्या करालोदरीं
निर्भय मारित जाय भरारी,
लांब कुठें तरि शीलेवरती
बसुनि गातसे सहज स्फूर्ति.

(४)

'रचनीकीटक' साथ कराया,
'निर्झर' 'पर्णें' ताल धराया.
वेड्याचा हा जलसा पाहुनि
तारे खदखद हांसति गगनीं !

(५)

निद्रा न कळे कुठें पळाली
क्षुधा-तृषाही विरून गेली
वेड मनाला मोह पाडितें
विकार कैसे सुचतिल तेथें !

(६)

नकळे स्मशान वा नंदनवन
दिन कां रजनी हेंहि कळेचि न
स्थल कालाची स्मृती उडाली
'मी' 'माझें' ही भ्रांति गळाली.

(७)

कराल पर्वत कडे कठिनतर
मधुकर रंजित सुमन मनोहर

अनुक्रमणिका

यांत अल्पहि न भेद जयासी;
उच्च नीच हा भेद न यासी.

(८)

स्वप्रतिभेचे पाहुनि साचे
देहभानही विसरुनि नाचे
बांधुनिया बहु गंडे दोरे
दमले पंचाक्षरिही सारे !

(९)

चंद्रोदय सुर्यास्तोदयही
क्षोभित सागर, विमल गगन, हीं
ईशस्वरुपाभासक चिन्हें
पाहुनियां, हा वेडा मोहे !

(१०)

केव्हां रोदन, हास्यहि केव्हां
स्तब्ध कधीं-जणुं मूक असे हा !
भृंगामागुनि धांवत जाई
कधीं कोकिलासवेंचि गाई !

(११)

वेड्याच्या जरि मनांत येइल
नभ हें खालीं क्षणांत आणिल
किंवा घेउनि जाइल सृष्टी
एकविसाव्या स्वर्गा वरती !

(१२)

अंतःस्फूर्तीमय जो झाला
बाह्यबंधनें काय तयाला !
याविण दुसरें वेड कोणतें ?
"वेडा व्हाया सुकृत लागतें" !

महादेव भिमाजी कुळकर्णी.

मृतभृंग.

(श्लोक.)

गाणें गात मजेंत येत असतां आतांच म्यां पाहिला
जो मद्भृंगसखा अचानक कसा पंचत्त्व तो पावला !
हा ! हा ! काय दशा तुझी ह्मणुनि मी चित्तीं वदूं लागलों
अश्रूंनीं भरले तदा नयन हे शोकाभरें व्यापलों ! १

गुङ् गुङ् गुङ् करुनी सदैव रमुनी तूं पद्मिनी-सेवनीं
प्राशूनी मकरंद गोड सखया ! तूं गुंगशी ये वनीं !
सौख्याचे दिन ते तवायुसह बा गेले निघूनी परी
दुःखाच्या रजनी अपार उरल्या आतां पुढें भूवरी ! २

तूं ऊठ भ्रमरा ! करूं उभयतां या नंदनीं गायन
नाना पुष्पित वल्लरींसह रमूं हिंडूं सुखें आपण !
आकाशांत पुनः पुन्हां चल गड्या ! मारूं भराऱ्या वरी
आनंदांत रमूं-परंतु असशी तूं सांग कोठें तरी ? ३

मन्मित्रा ! सुख काय बा तुज नको कंटाळशी कां तया ?
मित्रत्वीं सुख तें वसे नच कुठें; न ज्ञात हें का सया ?
आनंदांत अहा ! तुझें जनन तें आनंदची जीवन
आनंदाविण काय ठाउक तुला मत्स्या जसें जीवन ! ४

दुर्दैवें मज दुःख मात्र घडलें त्वन्मृत्युनें एवढें
आनंदी तव वृत्ति बा दिसतसे प्रत्यक्ष माझ्यापुढें
पाहोनी परि काव्यवृत्ति तव ती मी हर्षलों अंतरीं
ज्यांलागीं व्यसनें समान असती तन्मैत्रि होते खरी ! ५

गुङ् गुङ् गुङ् करुनी उठून उघडीं काव्यामृताचे झरे
ज्यांतें पाहुनि वाग्वधू रमतसे वीणारवांच्या भरें !
ऐसा काव्यरसज्ञ दुर्मिळ असें आणूनियां अंतरीं
हा आलों बघ सेवण्या अजि तुझ्या गानीं सुधामाधुरी ! ६

हा ! हा ! मैत्रिण ही तुझी कमलिनी त्वत्संग वांच्छी मनीं
भोक्ता कोण तुझ्याविणें तिज असे-सांगें मला तूं-जनीं
त्वच्छोकें मज दुःख होय मनिं जें तें पाहवे का तुला ?
माझ्या जी भरली मनीं न निघते त्वन्मूर्ति ती निर्मला. ७

भृंगा ! आयु तुझें समस्त सरलें काव्येंच गाऊनियां
जातांना तरि एकदां मजशिं जा तूं काव्य देऊनियां
हा ! हा ! काय खुळा असें वदतसें !"दे काव्य मातें" कसें ?
कोणा देउनि घेउनी करिं असें तें काव्य कां येतसे ? ८

ये ना काव्य मला उगाच रडतों त्या काव्य मी बोलतों
हस्तानें लिहितों फिरून बघतों वाचून त्या डोलतों !
मात्रा कीं गण हें सदा जुळवितों एकेक त्यां ठेवितों !
याला कोण कशास काव्य ह्मणतो ? जाणें न-कां हर्षतों ? ९

गेलासी कवि तूं जगांतुनि असा मी शोक केला इथें
झालें सर्व परी मला पुनरपी तूं भेटशी बा कुठें ?
मारायास न येतसे तुजपरी मातें भरारी कशी
ये ! ये ! सत्वर तूं अजी उचलुनी घेवोनियां जा मशीं ! १०

ऐकोनी तव गान भान नुरलें मी जाहलों त्वन्मय
वेडा होउनियां वनीं भटकलों चित्तीं कशाचें भय !
ये ! ये ! ये ! परतून लाग अपुलें तूं गान बा गावया
नाहीं त्रास तुला पहा पुनरपि मातें सवें न्यावया ! ११

पारुजी नारायण मिसाळ.

अनुक्रमणिका